नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# चंद्रपूर महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ४५ * अंक ३६१ * * चंद्रपूर * गुरुवार, दिनांक २६ जून २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## कुल्लूत ढगफुटी : ३ जण वाहून गेले

**■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २५ :**
हिमाचल प्रदेशात मुसळधार पाऊस पडत आहे. कुल्लू जिल्ह्यातील तीन ठिकाणी, सैंज खोऱ्यातील जीवा नाला, गडसा खोऱ्यातील शिलागड आणि बंजरमधील होरंगध येथे ढग फुटी झाली. त्यामुळे अनेक ठिकाणी पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. एका वडील आणि मुलीसह तीन जण पाण्यात वाहून गेले.

दुसरीकडे, बुधवारी सकाळी उत्तराखंडमधील हल्द्वानी येथे एक कार कालव्यात पडली. ७ जणांपैकी ४ जणांचा मृत्यू झाला. यामध्ये ३ दिवसांच्या बाळाचाही समावेश आहे. जम्मूमध्ये तावी नदी दुथडी भरून वाहत आहे. एक व्यक्ती त्यात अडकली.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

# पुढची थाळी सोन्याची

जगात भारत नावाचा एक देश आहे. त्या देशाची महती अशी आहे की, त्या देशाची अर्थव्यवस्था जगात चौथ्या क्रमांकाची आहे. याच भारतात महाराष्ट्र नावाचे एक अतिप्रगत राष्ट्र आहे, म्हणजेच राज्य आहे. हा महाराष्ट्र प्रांत कधी एकेकाळी अतिशय श्रीमंत होता असे म्हणतात. आता गेल्या काही वर्षापासून या श्रीमंत महाराष्ट्राच्या घरात चणचण सुरू झालेली आहे. तीस वर्षांपूर्वी या राज्याला चाळीस हजार कोटी रुपयांचे कर्ज घ्यावे लागले. तत्पूर्वी या राज्यावर कोणतेही कर्ज नव्हते. आता या कर्जाचा आकडा नऊ लाख कोटी रुपयांचा झालेला आहे. दिवसेंदिवस उत्पन्न घटत आहे. तरी आपली शानोशौकत कमी करायला हे राज्य अजिबात तयार नाही. भारतातील राज्यांचा खर्च यावर देखरेख आणि नियंत्रण ठेवून तो खर्च कमी करण्यासाठी अंदाज समित्या नेमण्यात येतात. तशाच प्रकारे या महाराष्ट्र राज्याचा खर्च कमी करण्यासाठी अंदाज समिती नेमण्यात आली. यांचे काम राज्याच्या खचार्चा अंदाज घेऊन तो खर्च कसा कमी करता येईल. यासाठी प्रयत्न करणे असे असते. या कमिटीचे सदस्य आणि त्यांचे केंद्रीय पाहुणे मिळून जवळजवळ अडीचशे ते साडेतीनशे लोक असतात. ही समिती चालू राहावी. म्हणून समितीच्या सेवेसाठी जवळपास तेवढेच अधिकारी कर्मचारी असतात. या अंदाज समितीचा सर्व खर्च राज्य शासनाच्या तिजोरीतून केला जातो. आपल्या कर्जबाजारी असलेल्या आणि अनेक योजनांसाठी निधींची चणचण असलेल्या या राज्यातील अशाच अंदाज समितीचा दौरा मुंबईतून मुंबईतच होता. आता खर्च कमी करण्यासाठी तो खर्च वाढवला गेला पाहिजे. असा कदाचित या कमिटीचा किंवा समितीचा समज असावा. खर्च कसा आणि कुठे वाढवता येईल याची सुरुवात स्वतःपासून करून तो कमी कसा करता येईल. याचे सखोल चिंतन करण्यासाठी या समितीचे साग्रसंगीत उदरभरण करणे गरजेचे असते. किंबहुना ते ओघाने येतेच. आता यासाठी झालेल्या खर्चाकडे पाहूया. या समितीच्या सदस्यांना जेवण वाढण्यात येणाऱ्या चांदीच्या ताटाचे भाडे अवघे ५५० होते. या ताटात जे जेवण वाढण्यात येणार होते. त्या प्रत्येक थाळीचा दर ४५०० होता. म्हणजे एका माणसाच्या थाळीचा खर्च (चांदीच्या ताटाचे भाडे पकडून) पाच हजार पन्नास रुपये होता. त्यावर नेहमीप्रमाणे जीएसटीचा खर्च असेलच. तो वेगळा आहे त्यामुळे तात्पुरता तो सोडून देऊया. आता पाच हजार पन्नास गुणिले सहाशे या गणिताचा हिशेब करण्याची आमची बुद्धी आणि क्षमता नाही. अशा या श्रीमंती जेवणानंतर खर्चात कपात कशी करणार. यावर चर्चा झाल्यावर बहुतेक सध्या महाराष्ट्रात दहा-बारा रुपये शिवभोजन थाळी मिळते. त्या थाळीच्या दरात तीन ते चार रुपयाची वाढ केल्यावर बऱ्यापैकी फायदा होईल. म्हणजेच प्रत्येक थाळीमागे जे सरकारी अनुदान दिले जाते. त्यात कोट्यवधी रुपयांची बचत होईल. असा या समितीचा अंदाज कदाचित निघू शकतो. आता पाच हजार पन्नास रुपयांच्या थाळीत काय काय होते. त्याची माहिती अशी आहे की, त्यात पुरणपोळी होती. ती पुरणपोळी मुंबईतीलच कुटुंब सखीच्या स्टॉलवर अवघ्या वीस किंवा २५ रुपयात मिळते. अंदाज समितीला वाढलेल्या गरमागरम पुरणपोळी वर लोणकढ्या तुपाची धार होती. ही आमची लोणकढी थाप नाही. त्यासोबतच दहीवडे, वेगवेगळ्या प्रकारच्या खिरीचे पदार्थ, राईस प्रिपेरेशन मध्ये पुलाव आणि बियाणींच्या वेगवेगळ्या रेसिपी अगदी जातीने हजर होत्या. त्यामध्ये बासमती, वाडा कोलम ते दिल्ली राईस पर्यंतचे वेगवेगळे प्रकार, दोन-चार प्रकारच्या शाकाहारी अतिशय उत्तम पनीर आणि चीजयुक्त भाज्या अगदी वरमाई सारख्या मिरवत होत्या. त्या सोबत शाही नवरत्न कोरमा या विशेष शाकाहारी भाजीचाही समावेश होता. अंदाज समिती मधल्या मत्स्यप्रेमींसाठी सध्या मासेमारी बंद असली. तरी फ्रोजन फिश मधील लपापेदार तळलेल्या सुरमईचा आणि पापलेटचा एक वेगळाच रवा फ्राय आणि तवा फ्राय असा खास बेत होता. बाकी चिकन मटण यामध्ये रस्सा, विशेष करून मालवणी रस्सा, कोकणी रस्सा, बोनलेस आणि स्पेशल बटर मध्ये फ्राय केलेल्या वेगवेगळ्या डिश सुद्धा उपलब्ध होत्या. एवढा मोठा शाही सरंजाम खाऊन झाल्यावर आणि त्यामुळे पोट फुगल्यानंतर उतारा म्हणून वेगवेगळ्या बादशाही फालूद्यांचे आणि वेगवेगळ्या फ्लेवरच्या कुल्फींचे विशेष आईस्क्रीमही त्यांच्यासाठी उपलब्ध होते. आपल्या राज्यातील सर्वसामान्य मध्यमवर्गीय परिवाराचा महिन्याभराचा चार ते पाच सदस्यांचा खर्च साधारणपणे पाच ते साडेपाच हजार रुपये असतो. तो नेमका किती असतो. याचे सर्व किंवा अंदाज या अंदाज समित्यांनीच करावे अशी आमची शिफारस आहे. कोणताही माणूस जो श्रमजीवी आहे. तो साधारणपणे एका महिन्यात एका जेवणात अडीचशे ते तीनशे ग्रॅम फार्फार तर ४०० ग्राम अन्न खातो. म्हणजे प्रति ग्रॅम प्रत्येक माणसासाठी किती खर्च केला गेला. याचे गणितही याच समितीने करावे. या भोजनामध्ये आमच्यासारख्या सामान्य जनांना आमंत्रण अजिबातच नव्हते. म्हणूनच आम्ही हे शब्दभोजन खास करून करीत आहोत. विशेष म्हणजे या समितीने काही अतिउच्च समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात नव्हे तर फक्त मुंबईत दोन-तीन भाषांमध्ये प्रकाशित होणाऱ्या अतिउच्च वर्गीय प्रतिनिधींना म्हणजेच काही विशेष पत्रकारांना विशेष करून आमंत्रित केले होते. त्यामुळे अशा या लोकप्रतिनिधींच्या मेजवानीला नावे ठेवणाऱ्या महाराष्ट्र टाइम्सच्या पूर्वी संपादक असलेल्या गोविंदराव तळवलकर यांची आठवण येत आहे. काही वर्षापूर्वी माजी आमदार शंकरराव मोहिते पाटील यांच्या चिरंजीवाच्या लग्नात एक लक्ष लोकांना भोजन देऊन त्याचा खर्च त्यांनी उचलला होता. त्या एक लक्ष लोकांच्या भोजनाचा जेवढा खर्च होता. त्यापेक्षा जास्त खर्च या साधारण 250 ते 500 लोकांच्या भोजनात केला गेला. असे आम्ही नाही तर बरेच लोक म्हणतात. ते लक्ष भोजन होते आजचे हे लक्षात राहणारे भोजन आहे. यात सर्वपक्षीय योजनानंदी भोजनानंदात रममाण होणारे अनेक जण सामील झाले होते. बाकी ताजमहाल हॉटेल आणि ट्रायडेंट हॉटेल यामध्ये राहणा?या व्हीआयपी आणि त्यांच्या अधिका?यांच्या खर्चाबद्दल न बोललेलेच बरे. अंदाज समितीच्या रूपाने शाही भोजन खाणा?या सर्व प्रकारची कृपादृष्टी असलेल्या, या सर्व भोजनभाऊंना पुढच्या वेळी सोन्याच्या ताटात अन्न मिळावे. अशा आमच्या आतापासूनच शुभेच्छा!


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


समन्वय समितीत चर्चा पूर्ण : कार्यकर्त्यांना चॉकलेट वाटपाची तयारी?

# महामंडळ वाटप लवकरच!



**■ दीपक कैतके, मुंबई, दि. २५ :**
राज्यात लवकरच विविध महामंडळांच्या पदांवर नियुक्त्यांचा निर्णय घेतला जाणार आहे. महायुतीच्या समन्वय समितीच्या बैठकीत यावर सकारात्मक चर्चा झाल्याचे सूत्रांकडून समजते. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची पार्श्वभूमी लक्षात घेता, ही घोषणा कार्यकर्त्यांना दिलेले निवडणुकीपुर्वीचे 'चॉकलेट' नाही ना? असा सवाल राजकीय वर्तुळात केला जात आहे.

**नाराजी शमवण्यासाठी डोस?**

महायुतीतील घटक पक्षांमध्ये गेल्या काही महिन्यांपासून महामंडळ नियुक्त्यांच्या वाटपावरून नाराजीचा सूर होता. अनेक पदे रिक्त असून, कार्यकर्त्यांना 'हक्काचे सत्ताकेंद्र' मिळालेले नाही, अशी भावना कार्यकर्त्यांमध्ये आहे. याच पार्श्वभूमीवर आता समन्वय समितीने लवकरच वाटपाचे निकष जाहीर करण्याची तयारी दर्शवली असून, येत्या काही दिवसांत प्रत्यक्ष नियुक्त्या होतील, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

**राजकीय समीकरणांचा आधार?**

महामंडळ वाटपात एखाद्या व्यक्तीची कामगिरी, पात्रता किंवा त्या महामंडळासाठी केलेले योगदान या गोष्टी गौण ठरत आहेत, अशी टीका होत आहे. कुठल्याही महामंडळाने काय काम केलं? ते नीट होतंय का? हाच मूलभूत मुद्दा कुठेही चर्चेत नाही, असा सवाल अनेक जाणकार उपस्थित करत आहेत.

महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्या आदी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर असताना, कार्यकर्त्यांच्या नाराजीचा भडका उडू नये, यासाठीच ही तत्परता दाखवली जात आहे का? सत्ता गाजवताना कार्यकर्त्यांवर विसर पडतो आणि निवडणुका आल्या की महामंडळाच्या गाजराने त्यांना फसवलं जातं, अशी प्रतिक्रिया काही कार्यकर्त्यांतून उमटत आहे.

सध्या राज्यातील अनेक महामंडळे केवळ नावालाच अस्तित्वात असून, तिथे नियोजन, विकास किंवा जनतेसाठी ठोस उपक्रम फारसे दिसत नाहीत. त्यामुळे पुन्हा नव्या नियुक्त्यांतही राजकीय उपकृतता आणि गटबाजीचाच प्रभाव दिसणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. निर्णय जरी लवकर घेतला जाणार असला, तरी निर्णय घेणाऱ्यांची नीयत किती पारदर्शक आणि कार्यक्षम आहे, हेच खरे पाहण्याचे आहे!

## ५० वर्षापूर्वी लोकशाही संपवण्याचा प्रयत्न



**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :**
या देशात पन्नास वर्षांपूर्वी लोकशाहीला संपवण्याचा प्रयत्न झाला होता. स्वर्गीय इंदिरा गांधी यांनी केवळ आणीबाणी लागू करून विरोधातील सर्व नेत्यांना तुरुंगात टाकले नव्हते तर तर भारतीय संविधानात देखील बदल केला होता, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. 'संविधान हत्या दिवस' निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानातील मुलभूत अधिकार माज्यासाठी सर्वात महत्त्वपूर्ण असल्याचे म्हटले होते. मात्र तेच अधिकार इंदिरा गांधी यांनी संपवले होते. त्या जागेवर डायरेक्टिव्ह प्रिन्सिपलला जागा देण्यात आली होती. पंतप्रधान याच्या पदाला कोणत्याही न्यायालयाच्या कक्षेतून बाहेर काढण्यात आले होते, असा दावा देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.

फडणवीस म्हणाले की, इंदिरा गांधी यांनी पंतप्रधान पदाला अमर्याद अधिकार दिले होते. इतकेच नाही तर सर्वोच्च न्यायालयाला देखील संसदेच्या अंतर्गत आणण्याचा प्रयत्न संविधानाला बदलून करण्यात आला होता. भारतीय लोकशाहीला संपवण्याचे काम ५० वर्षांपूर्वी स्वर्गीय इंदिरा गांधी यांनी केले होते, असा आरोप त्यांनी केला.

भारताची लोकशाही वाचवण्यासाठी अटल बिहारी वाजपेयी, जॉर्ज फर्नांडिस, मोरारजी देसाई, लालकृष्ण अडवाणी यांच्यासारख्या मोठ्या नेत्यांनी मिळून अशी लढाई लढली की, ज्यामुळे भारताचे संविधान आणि भारताची लोकशाही वाचली, असेही ते म्हणाले.

२०२६ पासून सीबीएसई दहावीची

# परीक्षा दोनदा होणार

पहिली परीक्षा अनिवार्य दुसरी ऐच्छिक



**■ वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली, दि. २५ :**
सीबीएसई (केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ) चे दहावीचे विद्यार्थी २०२६ पासून वर्षातून दोनदा परीक्षा देतील.

परीक्षा नियंत्रक संयम भारद्वाज यांनी बुधवारी ही माहिती दिली. नवीन परीक्षा पद्धतीनुसार, पहिली परीक्षा सर्व विद्यार्थ्यांसाठी अनिवार्य असेल आणि दुसरी ऐच्छिक असेल.

पहिली परीक्षा फेब्रुवारीमध्ये आणि दुसरी मेमध्ये होईल. निकाल एप्रिल आणि जूनमध्ये जाहीर होतील. यासोबतच पुरवणी परीक्षा रद्द करण्यात आल्या आहेत. सध्या बारावी बोर्डाला हा निर्णय लागू होणार नाही.

दुसऱ्या परीक्षेत म्हणजेच पयार्यी परीक्षेत, विद्यार्थ्यांना विज्ञान, गणित, सामाजिक विज्ञान आणि भाषा यापैकी कोणत्याही ३ विषयांमध्ये त्यांची कामगिरी सुधारण्याची परवानगी असेल.

हिवाळी शाळांमधील विद्यार्थ्यांना दोन्हीपैकी कोणत्याही एका परीक्षेला बसण्याची परवानगी असेल.

जर एखाद्या विद्यार्थ्याने पहिल्या परीक्षेत ३ किंवा त्याहून अधिक विषयांमध्ये परीक्षा दिली नसेल, तर त्याला दुसऱ्या परीक्षेला बसण्याची परवानगी दिली जाणार नाही.

## अणूस्थळांचे नुकसान : इराणची कबुली

**■ वृत्तसंस्था, तेहरान, दि. २५ :**
२२ जून रोजी अमेरिकेने केलेल्या हल्ल्यानंतर इस्रायली एजंट इराणच्या फोर्डो अणुकार्यालयात गेले होते. त्यांनी सांगितले की फोर्डो अणुकार्यालय पूर्णपणे नष्ट झाले आहे. इराणनेही तशी कबुली दिली आहे.

अमेरिकन मीडिया हाऊसेस सीएनएन आणि न्यू यॉर्क टाईम्सने दावा केला आहे की इराणच्या अणुकार्यालयांवर अमेरिकेच्या हल्ल्यांमुळे त्यांच्या अणुकार्यालयाचे फारसे नुकसान झाले नाही.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बुधवारी नेदरलँड्समधील हेग येथे झालेल्या नाटो शिखर परिषदेत माध्यमांशी संवाद साधला. यामध्ये त्यांनी म्हटले आहे की जर इराणने आपला अणुकार्यक्रम पुन्हा सुरू केला तर ते पुन्हा हल्ला करतील.

राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ट्रुथवर मीडिया रिपोर्ट्स खोटे असल्याचे म्हटले आहे. त्यांनी लिहिले आहे की, 'सीएनएन आणि न्यू यॉर्क टाईम्सने इतिहासातील सर्वात यशस्वी लष्करी हल्ल्यांपैकी एकाला बदनाम करण्याचा प्रयत्न केला आहे.'

इस्रायल आणि इराणमधील युद्धाच्या १२ व्या दिवशी मंगळवारी युद्धबंदी झाली. दोन्ही देशांनी याची पुष्टी केली आहे आणि या युद्धात आपला विजय झाल्याचा दावाही केला आहे.

इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू म्हणाले की, इस्रायलने इराणविरुद्ध ऐतिहासिक विजय मिळवला आहे, जो पिढ्यानपिढ्या लक्षात राहील.






राज्यातील आमदार, खासदारांना

# चांदीच्या ताटात पंचपक्क्वान

थाळीचे भाडे ५५०, तर भोजनाचा खर्च ४ हजार



**■ दीपक कैतके, मुंबई, दि. २५ :**
संसद व विधिमंडळाची अंदाज समिती ही प्रामुख्याने सरकारला काटकसरीचा सल्ला देते. पण याच समितीच्या अध्यक्ष व सदस्यांच्या २ दिवसांच्या जेवणावर चांदीच्या थाळीचा वापर करून त्यावर लाखोंचा खर्च करण्यात आल्याची बाब समोर आली आहे.

संसद व व राज्य विधिमंडळ अंदाज समितीच्या अध्यक्ष व सदस्यांच्या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचा मंगळवारी मुंबईत समारोप झाला. या परिषदेला अध्यक्ष व सदस्य असे एकूण २५० विशेष व ३५० अधिकारी असे एकूण ६०० जण उपस्थित झाले होते. या पाहुण्यांच्या स्वागतासाठी विधिमंडळाबाहेर ४० फूट उंचीच्या फलकांच्या भिंती उभ्या करण्यात आल्या होत्या.

विशेष पाहुण्यांच्या निवासाची सोय हॉटेल जात पॅलेस, तर त्यांच्यासोबतच्या अधिकाऱ्यांची हॉटेल ट्रायडंटला करण्यात आली होती. काटकसरीवर चर्चा करण्यासाठी आलेल्या या पाहुण्यांच्या जेवणासाठी ताटे, चमचे, वाट्या व ग्लास हे चक्क चांदीचे होते.

पाहुण्यांच्या भोजनाची व्यवस्था निखील केटरर्सकडे होती. यासाठी चांदीची भांडी भाड्याने आणली होती. एका ताटाचे दिवसाचे भाडे ५५० रुपये असल्याची माहिती केटरर्स कंपनीचे व्यवस्थापक निखील टिपणीस यांनी दिली. भोजनात कोथिंबीर वडी, मालवणी करी, सुरमई फ्राय, दहीवडे, बटाट्याची भाजी व पुरण पोळी असा माठी मेन्यू होता. एका थाळीचा दर ४ हजार रुपये होता. विधिमंडळातील अधिकाऱ्यांनीच याची पुष्टी केली आहे.






# सोमय्यांना अजित पवारांचे खडेबोल



**■ महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २५ :**
भाजप नेते किरीट सोमय्या यांनी मशिदींमध्ये जाऊ नये. त्यांच्या तिथे जाण्यामुळे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असे स्पष्ट मत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बुधवारी सोमय्या यांना खडेबोल सुनावताना व्यक्त केले.

राज्यातील धार्मिक स्थळांवरील अनधिकृत भोंग्यांच्या मुद्यावर बुधवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात एक बैठक झाली.

त्यात अजित पवारांनी किरीट सोमय्या यांना उपरोक्त शब्दांत समज दिली. किरीट सोमय्या यांनी भोंग्यांच्या मुद्यावर थेट मशिदीत जाऊन तपासणी करत असल्याचे समोर आले होते. त्यावर मुस्लिम संघटनांच्या तीव्र आक्षेप घेतला होता. राज्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल. त्याला सर्वस्वी सोमय्या जबाबदार असतील, असे या संघटना म्हणाल्या होत्या.

## 'शिंदे गट निवडणुकांच्या मैदानात उतरतोय जोरात!'

**मुंबई :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांसाठी शिवसेना (शिंदे गट) आता सज्ज होत आहे. पक्षप्रमुख आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः पुढाकार घेत आपल्या आमदारांना राजकीय बळ देण्यासाठी व्यापक नियोजनाला सुरुवात केली आहे. याअंतर्गत शिंदे गटाने आपल्या मंत्र्यांवर निवडणुकीसाठी विभागनिहाय जबाबदाऱ्या सोपवल्या असून, विविध मतदारसंघांतील प्रलंबित कामांबाबत आढावा बैठका घेतल्या जात आहेत.

**निवडणूकपूर्व नियोजनाचा फॉर्म्युला सक्रिय**

नांदेड, पुणे, अंधेरी (पूर्व) या मतदारसंघातील पेंडिंग विकासकामांसंदर्भात अलीकडेच महत्वाच्या आढावा बैठकांचे आयोजन करण्यात आले.या बैठकीत स्थानिक पातळीवरील रस्ते, पाणीपुरवठा, गटारी, आरोग्य व शिक्षण क्षेत्रातील प्रलंबित प्रकल्पांबाबत चर्चा झाली. यामागचा उद्देश स्पष्ट आहे . विकासकामांची गती वाढवून मतदारांमध्ये विश्वास निर्माण करणे.

**शिंदे गटाच्या मंत्र्यांना निवडणुकीची फील्ड कमांड**

एकनाथ शिंदे यांनी आपल्या गटातील प्रत्येक मंत्र्याला विशिष्ट जिल्ह्यांची जबाबदारी सोपवली आहे, जिथे ते निवडणुकीसंदर्भात संघटनात्मक बांधणी, प्रचार आणि स्थानिक कामांच्या गतीवर लक्ष ठेवणार आहेत. हे पाऊल म्हणजे निवडणुकीपूर्वीचा एक स्पष्ट संदेश आहे. 'शिंदे गट निवडणुकीच्या मैदानात उतरतोय पूर्ण ताकदीने!

## मुंबई हायकोर्टाने प्रकाश आंबेडकरांची याचिका फेटाळली

**मुंबई :** वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतदानाची वेळ संपल्यावर ७६ लाख लोकांनी मतदान केल्याचा आरोप करत याबाबत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. ही याचिका उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. मुंबईचे रहिवासी असलेले याचिकाकर्ते चेतन चंद्रकांत अहिरे यांनी दाखल केलेल्या रिट याचिकेवर विचार करण्यास न्यायमूर्ती जी.एस. कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने नकार दिला. खंडपीठाने म्हटले आहे की याचिकेने निवडणुकीचा वेळ वाया घालवला, परंतु कुठे आक्षेप आकारले नाही. न्यायालयाने म्हटले, वरील तथ्यांच्या प्रकाशात, आम्हाला शंका नाही की ही याचिका फेटाळली पाहिजे. त्यानुसार ती फेटाळली जात आहे. याचिकेवर सुनावणी करण्यात या न्यायालयाचा वेळ संपूर्ण दिवस वाया गेला. असे असले तरी आम्ही कुठलेही शुल्क लावणार नाहीत, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

विधानसभा निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेत घोळ झाल्याने राज्यातील सर्व २८८ विधानसभा मतदारसंघांमधील जाहीर झालेले निकाल रद्द करावेत अशी मागणी याचिकाकर्त्याने न्यायालयात केली. अहिरे यांनी दाखल केलेल्या याचिकेत सायंकाळी ६ वाजताच्या अधिकृत मतदान वेळेनंतर जास्तीचे मतदान झाल्याचे अधोरेखित करण्यात आले होते, विशेषतः अंतिम मुदतीनंतर ७५ लाखांहून अधिक मते नोंदविण्यात आली, असा दावा करण्यात आला होता. याव्यतिरिक्त, त्यांनी ९० हून अधिक मतदारसंघांमध्ये मतदान झालेल्या आणि मोजलेल्या मतांमधील तफावतीकडे लक्ष वेधले.

## हिंदीच काय पहिलीपासून इंग्रजीही नको तारा भवाळकर यांची कणखर भूमिका



**मुंबई :** हिंदीच काय पहिलापासून इंग्रजीही नको. विद्यार्थ्यांना चौथीपर्यंत फक्त मातृभाषेतच शिक्षण द्या. जगाच्या पाठीवर कुठेही इतक्या भाषा इतक्या लहान वयात शिकवल्या जात नाहीत. मुलांना पाचवीपासून दुसरी भाषा आणि आठवीपासून तिसरी भाषा शिकवा. हे संपूर्ण शिक्षण क्षेत्राच्या आणि विद्यार्थ्यांच्या हिताचे आहे, अशी कणखर भूमिका साहित्य संमेलनाध्यक्ष आणि लोकसाहित्याच्या अभ्यासक डॉ. तारा भवाळकर यांनी माध्यमांशी बोलताना मांडली. सुप्रसिद्ध लेखक अरविंद जगताप यांनीही हिंदी सक्तीला विरोध केला. 'सक्तीची भक्ती काही कामाची नसते. त्याने उलट देवाचे बदनामी होते. आपण कितीतरी हिंदी लेखकांचे फॅन आहोत. पण ते आपलं प्रेम आहे. ती सक्ती नाही,' अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

## दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी 'डबल चान्स'!

### वर्षातून दोनदा बोर्ड परीक्षा, सर्वोत्तम निकाल ग्राह्य

**मुंबई :** दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी एक मोठी आणि महत्त्वाची बातमी! केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (उइडए) ने शिक्षण क्षेत्रात ऐतिहासिक पाऊल टाकत इयत्ता १० वीची बोर्ड परीक्षा आता वर्षातून दोनदा घेण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय २०२६ पासून लागू होणार असून, विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणवत्तेचे सर्वोत्तम दर्शन घडवण्याची संधी यातून मिळणार आहे.

**फेब्रुवारी आणि मे दोन परीक्षांची संधी, एकच उत्तम निकाल**

CBSE च्या नव्या धोरणानुसार, इयत्ता १० वीच्या परीक्षा फेब्रुवारी आणि मे महिन्यांमध्ये घेतल्या जातील. विद्यार्थ्यांना दोन्ही वेळा परीक्षेला बसण्याची संधी असेल आणि या दोन परीक्षांपैकी ज्या वेळेस उत्तम गुण मिळतील, तोच निकाल अंतिम मानला जाईल. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना एकाच वेळच्या परीक्षेचे दडपण जाणवणार नाही आणि चुकून काही कमी गुण मिळाल्यास ती भरपाई दुसऱ्या परीक्षेत करता येणार आहे.

**तणावमुक्त शिक्षण आणि सतत मूल्यांकन**

CBSE ने यामागचा हेतू स्पष्ट करताना म्हटलं आहे की, विद्यार्थ्यांवरील परीक्षेचा ताण कमी करणे, चुकांमधून शिकण्याची संधी देणे आणि शिक्षण अधिक लवचिक बनवणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे.या धोरणामुळे विद्यार्थ्यांची मानसिकता बदलणार असून शिक्षण ही केवळ एक परीक्षा नसून, एक विकासाची प्रक्रिया आहे, हा दृष्टिकोन रुजवण्याचा प्रयत्न आहे.

## शक्तिपीठ महामार्गावर मंत्रिमंडळ बैठकीत दोन्ही बाजूंचे मुद्दे मांडले

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २५ :

राज्यातील महत्त्वाकांक्षी 'शक्तिपीठ महामार्ग' योजनेवर आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या महामार्गाशी संबंधित दोन्ही पक्षांची मते सविस्तरपणे मांडण्यात आली. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी याबाबत माहिती देताना स्पष्ट केलं की, गृहनिर्माण मंत्री प्रकाश आबिटकर आणि सहकारमंत्री हसन मुश्रीफ यांना मंत्रिमंडळ बैठकीत स्वतंत्रपणे आपली बाजू मांडण्यासाठी वेळ देण्यात आला होता.

शक्तिपीठ महामार्गाच्या नियोजन, मार्गक्रमण आणि भूसंपादनाच्या मुद्द्यांवर काही मतभेद असून, यासंदर्भात जनतेच्या भावना आणि स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन दोन्ही मंत्र्यांनी आपली मते मांडली. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, ङ्गसरकार कोणत्याही प्रकल्पात लोकशाही मूल्यांचा विचार करते. त्यामुळे मंत्रिमंडळात प्रकाश आबिटकर आणि हसन मुश्रीफ यांना समान वेळ देऊन त्यांची बाजू ऐकून घेतली. पवनार (जि. वर्धा) ते पत्रादेवी (जि. सिंधुदुर्ग) असा प्रस्तावित शक्तिपीठ महामार्ग सुमारे १८ तीर्थक्षेत्रांना जोडणारा द्रुतगती मार्ग आहे. या महामार्गामुळे साडेतीन शक्तिपीठे, दोन ज्योतिर्लिंग आणि पंढरपूर-अंबेजोगाई यासारख्या प्रमुख तीर्थक्षेत्रांना जोडणं शक्य होणार आहे. महामार्गाच्या भूसंपादन व अंमलबजावणीसाठी २० हजार कोटींच्या निधीला मंत्रिमंडळानं मान्यता दिली आहे.

हा प्रकल्प महामंडळामार्फत राबवला जाणार असून, स्थानिक प्रश्न आणि अडचणी लक्षात घेत सर्व संबंधित मंत्र्यांचा सहभाग, त्यांची मते आणि सूचना यांना गांभीर्याने विचारात घेतले जातील, असं अजित पवार यांनी स्पष्ट केलं. या महामार्गामुळे पर्यटन, रोजगार, आध्यात्मिक आणि स्थानिक विकासाला चालना मिळणार असल्याचंही मंत्रिमंडळात अधोरेखित करण्यात आलं.

# नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

### प्रमुख धरणातून विसर्ग सुरू: विदर्भात जोरदार सरी कोसळण्याचा अंदाज



मुंबई महानगर आणि परिसर

■ महासागर प्रतिनिधी,
**मुंबई, दि. २५ :** मान्सूनने संपूर्ण राज्य व्यापले असून आज राज्यातील विविध भागात पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, मान्सून २०२५ मध्ये महाराष्ट्रात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. जून महिन्यात अवकाळी नंतर हा मान्सून सक्रीय आणि गतिमान राहिला आहे. गत वर्षीपेक्षा २६% जास्त पाऊस आतापर्यंत पडलेला आहे. आज आणि उद्या महाराष्ट्रात ढगाळ वातावरणासह अनेक भागांत मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. कोकण, मुंबई, पुणे, नाशिक, घाटमाथा, मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांत विजांसह जोरदार सरी कोसळण्याची शक्यता आहे. समुद्रकिनारी उंच लाटा आदळण्याचा इशारा देण्यात आला आहे, त्यामुळे मच्छीमारांना सतर्कतेचा सल्ला देण्यात आला आहे. कोल्हापूर, सातारा, अमरावती आणि नागपूर परिसरातही काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता आहे.

मुंबईसह ठाणे, पालघरमध्ये ङ्गयलो अलर्टङ्ग जाहीर करण्यात आला असून, निचऱ्याच्या भागात पाणी साचण्याची शक्यता लक्षात घेता स्थानिक प्रशासन सज्ज आहे. नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळावा, घराबाहेर पडताना छत्रीचा वापर करावा आणि हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करावे, असा सल्ला देखील प्रशासनाच्या वतीने? देण्यात आला आहे.

**कोकणासाठी ऑरेंज अलर्ट जारी**

कोकणात मुसळधार पाऊस सुरू आहे. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्गमध्ये सरासरीपेक्षा ३०-४०% अधिक पाऊस पडला आहे. तसेच या भागासाठी हवामान विभागाने आधीच ऑरेंज अलर्ट जारी केलेला आहे.

तसेच या भागात दरड कोसळण्याचा धोका देखील वाढला आहे. विभागातील नदी-नाल्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सांताक्रुझ वर ४२५.२मिमी, कुलाबा ४७७.८मिमी पावसाची नोंद झाली आहे. जून महिन्यात सरासरीच्या ८०% पाऊस झाला आहे. तसेच मुंबई आणि परिसरात आज देखील ढगाळ वातावरण असून थोडा पाऊस पडण्याची शक्यता आहे. पुढील चार दिवस हलका ते मध्यम पाऊस सुरू राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाच्या वतीने वर्तवण्यात आला आहे. तसेच समुद्रातील ४.५-४.८मीटर दरम्यान लाटा निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे समुद्रकिनारी चिंताजनक स्थिती निर्माण होऊ शकते.

**पुणे व कोकण घाट**-ताम्हिनी घाटात ३७० मिमी, लोणावळ्यात २०५ मिमी, इतर भागात ८०-१५०मिमी पावसाची नोंद करण्यात आली आहे. पुण्याजवळील खडकवासला धरणात ७०% पाणीसाठा आहे. पुण्यात हलका ते मध्यम पाऊस पडण्याचा अंदाज आहे. तर कोकण घाटात जोरदार भरण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. हवामान विभागने यलो अलर्ट जारी केल आहे.

राज्यातील प्रमुख उजनी, खडकवासला, गंगापूर, दारणा, नांदूर-मध्यमेश्वर आणि इतर मध्य-महाराष्ट्रातील धरणांमधून नियंत्रित पाणी विसर्ग सुरू आहे. यामुळे पुणे-मुठा नदी परिसर, नाशिकमधील नदीकाठ व ग्रामीण भाग, तसेच सोलापूर-पंढरपूमार्ग, या क्षेत्रांत सतर्कता आवश्यक आहे. स्थानिक प्रशासनाने बचाव तथा आपत्ती व्यवस्थापनासाठी सज्जता ठेवली आहे. नागरिकांनी प्रशासनिक सूचना पाळून सतर्क राहावे, असे आवाहन देखील करण्यात आले आहे.

# चौथ्या महिला धोरण २०२४च्या माध्यमातून महिला व मुलींसाठी सक्षम वातावरण तयार करणार!

### उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २५ :

चौथे महिला धोरण २०२४ जाहीर झाले असून या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी विविध विभागांनी प्रभावीपणे काम करावे.या धोरणाच्या माध्यमातून राज्य शासन महिला व मुलींसाठी सक्षम वातावरण तयार करत आहे. त्यामुळे मुंबई शहरातील महिलांसाठी असलेल्या योजनांबाबत एकाच ठिकाणी माहिती मिळण्यासाठी एक नवीन ॲप तयार करण्याचे स्पष्ट निर्देश उपमुख्यमंत्री व मुंबई शहर पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी येथे दिले. चौथे महिला धोरण २०२४ जिल्हास्तरीय अंमलबजावणी सुकाणु समितीची बैठक आज उपमुख्यमंत्री व मुंबई शहरचे पालकमंत्री शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली.यावेळी उपमुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधानसचिव नविन सोना,जिल्हाधिकारी आंचल गोयल,अपर जिल्हाधिकारी रवि रतन कटकधोंड,निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.शिवनंदा लंगडापुरे, उपजिल्हाधिकारी महादेव किरवले, समाजकल्याण अधिकारी रविकिरण पाटील, सहायक आयुक्त, कौशल्य विकास, मुंबई शहर शैलेश भगत, मुंबई शहरच्या महिला व बालविकास अधिकारी शोभा शेलार यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, मुंबई शहरातील लोकसंख्या लक्षात घेवून येथील नोकरदार महिलांसाठी हॉस्टेल, लहान मुलांसाठी पाळणाघर, झोपडपट्टी भागात तसेच इतर गरजू महिला असतील त्या ठिकाणी महिला बचत गट स्थापन करणे, बचतगटांना रोटेशन पध्दतीने स्टॉल उपलब्ध करून देणे, महिलांचा पर्यटन क्षेत्रात सहभाग वाढावा यासाठी पर्यटनाचे प्रकल्प विकसित करणे, महिला मच्छिमारांसाठी शासकीय योजना राबविणे यावर भर देण्यात यावा. आदिवासी महिलांसाठी असलेल्या विविध योजना प्रभावीपणे राबवाव्यात. घरांचा प्रश्न सोडवण्यासाठी नियोजित प्रकल्प वेळेत पूर्ण करणे, महिलांना आरोग्य सुविधा तत्काळ देणे तसेच काळानुरूप आरोग्य सुविधा वाढविणे याबाबत काम करावे. राज्य सरकार कडून सरकार आपल्या दारी, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, लखपती दीदी योजना, मुलींना मोफत उच्च शिक्षण देणे यासारख्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात असल्याचेही त्यांनी यावेळी नंतर पत्रकारांशी बोलताना सांगितले. राज्यातील महिला हिंसाचाराला आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना केल्या जात असून शासनाकडून राबविण्यात येणा-या सुरक्षा तसेच इतर महत्वपूर्ण योजना एकाच ॲपवर उपलब्ध होतील यासाठी मुंबई शहरसाठी ॲप विकसित करून ते ॲप सर्व महिलापर्यंत पोहोचवा. महिलांच्या मदतीसाठी राबवल्या जाणाऱ्या विविध योजना तत्काळ पोहोचवाव्यात. हेल्प डेस्कची व्याप्ती वाढवा,हिरकणी कक्ष नियमित सुरू ठेवा, महिला समुपदेशन केंद्रात तत्काळ समुपदेशन केले जावे, वन स्टॉप सेंटरमध्ये महिलांना सुविधा द्याव्यात.पोलीस स्टेशनमध्ये आल्यानंतर तक्रार देताना महिलांना आधार वाटला पाहिजे. त्यांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता तक्रार दाखल करावी अशा प्रकारचे वातावरण पोलीस स्टेशनमध्ये असावे. शासन महिलांच्या बाबतीत आलेल्या तक्रारी फास्ट ट्रॅकवर घेत आहे.कारण राज्याला एक ट्रिलीयन अर्थव्यवस्थेकडे नेण्यासाठी महिलांचाही मोठा वाटा असणे गरजेचे असल्याने प्रशासनानेही त्या दृष्टीने काम करावे असेही निर्देश दिल्याची माहितीही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिली.यावेळी जिल्हाधिकारी आंचल गोयल यांनी जिल्ह्यात चौथे महिला धोरण २०२४ च्या अनुषंगाने सुरू असलेल्या विविध योजनांची माहिती दिली.तर जिल्हा महिला व बालविकास अधिकारी शोभा शेलार यांनी चौथे महिला धोरण-२०२४ संदर्भात जिल्हास्तरीय सुकाणू समिती करत असलेल्या कामाचे सादरीकरण केले.

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची जाहिरात नियमबाह्य

### एमपीएससीवर कोणाचा दबाव? जितेंद्र आव्हाड यांचा आरोप



■ महासागर प्रतिनिधी,
**मुंबई, दि. २५ :** राज्य उत्पादन शुल्क विभागाने काढलेल्या जाहिरातीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी आक्षेप घेतला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने खात्यांतर्गत दुय्यम निरीक्षकपदासाठी जाहिरात काढली आहे. परंतु, ही जाहिरात नियमबाह्य असल्याचा आरोप जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. तसेच जाहिरातीमध्ये दुय्यम निरीक्षक पदासाठी लिपिक असलेल्या कर्मचाऱ्यांनाही प्रवेश देण्याचा निर्णय एमपीएससीने कोणाच्या दबावाखाली घेतला, असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने राज्य उत्पादन शुल्क विभागातील दुय्यम निरीक्षक पदाच्या १३७ जागांसाठी जाहिरात प्रसिद्ध केली आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी ही पदभरती असून ११५ पदे जवान संवर्गासाठी तर २२ पदे ही लिपिक संवर्गासाठी आहेत. परंतु, ही जाहिरात नियमबाह्य असल्याचे जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले आहे. जितेंद्र आव्हाड यांनी एक्सवर ट्विट करत जाहिरातीचे फोटो शेअर केले आहेत. या जाहिरातीवर आक्षेप घेत ते म्हणाले, राज्य उत्पादन शुल्क विभागाचा अजब कारभार! राज्य उत्पादन शुल्क विभागामध्ये दुय्यम निरीक्षक म्हणजेच सब इन्स्पेक्टर या पदांसाठी विभागीय भरतीची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

## इराण-इस्त्रायल्युद्धात भारताच्या भूमिकेवर शरद पवार नाराज



**मुंबई :** एकीकडे इराण जुना मित्र. त्याच्याकडून मोठ्या प्रमाणात तेल खरेदी. दुसरीकडे इस्रायलकडून कायम भारताला खंबीर पाठिंबा, तांत्रिक साहाय्य. यामुळे भारताने इराण-इस्रायल्युद्धात कोणतीही भूमिका घेतली नाही, असे म्हटले जाते. मात्र, यामुळे शरद पवार प्रचंड नाराज झाले आहेत. बघ्याची भूमिका घेतल्याने भारताला आता दूरगामी परिणाम भोगावे लागणार, असा अतिशय गंभीर इशारा त्यांनी दिला आहे. मुंबई येथे काही पत्रकारांना अनौपचारिक चर्चेसाठी बोलावून त्यांनी मनातल्या गोष्टी औपचारिकपणे व्यक्त केल्या. ते म्हणाले की, इराण-इस्रायल युद्धात भारताने बघ्याची भूमिका घेणे अचंबित करणारे आहे. अरब देशात मोठ्या प्रमाणावर भारतीय काम करतात. शिवाय तेलाचाही संबंध आहे. त्यामुळे या दोन देशांच्या युद्धामध्ये भूमिका न घेणे योग्य नाही, माळेगाव साखर कारखाना निवडणुकीत अजित पवारांचे पॅनल आघाडीवर असल्याचे स्पष्ट संकेत मिळू लागल्याने ते म्हणाले की, सरकारमध्ये मोठ्या पदावरील व्यक्तींनी सहकारी संस्थांच्या निवडणुक लढवू नये. मी माझ्या ४० वर्षांच्या कारकिर्दीत सरकारी पदावर असताना कधीही सहकारी संस्थांची निवडणूक लढलो नाही.

**तिसऱ्या भाषेचे ओझे नको, पण हिंदी शिकली पाहिजे**

सध्या पाचवीपासून मुले हिंदी शिकतात. त्यामुळे इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत हिंदी भाषेची सक्ती योग्य नाही. मात्र हिंदी भाषा शिकणेही तितकेच महत्वाचे आहे. देशातील सुमारे ५५ टक्के नागरिक हिंदी भाषा बोलतात, त्यामुळे हिंदीचा विरोध करण्याची गरजही नाही, असे दोन्ही बाजूंची सारवासारव करणारे वक्तव्य शरद पवारांनी केले.

# नाशिकमध्ये जून महिन्यात विक्रमी पाऊस

### गोदावरीला आठवडाभरात दुसऱ्यांदा पूर,शहरातील ऐतिहासिक मंदिरे आणि घाट पाण्याखाली

■ महासागर प्रतिनिधी,
**नाशिक , दि. २५ :** यंदाच्या जून महिन्यात नाशिक शहर आणि जिल्ह्यात झालेल्या जोरदार पावसाने गेल्या दहा वर्षांतील सर्व विक्रम मोडीत काढले असून, अवघ्या महिनाभरात तब्बल ४३९ मिमी पावसाची नोंद झाली आहे. सलग कोसळणाऱ्या पावसामुळे जिल्ह्यातील धरणांमध्ये जलसाठा झपाट्याने वाढला असून, गंगापूरसह अनेक धरणांतून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे गोदावरीला आठवडाभरात दुसऱ्यांदा पूर परिस्थिती निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले. नाशिक शहरातील अनेक ऐतिहासिक मंदिरे आणि घाट पाण्याखाली गेली आहेत. सध्या नाशिक व त्र्यंबकेश्वर परिसरात पावसाची संततधार सुरू असून, हवामान खात्याने पुढील काही दिवस पावसाचा जोर कायम राहील असा अंदाज वर्तवला आहे. परिणामी, धरणसाठ्यात



आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

नाशिकमध्ये गोदावरी नदीची पूरस्थिती सलग सहाव्या दिवशीही कायम आहे. दुतोंड्या मारुतीच्या कमरेपर्यंत पुराचे पाणी पोहोचले असून, रामकुंड आणि गोदा घाटाचा परिसर पूर्णपणे पाण्याखाली गेला आहे. गोदा घाटावरील अनेक मंदिरांना पुराच्या पाण्याने वेढा दिला आहे, तर अनेक लहान मंदिरे पूर्णपणे पाण्याखाली बुडाली आहेत. यामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, प्रशासनाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवले जात आहे.

**आठ दिवसांत धरणसाठ्यात १३ टक्के वाढ**

जिल्ह्यात सुरू असलेल्या संततधारेमुळे अवघ्या आठ दिवसांत धरणसाठ्यात तब्बल १३ टक्के वाढ झाली आहे. धरणांची सरासरी भरवण आता २५% वरून ३८% पर्यंत पोहोचली आहे. गंगापूर धरण ६५% क्षमतेने भरले असून, यामधून जवळपास ६ हजार क्यूसेकने पाणी गोदावरी नदीत सोडण्यात येत आहे. गंगापूरसह दारणा, कडवा आणि नांदूरमध्यमेश्वर या धरणांतूनही मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरू आहे. विशेषतः नांदूरमध्यमेश्वर बंधाऱ्यातून १५ हजार क्यूसेस वेगाने पाणी सोडले जात असून, गोदावरीच्या पाणी पातळीत झपाट्याने वाढ होत आहे. यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

# पुणे मेट्रोच्या विस्ताराला मंजुरी

### वनाज-चांदणीचौक आणि रामवाडी-वाघोलीमार्गासाठी ३,६२६ कोटी मंजूर



**पुणे , दि. २५ :** पुणे शहराच्या मेट्रो विस्तारीकरणासाठी सुरू असलेल्या पाठपुराव्याला यश आले असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने पुणे मेट्रो प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याला मंजुरी दिली आहे. त्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पुणेकरांच्या वतीने केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आभार मानले आहे. ?३,६२६.२४ कोटींचा हा प्रकल्प महा-मेट्रोमार्फतपुढील ४ वर्षांत पूर्ण करण्यात येणार आहे. मंजूर झालेल्या मेट्रो मार्ग मध्ये वनाज-चांदणीचौक (कॉरिडॉर २ए) आणि रामवाडी-वाघोली/विठ्ठलवाडी (कॉरिडॉर २बी) हे दोन उन्नत मार्ग समाविष्ट आहेत. या नवीन मेट्रो मार्गांच्या माध्यमातून वनाज-रामवाडीमार्गाचे विस्तारीकरण केले जाणार असून, पुणे शहराच्या पूर्व आणि पश्चिम भागाला गतिमान करण्यासाठी हे निर्णायक पाऊल ठरणार आहे. या मंजुरीसाठी नुकतीच केंद्रीय नगरविकास मंत्री मनोहरलाल खट्टर यांची भेट मुरलीधर मोहोळ यांनी घेतली होती. मंजुरी मिळालेल्या या १२.७५ किमी लांबीच्या मेट्रो मार्गावर १३ स्थानकं असतील, जी बावधन, कोथरूड, खराडी, वाघोलीसारख्या महत्त्वाच्या भागांना मेट्रोशी जोडतील. हा प्रकल्प आय टी हब्स, शैक्षणिक संस्था, निवासी व व्यावसायिक क्षेत्रांतील दैनंदिन प्रवासाला सुरक्षित, जलद आणि पर्यावरणपूरक पर्याय देईल. पुण्याची वाहतूक व्यवस्था सशक्त करणारा हा ऐतिहासिक निर्णय आहे.हे नवीन मार्ग जिल्हा न्यायालय इंटरचेंज स्थानकावरून लाईन-१(निगडी-कात्रज)आणि लाईन-३ (हिंजवडी-जिल्हान्यायालय) यांच्याशी जोडले जाणार आहे.चांदणी चौक व वाघोली येथे आंतर शहर बससेवा मेट्रोशी जोडली जाणार आहे.

## २६ जून आंतरराष्ट्रीय नशा निषेध दिवस

दरवर्षी २६ जूनला जगभर आंतरराष्ट्रीय नशा निरोधक दिवस साजरा केल्या जातो.नशेली वस्तुंचे निवारण व्हावे या उद्देशाने संयुक्त राष्ट्र महासभेने ७ डिसेंबर १९८७ला एक प्रस्ताव पारित केला व त्या अनुषंगाने युनोने १९८८ पासून दरवर्षी नशेली पदार्थांच्या सेवनाने होणाऱ्या दुष्परिणामाच्या प्रती समाजात जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने दरवर्षी २६ जूनला आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिवस म्हणून साजरा केल्या जातो.सध्याच्या आधुनिक युगात नशेच्या सेवनाचे प्रमाण वाढल्याने नशेली पदार्थांचा वाममार्गाने मोठा व्यापार आपल्याला दिसुन येतो. कोणतीही नशा असो शरिराला व आयुष्याला घातकच आहे.कारण नशा हा शब्दच असा आहे की प्रत्येकांचे आयुष्य उद्धवस्त करतो मग ती कोणतीही नशा असो.त्यामुळे आजच्या युवा पिढीने नशेली पदार्थांपासून सावधान रहाणे अत्यंत गरजेचे आहे.कारण नशेली वस्तू युवावर्गापर्यत पोहोचविण्याचे काम तस्करीच्या माध्यमातून केले जाते.भारतात बांगलादेश, पाकिस्तान, नेपाळ, ईरान, अफगाणिस्तान मार्गे विदेशी तस्कर नशेली पदार्थ पुरविण्याचे काम करीत असतात.ड्रग्स पुरवठ्याचे जाळे तस्करीच्या माध्यमातून संपूर्ण जगभर विनल्या गेले आहे.भारतार दर महिन्याला अवैधरित्या आलेली करोडो रुपयांची ड्रग्स,एमडी पकडली जाते.तरीही युवावर्गामध्ये नशेचे प्रमाण अजूनही कमी झालेले नाही ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.मागीलवर्षी २२ जून २०२४ ला गुजरातच्या समुद्र किनाऱ्यावर बीएसएफ जवानांनी १५० करोड रुपयांची ड्रग्स पकडली ही ड्रग्स कच्छच्या क्रिक भागात लावारिस पडलेली सापडली. सरकारी माहितीनुसार या ड्रग्सचे तार ईरान व अफगाणिस्तानशी असल्याचे सांगण्यात आले होते.यावरून स्पष्ट होते की काही विदेशी असामाजिक तत्व भारतीय युवा पिढीला नेशेच्या खाईत लोटण्याचे काम करीत आहे.त्यामुळे आजच्या तरुण पिढीने व युवा वर्गाने नशेली पदार्थांपासून सावध रहाने अत्यंत गरजेचे आहे.कारण कोणतीही नशा ही महाघातक असते. कोणत्याही नशेपासुन शरिराला यत्किंचितही लाभ होत नाही;उलट त्याचे शरिरावर व परिवारावर मोठ्या प्रमाणात दुष्परिणाम होतांना दिसतात. सध्याच्या परिस्थितीत हॉटेल किंवा हुक्का पार्लर मधुन ड्रग्सचा पुरवठा होतो हेही लक्षात आले आहे. त्यामुळे अशा हॉटेलवर प्रशासनाकडुन कठोर कारवाई व्हायला हवी.अशाच पध्दतीने पबमध्ये सुद्धा ड्रग्सचा गोरखधंदा चालत असावा याला सुध्दा नाकारता येत नाही.यावर प्रशासनाने लक्ष केंद्रित केले पाहिजेत.देशात नशेली पदार्थांवर प्रतीबंध आहे. परंतु तस्करीच्या माध्यमातून अफीम, गांजा, भांग, कोकेन,हेरोइन,एमडी सारखे अंमली पदार्थ युवा पिढीपर्यंत वाममार्गाने पोहचवु त्यांचे आयुष्य उद्धवस्त करण्याचे काम असामाजिक तत्व वेळोवेळी करीत असतात.परंतु आजचा युवावर्ग जागृक आहे त्यांनी प्रत्येक नशेली पदार्थांपासून सावध रहाले पाहिजे व त्याचा कडाडून विरोध करायला पाहिजे. देशासह जगातील युवावर्गाने २६ जूनला शपथ घेतली पाहिजे की मी माझ्यासाठी, माझ्या परिवारासाठी व देशाच्या भविष्यासाठी यापुढे कोणतीही नशा करणार नाही तेव्हाच खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिवस समजल्या जाईल.कारण ड्रग्सची नशा ही नशा करणाऱ्यांचे आयुष्याची छल्ली तर करतोच सोबतच परिवाराला असमंजस्यतेमध्ये टाकुन संपूर्ण परिवार विस्कळीत होतो. यामुळे संपूर्ण घर उध्वस्त होते याचे मुख्य कारण म्हणजे फक्त नशा.त्यामुळे कोणतीही नशा म्हणजे आयुष्याचा शेवट ही बाब सर्वांनीच लक्षात ठेवली पाहिजे.कोणतीही नशा असो ती शरीराचा विकास तर करीत नाहीच हालाकी शरिराला 'छल्ली' व छिन्नविछिन्न करण्याचे काम करीत असते व स्लोपॉयझनचे काम करून मृत्युला जवळ करीत असते.आपण साधारणतः नशेली वस्तू व पोषक वस्तू यांचा विचार केला तर मनुष्यासाठी नशेली वस्तूंच्या तुलनेत पोषक वस्तू खुपचं स्वस्त असतात. त्यामुळे नशा करणाऱ्यांनी मनावर ताबा ठेवुन नशेली पदार्थांचा विरोध करावा व युवकांनीच जगाला संदेश देवुन नशेली पदार्थांचा निषेध केला पाहिजे. कोणत्याही नशेली वस्तुंसाठी रांगेत उभे रहाने म्हणजे 'मृत्यूच्या रांगेत'उभे रहाल्यासारखे आहे. याची जानीव आजच्या युवा पिढीने लक्षात ठेवली पाहिजे. कोणीही कीतीही नशेली वस्तु देण्याचा प्रयत्न केला तरीही आपण जर आपल्या मनावर ताबा ठेवला तर कोणतीही नशेली वस्तु तुम्हाला स्पर्शसुध्द करू शकत नाही हेसुद्धा तेवढेच सत्य आहे.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत प्रत्येकांनी आपल्या आयुष्याची काळजी घ्यायला हवी.त्यामुळे कोणत्याही नशेपासुन सावधगिरी बाळगली पाहिजे.आपण सुदृढ रहालो तर आपली पिढी सुदृढ राहील' त्याचप्रमाणे 'आपण सुरक्षीतरीत्या जगलो तर तर देश सुरक्षित राहील, देश सुरक्षित रहाला तर जग अवश्य सुरक्षित होईल.याकरीता अंमली पदार्थ विरोधी दिनाच्या निमित्ताने आपण 'संकल्प' करूया की नशेली वस्तूला टाटा-बाय-बबरू या.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार)**

## ५ व ६ जुलै रोजी कारागृहातील दर्गा भाविकांसाठी खुला

**चंद्रपूर,दि २५जून :** चंद्रपूर जिल्हा कारागृहाच्या आतील परिसरात पुज्य हजरत मखदुम शाहबुद्दीन शहा उर्फ गैबीशहा वली यांचे समाधीस्थळी दरवषीप्रमाणे यावर्षी मोहर्रम सणानिमित्त ५ व ६ जुलै रोजी भाविकांसाठी खुला करण्यात येणार आहे. कारागृहात पुर्व प्रथेप्रमाणे उर्स (यात्रा) आयोजित करण्यात येत असल्याने समाधीच्या दर्शनाकरीता सर्व समाजातील भाविक दर्शनासाठी येत असतात. त्यामुळे सदर कालावधीत कारागृहाच्या आतील समाधीच्या दर्शनाकरीता प्रवेश देण्यात येणार आहे. कारागृहाचे आत कोणत्याही भाविकाला मोबाईल फोन, कमेरा, खाद्यपदार्थ उदा. पेढे, बर्फी अथवा इतर खाद्यपदार्थ नेण्यास मनाई करण्यात आले आहे.

## जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी २६ जून ते ४ जुलैदरम्यान विशेष मोहीम

**चंद्रपूर, दि. २५ जून :** राजर्षी शाहु महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, चंद्रपूर मार्फत सामाजिक न्याय दिन साजरा करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने २६ जून ते ४ जुलै या काळात विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.सत्र २०२५-२६ मध्ये एमएचटी-सीईटी, नीट, जेईई, एमबीए, बीएड, पीएचडी, बीएससी ॲग्री, बी.फार्म, बीएससी नर्सिंग इत्यादी सीईटी देऊन व्यावसायीक अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणारे व तंत्रशिक्षण पदविका अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाला प्रवेशित असणारे, ज्यांना अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे थेट व्दितीय वर्षाला प्रवेश घ्यावयाचे आहे.

# वरोरा तालुक्यातील भूसंपादनाची प्रकरणे तातडीने निकाली काढा

## राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर शेतकऱ्यांना आठ दिवसात आक्षेप नोंदवण्याच्या दिल्या सूचना

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २५ जून :** चंद्रपूर जिल्ह्याच्या वरोरा तालुक्यातील चार गावांमधील शेतकऱ्यांच्या भूसंपादनाचा विषय तातडीने मार्गी लावावा आणि संबंधित शेतकऱ्यांनी आठ दिवसाच्या आत लवादाकडे आक्षेप नोंदवावे तसेच पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शेतीचे नुकसान होणार नाही याची काळजी रेल्वे प्रशासनाने घ्यावी, अशा सूचना राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांनी आज येथे दिल्या.



विभागीय आयुक्त कार्यालयात आज श्री. अहीर यांच्या अध्यक्षतेखाली चंद्रपूर जिल्ह्याच्या वरोरा तालुक्यातील माजरी एरिया अमलगमेटेड एकोणा १ व २ येथे रेल्वे सायडीयसह लोडींग सिस्टीम ट्रॅक बांधकामाच्या भूसंपादनाबाबत बैठक घेण्यात आली. विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा, विभागीय आयुक्तालयातील अपर आयुक्त प्रदीप कुलकर्णी, चंद्रपूरचे अपर जिल्हाधिकारी नितीन व्यवहारे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

माजरी एरिया अमलगमेटेड एकोणा १ व २ येथे रेल्वे सायडीयसह लोडींग सिस्टीम ट्रॅक बांधकामासाठी दहेगाव, नायगाव, चरूरखटी आणि निमसडा येथील शेतक ?ंयांची २७.२४०६५ हेक्टर आर जमीन भूसंपादित करण्यात आली. मात्र, शेतक ?ंयांना भूसंपादनापोटी योग्य मुल्यांकन मिळाले नसल्याची तक्रार आहे.

याप्रकारणाबाबत अहीर यांनी शासन आणि शेतकऱ्यांचे मत समजून घेतले व आवश्यक माहिती यावेळी जाणून घेतली.

याप्रकरणात शासनाने नेमलेल्या लवादाने सखोल बाबींचा विचार करून निणऱ्य द्यावा, तसेच शेतकऱ्यांनी संबंधित यंत्रणेकडे हरकती व नोंदी सादर कराव्या, अशा सूचना श्री. अहीर यांनी दिल्या. तसेच याभागात भूसंपादन होवून सुरू असलेले रेल्वे सायडीयसह लोडींग सिस्टीम ट्रॅकचे बांधकाम सद्या शेतीची पेरणी लक्षात घेता शेतक ?ंयांना अडचणी निर्माण होणार नाहीत याची काळजी घेवून पार पाडावी,असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

# माणिकगढ कंपनीला नाहक त्रास आणि वाढता कामगार आक्रोश.

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**कोरपना, दि. २५ जून :** अल्ट्राटेक सिमेंट, माणिकगड गडचांदूर सतत आपल्या कार्यातून समाजाच्या व कामगारांच्या हितासाठी नेहमीच धडपडत असते.

सिमेंट उत्पादणाबरोबर सभोवतली गांवाचा विकास व्हावा व कामगारांना मुबलक सुविधा मिळाव्यात म्हणून कपंनीचे प्रशासन एक पाऊल पुढे असते.



माणिकगढ सिमेंट उधोय मागील ४०-४५ वर्षांपासून या भागात कार्यरत आहेत तसेच कंपनी तर्फे सर्व शासन पक्रिया पूर्ण करून जमीन अधिग्रहण केलेले आहेत तरी पन मागील काही दिवसापासून काही राजकीय व आर्थिक लाभपोटी काही लोंकामार्फत माईन्स लागतच्या आदिवासी लोकांना तसेच बाहेरील भाडे तत्वावर आणलेल्या लोकांना भडकवून कंपनीचे काम बंद करण्याचे व अडथळा निर्माण करण्याचे काम शासन व प्रशासन यंचे डोळ्यासमोर सुरु आहेत.

हा वाद माईन्स मधील जमीन अढीग्रहणाचा असून साधारण ४५ वर्षानंतर असे मुद्धे काबर आज समोर येत आहेत हा एक गहन प्रश्न आहेत.

काही दिवसापूर्वी माननीय जिल्हा अधिकारी, एस डी ओ राजुरा कार्यालय, तहसील कार्यालय, वन विभाग, भूमिअभिलेख यांचे कडून बॉम्बेझरी शिवरातील व कंपनी माईन्स संपादित जमीन यांची सर्व समक्ष मोजणी करण्यात आलीत व कंपनी भुसापादन वन क्षेत्रात आहे असे निष्पन्न झालेत व कंपनीकडे त्याबाबत सर्व कागद पत्रे उपलब्ध असल्याचे निष्पन्न झालेत. तरी सुद्धा आपला निजी स्वार्थ साधण्याकरिता मागील काही दिवसापासून आंदोलन सुरु आहेत. हा वाद माईन्स मधील भुसंपदानाचा असून, आदिवासी जनतेला भडकावून माणिकगढ माईन्स मध्ये आंदोलन करण्यात येत आहेत हे आंदोलनाचे रूप वाढत जाऊन त्याचा त्रास आता माईन्स मध्ये काम करणाऱ्या कामगारांना व माईन्स मधील रहिवासी परिवाराना होत आहेत.ल तसेच या अगोदर माईन्स येथील अधिकाऱ्याला / कर्मचाऱ्यांना आंदोलन कर्त्यांकडून वारंवार शिवागिळ, मारपीठ, कंपनी संपतीची जाळ पोळ, तोड फोड सतत सुरु आहेत.

या सर्व कृत्या मुळे माणिकगढचे कार्यरत कामगार हे आंदोलन कर्त्यांचा विरोधात उभे झाले आहेत. सततच्या बंद मुळे कामगारामध्ये असंतोष निर्माण झाला आहेत.

कामगारांना होणारा त्रास बघून आज माणिकगड चे कामगार युनियन व कर्मचारी सुद्धा कंपनी प्रशासनाला काम सुरु ठेवण्याकारीता माईन्स येथे ठिय्या आंदोलन केलेत.

वारंवार कंपनीकडून व सरकार द्वारे विनंती करून सुद्धा हे आंदोलन आटोक्यात येत नाहीत ही खेदाची बाब आहेत.

कंपनी प्रशासन आदिवासी लोकांचा अजूनही विचार करत त्यांना सरकार देईल तो निणऱ्य मान्य आहेत. त्यासाठी कंपनी प्रशासन ने सरकार व आदिवासी बांधवाना विनंती केली आहेत.

# संजय डोंगरे सीडीसीसी बँकेच्या संचालक पदी अविरोध निवडून आल्याबद्दल आ भांगडिया यांनी केला सत्कार

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. २५ जून :** तालुक्यातील नेरी येथील चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष संजय डोंगरे यांची नुकताच भाजप महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष नामदार चंद्रशेखर बावणकुडे यांच्या उपस्थितीत नागपूर येथे भाजपा मध्ये रीतसर प्रवेश केला



जुलै महिन्यात चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक होऊ घातली आहे यामध्ये सहकार नेते संजय डोंगरे चिमूर तालुक्यातील एकमेव उमेदवार असल्यामुळे ते अविरोध निवडून आलेले आहेत फक्त औपचारिकता शिल्लक आहे

डोंगरे हे अविरोध निवडून आल्याबद्दल आ. बंटीभाऊ भांगडिया यांचे हस्ते शाल श्रीफळ व ग्रामगीता देऊन सत्कार करण्यात आला

याप्रसंगी भाजप तालुका अध्यक्ष राजूपाटील झाडे, भाजप ओबीसी आघाडी प्रदेश उपाध्यक्ष राजू देवतळे, भाजप युवा मोर्चा प्रदेश सचिव मनिष तुम्पल्लीवर,भाजप युवा नेते समीर राचलवार, संजय गांधी निराधार योजना समिती अध्यक्ष संजय नवघडे, माजी तालुका अध्यक्ष डॉ. दिलीप शिवरकर,चिमूर विविध कार्यकारी सोसायटी चे अध्यक्ष प्रशांत चिडे, बाजार समिती चे संचालक कैलाश धनोरे,भाजपा युवा मोर्चा शहर अध्यक्ष बंटी वनकर, गिरीश भोपे, युवा मोर्चा चे श्रेयश लाखे,अमित जुमडे, प्रवीण गणोरकर, भाजप दलित आघाडीचे नेते जयंत गौरकार,देविदास मोहिणकर आदी भाजप पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नागभीड तालुक्यातील एमआयडीसी नावापुरती रोजगार शून्य

**महासागर प्रतिनिधी**

**नागभीड, दि. २५ जून :** नागभीड येथे एम आय डी सी परिसरात अनेक भूखंड धारकांनी उद्योग सुरू करण्यासाठी लीजवर भूखंड उपलब्ध करून घेतले मात्र काही ठिकाणी लघु उद्योग उभारून अनुदान घेण्यापुरते करण्यात आले असून रोजगार निर्मिती करण्यासाठी कोणतेही प्रयत्न उद्योग धारकांनी केलेले नाही यामुळे बरेच उद्योग बंद पडले आहेत तसेच ज्या भूखंड धारकांनी उद्योग सुरू केले त्यांनी बेरोजगाची फसवणूक केल्याचे दिसून आले आहे यामुळे लघु उद्योग सुरू करून तालुक्यातील तरुण औद्योगिक प्रशिक्षण घेतलेल्या बेरोजगार पासून मुक्तता मिळावी म्हणून राजकीय धोरण आखले जाईल यासाठी राजकीय पक्षाने पुढाकार घेतला पाहिजे असे होताना दिसत नाही यामुळे गेल्या ७०वर्षात उद्योग निर्मिती आणि रोजगार उपलब्धी यासाठी राजकीय पक्षाने काहीही केलेले दिसत नसल्याने उद्योग विरहित तालुका दिसत असून स्थानिक उत्पादनावर उद्योग सुरू करण्यासाठी धोरण राबविण्यात आले पाहिजेत जेणेकरून रोजगार निर्मिती होऊन बेरोजगार काम मिळेल अशी स्थिती नसल्याने नागभीड येथे एम आय डी सी ही नावापुरती असल्याचे दिसून येत आहे.



# महावितरण तर्फे बहिरम बाबा नगर वॉर्डातील लो वोल्टजची समस्येचे निवारण

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घूस, दि. २५ जून :** शहरातील बहिरम बाबा नगर वॉर्डात गेल्या अनेक दिवसापासून भर उन्हाळ्यात नागरिकांच्या घरातील फॅन कूलर यांना पुरेसा वीज पुरवठा मिळत नसल्याने त्यांनी काम करने बंद केल्याने नागरिक प्रचंड त्रस्त झाले होते.



काँग्रेस सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष रोशन दंतलवार यांनी संपूर्ण वॉर्ड वासियांच्या स्वाक्षरीचे निवेदन बनवून काँग्रेस अध्यक्ष राजुरेड्डी यांना दिले असता त्यांनी तातळीने महावितरण कार्यलयात जाऊन मुख्य अभियंता यांची भेट घेऊन तातळीने ही गंभीर समस्या निकाली काढण्याची सूचनावजा विनंती केली असता महावितरण कार्यलयाने तातळीने सदर परिसरात दोन नवीन विद्युतपोल लावून थ्री फेजचे करंट अन्य ठिकाणावरून देऊन ही समस्या कायमस्वरूपी निकाली काढल्याने नागरिकांनी सुटकेचा श्वास घेतला व रेड्डी यांचे आभार मानले.

## स्त्या करिता पालगाववासीय पुन्हा आक्रमक

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**कोरपना, दि. २५ जून :** मागील अनेक वर्षापासून पालगाव वासियांना सुलभ रस्त्या नसल्याकारणाने नाहक त्रास सहन करावा लागत आहे. हीच मागणी घेऊन ५ मे ला अल्ट्राटेक सिमेंट कंपनी आवाळपूर च्या नांदा येथील प्रवेशद्वारासमोर आंदोलन करण्यात आले होते परंतु कंपनी प्रशासन जुमानत नसल्याने पुन्हा एकदा आज पाल गावाची आक्रमक होऊन अल्ट्राटेक कंपनीच्या प्रवेशद्वारासमोर आमदार देवराव भोंगळे यांच्या नेतृत्वात आंदोलनात बसले आहे.

स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही पालगाव वासियांना रस्त्या नसल्याने नरक यातना भोगाव लागत आहे. यासाठी मागील अडीच ते तीन वर्षात पारगाव वासियांनी अनेकदा कंपनी प्रशासनाला पत्र दिले व आंदोलने सुद्धा केली. रस्त्या संदर्भात चर्चा सुद्धा करण्यात आली मात्र कंपनी वेळ मारून नेत असल्याने तसेच वेळोवेळी ग्रामवासी यांचा अपमान करीत असल्याने ०५ मे ला राजूरा विधानसभाचे आमदार देवराव भोंगळे व व पालगावचे सरपंच अरुण रागीट यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आले होते. स्वतः आमदार आंदोलन स्थळी ग्रामवासियांसोबत उपस्थित राहून आंदोलन केले अखेर तीन दिवसानंतर कंपनी प्रशासन नरमले व लिखित स्वरूपात ३० मे ला अल्ट्राटेक ते पालगाव असा रस्ता तयार करण्याचे लिखित पत्र दिले. मात्र जून महिना संपत आला तरी कामाला सुरुवात झाली नसल्याने संतप्त ग्रामवासीयांनी राजुरा विधानसभा क्षेत्राचे आमदार यांच्या नेतृत्वात पुनश्च अल्ट्राटेक कंपनीच्या प्रवेशद्वारासमोर आंदोलन सुरू केले. विशेष म्हणजे अल्ट्राटेकसिमेंट कंपनी च्या दत्तक गावामध्ये पालगाव या गावाचा समावेश असून लगतच कंपनीची खान सुद्धा आहे.

# आसापूरमध्ये अल्ट्राटेक,माणिकगडच्या वतीने महिलांना स्तन कॅन्सर, मासिक पाळी व्यवस्थापन मार्गदर्शन




**महासागर तालुका प्रतिनिधी**

**कोरपना , दि. २५ जून :** अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड, माणिकगड सिमेंट वर्क्सच्या वतीने असापूर या गावामध्ये महिलांना स्तनाचा कर्करोग आणि मासिक पाळी व्यवस्थापनाचे मार्गदर्शन करण्यात आले. त्यासोबतच महिलांना सॅनिटरी पॅड आणि जीवनसत्त्वे व लोहयुक्त सिरपचे वाटपही करण्यात आले.

सद्यस्थितीत महिलांमध्ये स्तन कॅन्सर आणि गर्भाशयाच्या कॅन्सरचे मोठ्या प्रमाणात प्रमाण वाढत आहे. त्यामुळे अशा विषयांवर महिलांना मार्गदर्शन होणे अत्यंत आवश्यक आहे, जेणेकरून महिला स्वतःची काळजी घेऊ शकतील. किशोरी मुली आणि महिला मासिक पाळी संदर्भात मोकळेपणाने बोलत नाहीत. महिलांमध्ये हा विषय आजही संवेदनशील आहे. महिला आणि किशोरी मुलींनी या विषयावर बोलले पाहिजे; या कार्यक्रमाच्या माध्यमातून तो एक छोटासा प्रयत्न केला गेला.

कार्यक्रमामध्ये डॉ. सना खान यांनी महिलांना आणि मुलींना अत्यंत मोलाचे असे मार्गदर्शन केले. गावातील सरपंच मंगेश सोयाम यांनी अल्ट्राटेक कंपनीचे मनापासून धन्यवाद मानले. सर्व गावकऱ्यांनी सुद्धा या कार्यक्रमाला प्रोत्साहन दिले आणि अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड, माणिकगड सिमेंट वर्क्सच्या सीएसआर टीमचे आभार मानले.



# आणीबाणीची पन्नाशी!

**भारत सरकारने दरवर्षी २५ जून हा दिवस संविधान हत्या दिवस म्हणून पाळण्याचा निर्णय घेतला आहे. हा दिवस १९७५ च्या आणीबाणीच्या अमानुष वेदना सहन करणाऱ्या सर्वांच्या मोठ्या योगदानाचे स्मरण करेल. या निमित्ताने आणीबाणीच्या आठवणी जाग्या करणारा हा लेख.**

---

२५ जून १९७५ रोजी भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात जारी केलेल्या आणीबाणी विषयीच्या आठवणी देशातील जनता कधीच विसरणार नाही, कारण जगातील सर्वात मोठ्या लोकशाही प्रधान देशामध्ये अशा प्रकारची घटना घडेल असे त्या अगोदर कुणाला स्वप्नातही वाटले नसेल.

आणीबाणी मध्ये व्यक्ती स्वातंत्र्यावर आलेले बंधन, वृत्तपत्रांची झालेली मुस्कटदाबी, सक्तीची नसबंदी संबंधीच्या घटना आणि दिल्लीच्या तुर्कमान गेट येथील गरीबांच्या झोपड्यांवर फिरवलेला बुलडोझर या सर्व घटना कधीही न विसरता येणाऱ्या होत्या.आणीबाणी टाळता आली असती का? त्या परिस्थितीत आणीबाणीची खरच गरज होती का? तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आपली पंतप्रधान पदाची खुर्ची वाचवण्यासाठी देशात आणीबाणी जारी केली का? असे अनेक प्रश्न आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर देशातील जनतेला पडले होते.

देशात आणीबाणी जारी केल्याला आता चार दशकांपेक्षा जास्त अवधी उलटून गेल्यानंतरही देशातील जनतेच्या मनातील आणीबाणी विषयीच्या आठवणी अद्याप पुसल्या गेलेल्या नाहीत.आणीबाणीच्या जखमेचे व्रण अद्याप कायम आहेत.त्या आणीबाणी विषयी या लेखात आपण विस्तृत आढावा घेणार आहोत.

अलाहाबाद उच्च न्यायालयाने तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या विरोधात निकाल देऊन त्यांची निवडणूक रद्द केल्यानंतरचा हा घटनाक्रम आहे.अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निकाल बाहेर आल्यानंतर काही तासांतच गुजरात विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर होऊ लागले.

सुरूवातीच्या निकालांवरून इंदिरा गांधी यांचा पक्ष (कॉंग्रेस) निवडणूकीत हरणार हे निश्चित झाले होते. कॉंग्रेस विरोधी पक्षांची मोट बांधून तयार झालेला जनता मोर्चा हा पक्ष कॉंग्रेसचा पराभव करून गुजरात मध्ये सत्तेवर येणार हे नक्की झाल्याने इंदिरा गांधी यांना दुहेरी धक्का बसला होता.एकीकडे अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार इंदिरा गांधी यांची निवडणूक रद्द झाली होती आणि दुसरीकडे गुजरात हे राज्य कॉंग्रेसच्या हातातून गेले होते.

अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निकालानंतर इंदिरा गांधी यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी विरोधकांकडून जोरदारपणे होऊ लागली होती. इंदिरा मस्ट गो असा नारा विरोधकांकडून देण्यात येत होता.

अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या विरोधात इंदिरा गांधी यांच्या कडून सर्वोच्च न्यायालयात अपील केले जाणार हे निश्चित होते आणि त्या ठिकाणी निकाल हा इंदिरा गांधी यांच्या बाजूने लागण्याची जास्त शक्यता होती.परंतु त्या प्रक्रियेमध्ये चार ते सहा महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता होती.

सर्वोच्च न्यायालयाकडून अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निकालाला विनाअट स्थगिती मिळाली असती तर इंदिरा गांधी यांना त्यांच्या पदावर राहण्यात कोणतीही अडचण येणार नव्हती. इंदिरा गांधी अल्पकाळासाठी आपले पद सोडण्याच्या तयारीत असल्याचे बोलले जात होते.

कोणत्याही प्रकारची राजकीय महत्त्वाकांक्षा नसलेले मंत्रीमंडळातील आपले सहकारी सरदार स्वरणसिंग यांच्याकडे त्या तात्पुरत्या काळासाठी पंतप्रधानपद सोपविणार असल्याची शक्यता वर्तविण्यात येत होती. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल त्यांच्या बाजूने लागल्यास त्या सन्मानाने पुन्हा पंतप्रधान पदावर येणार होत्या. परंतु तसे होणार नव्हते.

इंदिरा गांधी यांच्या निकटच्या वर्तुळातील अनेक जणांना असे वाटत होते की सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येईपर्यंत इंदिरा गांधी यांनी आपल्या पदावरून बाजूला होणे त्यांच्या करता आणि देशाकरता फायद्याचे ठरेल. परंतु इंदिरा गांधी यांच्या तोंडावर हे सांगण्याची त्यांची हिंमत नव्हती.

इंदिरा गांधी यांच्या मंत्रिमंडळातील जवळ जवळ सर्व सहकारी, कॉंग्रेसशासित राज्यांतील सर्व मुख्यमंत्री आणि कॉंग्रेसचे जवळ जवळ सर्व खासदार यांच्यात मात्र आपणच कसे जास्त निष्ठावंत आहोत, हे इंदिरा गांधी यांना दाखवण्यासाठी जणू स्पर्धाच सुरू होती.



अभय गोखले

इंदिरा गांधी यांनी आपले पद सोडण्याची बिलकूल आवश्यकता नाही असे ते इंदिरा गांधी यांना आग्रहाने सांगत होते. त्यांची निष्ठा किती खरी होती या बाबत संशयाला जरी वाव असला तरी त्यांना खरी भीती होती ती इंदिरा गांधी या तात्पुरत्या काळासाठी सुद्धा पदावरून दूर झाल्या तर आपल्या साम्राज्याला धक्का तर लागणार नाही ना?, इंदिरा गांधी यांच्या कृपेने त्यांनी जे साम्राज्य उभारले होते ते (त्या पदावर नसतील तर) कोसळणार तर नाही ना? अशी भीती त्यांना वाटत होती.

मात्र इंदिरा गांधी यांचे सुपुत्र संजय गांधी हे आपल्या मताबाबत ठाम होते.इंदिरा गांधी यांनी तात्पुरत्या काळासाठी राजीनामा देण्याची आवश्यकता नाही,असा सल्ला त्यांनी आपल्या आईला दिला होता. संजय गांधी यांनी तसा सल्ला दिल्यानंतर इंदिरा गांधी यांच्या निकटच्या वर्तुळातील त्यांचे सहकारी काय समजायचे ते समजले.

मग इंदिरा गांधी यांच्या निवासस्थानाबाहेर रोज सभा होऊ लागल्या. इंदिरा गांधी यांनी राजीनामा देण्याची गरज नाही हे सांगण्यासाठी त्या सभा आयोजित करण्यात आल्या होत्या.अर्थात या सभांना गर्दी जमवण्यासाठी शेजारच्या राज्यांतून बसेसद्वारे माणसे आणण्यात आली. यामध्ये अर्थातच कॉंग्रेसशासित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची फार मोठी मदत झाली.

जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखालील विरोधी पक्ष इंदिरा गांधी यांच्या राजीनाम्याची जोरदार मागणी करत होते.त्यांनी त्या करता मोठ्या सभा आयोजित केल्या होत्या, तसेच निषेध मोर्चेही काढले होते. याच सुमारास इंदिरा गांधी यांना विख्यात कायदेपंडित नानी पालखीवाला यांच्याकडून अनपेक्षितरीत्या पाठिंबा मिळाला. नानी पालखीवाला हे कॉंग्रेस विरोधी पक्षांचे सहानुभूतीदार समजले जात असल्याने त्यांनी दिलेला पाठिंबा आश्चर्यजनक असाच होता.

त्यांनी इंदिरा गांधी यांची केस लढवण्याची तयारी तर दाखवलीच शिवाय इंदिरा गांधी यांनी आपल्या पदाचा राजीनामा देण्याची कोणतीही आवश्यकता नसल्याचा सल्लाही दिला. २४ जून १९७५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने इंदिरा गांधी यांच्या अपिलाबद्दलचा आपला निकाल सुनावला.

सर्वोच्च न्यायालयाने अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निकालाला स्थगिती दिली, मात्र ती अट घालूनच. त्या अटीनुसार इंदिरा गांधी या त्यांच्या पदावर राहू शकणार होत्या, तसेच संसदेत त्या बोलूही शकणार होत्या, मात्र त्यांच्या अपिलाचा अंतिम निकाल लागेपर्यंत त्या संसदेत मतदान करु शकणार नव्हत्या.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेला हा निकाल जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखालील विरोधी पक्षांना उत्साहित करणारा होता.इंदिरा गांधी यांनी राजीनामा द्यावा म्हणून देशभर आंदोलन सुरू करण्याचा निर्णय जयप्रकाश नारायण यांनी जाहीर केला.

आपली ही योजना त्यांनी दिल्ली येथील रामलीला मैदानावरील प्रचंड जाहीर सभेत जाहीर केली. मात्र इंदिरा गांधी या गप्प बसणार नव्हत्या. विरोधकांच्या आव्हानाला तोंड देण्यासाठी त्यांनी एक योजना तयार केली होती, त्यामध्ये त्यांना त्यांच्या अगदी जवळच्या सहकाऱ्यांनी मदत केली होती. ही योजना अतिशय गुप्त ठेवण्यात आली होती.

ही योजना तयार करण्यात इंदिरा गांधी यांना सर्वात मोलाचे सहकार्य केले होते ते सिद्धार्थ शंकर रे यांनी. पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री असलेले सिद्धार्थ शंकर रे हे निपुण कायदेपंडित होते आणि इंदिरा गांधी यांना त्यांच्या लहानपणापासून ओळखत होते. सिद्धार्थ शंकर रे यांचे आजोबा सी.आर.दास आणि इंदिरा गांधी यांचे आजोबा मोतिलाल नेहरू हे चांगले मित्र होते.

२५ जून १९७५ रोजी रात्री अकरा वाजता इंदिरा गांधी राष्ट्रपती भवनात पोहोचल्या.त्यांच्या बरोबर सिद्धार्थ शंकर रे हे होते. देशामध्ये अंतर्गत आणीबाणी जारी करण्याचा निर्णय आपल्या सरकारने घेतला असल्याची माहिती इंदिरा गांधी यांनी राष्ट्रपती फक्रुद्दिन अली अहमद यांना दिली. त्या संबंधीचा आपल्या मंत्रिमंडळाने पारीत केलेला ठराव खरे पाहता इंदिरा गांधी यांनी राष्ट्रपतींना सादर करायला हवा होता.

परंतु सिद्धार्थ शंकर रे यांनी त्याची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट केले. या सर्व गोष्टी नंतर करता येतील, कारण पंतप्रधानांचा शब्द पुरेसा आहे, असे स्पष्टीकरण रे यांनी दिले. त्यावर राष्ट्रपतींनी कोणतेही स्पष्टीकरण मागितले नाही आणि कागदपत्रावर सही केली. त्यानंतर देशभरात आणीबाणी जारी करण्यात आली, जगातील सर्वात मोठी लोकशाही व्यवस्था, हुकूमशाही मध्ये परावर्तित झाली.

■ ■ ■

# परिक्षेत कमी गुण मिळाले म्हणजे अपयश नव्हे !

बारावी चाचणी परीक्षेत कमी गुण मिळाल्यामुळे पित्याने मुलीला बेदम मारहाण केली. यात तिचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना सांगलीतील आटपाडी तालुक्यात घडली. रागाच्या भरात हा अमानुष प्रकार घडला असल्याचे समोर आले आहे.

या घटनेवरुन पालकांना सांगावेसे वाटते की, परीक्षेत कमी गुण मिळाल्यामुळे मुलांवर रागावण्याऐवजी त्यांना समजून घेणं आवश्यक आहे. अपयशातून शिकण्याची संधी पालकांनी त्यांना द्यावी. मुलांची आवड, क्षमता ओळखून त्यानुसार मार्गदर्शन करणे अधिक फायदेशीर ठरते.

प्रेम, आधार आणि सकारात्मकतेने दिलेले प्रोत्साहनच मुलांना खऱ्या अर्थाने यशाच्या दिशेने घेऊन जाते. कधी कधी कमी गुण मिळालेलेच विद्यार्थी आयुष्यात मोठी भरारी घेतात. अपयश हे यशाच्या वाटेवरचं एक पाऊल असतं झ्र कमी गुण मिळाले म्हणजे अपयश नव्हे. प्रत्येक मुलाची, मुलीची क्षमता वेगळी असते. काही मुलं अभ्यासात चांगली असतात, तर काही कला, खेळ किंवा तंत्रज्ञानात उत्कृष्ट असतात. पालकांनी गुणाच्या आधारे मुलांची किंमत करू नये.

कमी गुण मिळणं किंवा नापास होणं म्हणजे आयुष्य संपलंच, असं नाही.₹ खरंतर, हे एक थांबलेलं पाऊल आहे झ्र संपूर्ण प्रवास नव्हे. अपयशातून शिकून पुढे जाणं हीच खरी यशाकडे नेणारी वाट आहे. अनेक यशस्वी लोकांनी सुरुवातीला अपयश पाहिलं, पण त्यांनी हार न मानता प्रयत्न सुरूच ठेवले. चूक झाली म्हणून संधी संपली असं नाही झ्र प्रत्येक नवीन दिवस नव्या संधी घेऊन येतो.



**ॲड. दत्तात्रय दिनकर फडतरे**
**पुणे. 7588072685**

शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकात लिहिलेलं ज्ञान नव्हे. ते अनुभवातून, संवादातून आणि पर्यावरणातून मिळणाऱ्या शिकवणीचा समावेशही असतो. शाळा हा शिक्षणाचा एक भाग आहे, पण खरी शिकवण आपल्याला आयुष्य देतं. नैतिक मूल्यं, सामाजिक जाणीव, संवादकौशल्य, सहकार्य आणि समजूतदारपणा हीसुद्धा शिक्षणाची महत्त्वाची अंगे आहेत.

शिक्षणाने माणूस विचार करणारा, संवेदनशील आणि जबाबदार बनतो. म्हणूनच, शिक्षणाचं खऱ्या अर्थाने महत्त्व शाळेच्या बाहेरही दिसून येतं. अशा अनेक यशस्वी व्यक्तींची उदाहरणे देता येतील. ज्यांनी कमी औपचारिक शिक्षण घेतले तरी आपल्या क्षेत्रात अपार यश मिळवलं आहे.

**सचिन तेंडुलकर :** क्रिकेटचा देव मानला जाणारा सचिनने शालेय शिक्षण पूर्ण केलं नव्हतं, पण क्रिकेट क्षेत्रात त्यांनी जागतिक कीर्ती मिळवली.

कैलाश सावंत (लोकल उद्योजक/ शेतकरी/ स्वयंपाकगृह चालक इ.) झ्र अशा अनेक ग्रामीण भागातील लोकांनी कमी शिक्षण असूनही स्वतःचा व्यवसाय उभा करून समाजात प्रेरणादायक उदाहरण निर्माण केलं आहे.

आपल्याकडे अशा अनेक स्त्रियांचे जीवनप्रवास प्रेरणादायी आहेत, ज्या कमी शिक्षण असूनही किंवा शालेय जीवनात अपयशी ठरल्या, तरी पुढे त्यांनी अथक मेहनतीने यश संपादन केलं. उदाहरण देता येतील.

**लता मंगेशकर :** भारताची गायनसम्राज्ञी. त्यांनी शिक्षण पूर्ण केलं नव्हतं, पण त्यांच्या आवाजाने आणि प्रतिभेने संपूर्ण जगाला मंत्रमुग्ध केलं.

**कल्पना सरोज :** यांचे सातवीत शिक्षण थांबले. बालविवाह, कौटुंबिक अत्याचार यांमुळे आत्महत्येचा प्रयत्न केला. पुढे मुंबईत छोटा व्यवसाय सुरू केला, कामगारांसोबत काम केलं. आज कमानी ट्यूब्स लिमिटेड₹ कंपनीच्या अध्यक्षा (Chairperson) . सरकारकडून पद्मश्री सन्मान प्राप्त झाला आहे . कल्पना सरोज यांना भारतातील ओरिजिनल स्लमडॉग मिलेनियर म्हणून ओळखले जाते.

**सुंदरी रविंद्रनाथ (संध्या बिंदू) :** शिक्षणात विशेष यश नव्हतं. स्वयंपाकाचा छंद होता, त्याचा उपयोग करून स्वतःची फूड ब्रँड सुरू केली. आज लाखो रुपयांची टर्नओव्हर असलेली गृहउद्योग मालकीण आहेत. अडचणी, पण हार न मानता पुढे गेल्या. आज त्या मोटिवेशनल स्पीकर, लेखक आहेत.

शिक्षण महत्त्वाचं असलं, तरी यशाचं एकमेव प्रमाण नाही. चिकाटी, मेहनत, आत्मविश्वास आणि जिद्द असेल तर कमी शिक्षण असतानाही महिलांनी मोठं यश मिळवलं आहे. शिक्षण महत्त्वाचं असलं तरी केवळ पदवीनेच यश मिळतं असं नाही. आत्मविश्वास, कौशल्य, चिकाटी आणि मेहनत हीसुद्धा यशाची गुरुकिल्ली असते.

गुण कमी मिळाले, म्हणजे संधी संपल्या नाहीत, नवीन सुरुवातीसाठी ती एक शिकवण असते. यश मोजण्यासाठी मार्कशिट नाही, तर मनातील जिद्द आणि कष्ट लागतात. परीक्षा हा जीवनातील एक टप्पा आहे झ्र अंतिम ध्येय नाही. गुण थोडे कमी असतील, पण तुमच्यातील क्षमता अमर्याद असते.एक वाईट निकाल, एक अपयशी टप्पा, हे तुमच्या आयुष्याचा शेवट नाही, तर बदलाची संधी आहे.

गुण कमी मिळाले म्हणजे अपयश नव्हे , गुण हे फक्त परीक्षा मोजतात, प्रतिभा नव्हे. यशासाठी गुण नाही, तर जिद्द आणि चिकाटी लागते. परीक्षेत मिळालेले कमी गुण हे शेवट नव्हे, ते फक्त सुरुवातीचे टप्पे असतात.

कधी कधी कमी गुण मिळालेलेच विद्यार्थी आयुष्यात मोठी भरारी घेतात.अपयश हे यशाच्या वाटेवरचं एक पाऊल असतं झ्र थांबू नका, पुढे चालत राहा. गुणांनी तुमची किंमत ठरत नाही, तुमचं कर्तृत्व ठरवतं. इतिहासात अशा अनेक व्यक्ती आहेत, ज्या शिक्षणात सामान्य होत्या, पण जीवनात असामान्य यश मिळवून गेल्या.

**थोडक्यात....**

सांगलीतील घडलेल्या घटनेवरुन पालकांना सांगवेसे वाटते की , परीक्षेत कमी गुण मिळाल्यामुळे मुलांवर रागावण्याऐवजी त्यांना समजून घेणं आवश्यक आहे. अपयशातून शिकण्याची संधी पालकांनी त्यांना द्यावी. तू हे करू शकतोस₹ तू हे करु शकतेस, असा आत्मविश्वास पालकांनी सतत दिला पाहिजे. मुलांची आवड, क्षमता ओळखून त्यानुसार मार्गदर्शन करणे अधिक फायदेशीर ठरते. प्रेम, आधार आणि सकारात्मकतेने दिलेले प्रोत्साहनच मुलांना खऱ्या अर्थाने यशाच्या दिशेने घेऊन जाते.

कमी गुण मिळाले म्हणजे अपयश नव्हे. प्रत्येक मुलाची क्षमता वेगळी असते. काही मुलं अभ्यासात चांगली असतात, तर काही कला, खेळ किंवा तंत्रज्ञानात उत्कृष्ट असतात. पालकांनी गुणाच्या आधारे मुलांची किंमत करू नये. त्यांना प्रेम, पाठिंबा आणि सकारात्मक मार्गदर्शन द्यावं.

मानसिक दबावामुळे अनेक मुलं निराश होतात. त्यामुळे पालकांनी मानसिकता बदलून, कायम त्यांच्या स्वप्नांना बळ द्यावं. त्यातच खऱ्या अर्थाने पालकत्व सामावलेले आहे .

■ ■ ■

# कर्करोग संशोधक डॉ. सुलोचना गवांदे

**(कालच्या अंकावरून पुढे)**

कर्करोगासारखे आजार हे विश्वव्यापी आहेत. ते कधीही, कुणालाही, कुठेही होऊ शकतात. त्यांची लक्षणे, उपाय आणि मुख्य म्हणजे प्रतिबंधक प्रयत्न हे सर्वसामान्य माणसापर्यंत पोचले तर रुग्णांना तर दिलासा मिळेलच परंतु या रोगाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता वाढेल.

हे ज्ञान बहुसंख्य लोकांपर्यंत पोचावे म्हणून गवांदे मॅडमचे ह्यकर्करोगः माहिती आणि अनुभवह्व हे पुस्तक जगातील अन्य भाषेत अनुवादित करण्यासाठी त्या त्या भाषिक व्यक्ती आणि संस्था यांनी स्वतःहून पुढे येण्याची गरज आहे.



**उत्तरार्ध**

**देवेंद्र भुजबळ**
**९८६९४८४८००**

गवांदे मॅडम इतक्या गंभीर विषयाशी निगडित असल्यामुळे त्या खूप कडक स्वभावाच्या, चेहऱ्यावर अती गंभीर भाव असलेल्या असतील, असे आपल्याला वाटेल. प्रत्यक्षात मात्र त्यांचा वागण्या-बोलण्यातील सहजपणा,आत्मियता पाहून पहिल्याच भेटीत त्या आपल्या आणि आपण त्यांचे होऊन जातो.

गर्व आणि अहंकाराचा लवलेश देखील त्यांच्यात नाहीये. कर्करोगावर संशोधन करणाऱ्या, त्या विषयी लिहिणाऱ्या, बोलणाऱ्या, जगभर होणाऱ्या परिषदांना सातत्याने उपस्थित राहणाऱ्या गवांदे मॅडम त्या याच का असा प्रश्न त्यांना पहिल्यांदाच भेटणाऱ्या व्यक्तीस निश्चितच पडत असणार यात मला तरी काही शंका वाटत नाही.

कर्करोगासारख्या गंभीर विषयावर संशोधन आणि सामाजिक जागरूकता करीत असतानाच ललित लेखन ही त्या खूप सुंदर करतात. मराठी भाषेवर त्यांचे उत्तम प्रभुत्व आहे. त्यांचे काही ललित लेख न्यूज स्टोरी टुडे पोर्टल आणि अन्य ठिकाणी प्रसिद्ध झाले आहेत.

आम्हा भुजबळ कुटुंबीयांसाठी गवांदे मॅडम यांची एक अविस्मरणीय आठवण आहे. आमची कन्या देवश्री हिने कोलंबिया विद्यापीठातून दोन वर्षांपूर्वी जेव्हा एम एस जर्नालिझम ही पदवी मिळवली होती,तेव्हा आम्ही पदवीदान समारंभासाठी अमेरिकेत गेलो असता त्यांनी आम्हा तिघांनाही त्यांच्या न्यू जर्सी येथील घरी अतिशय अगत्याने बोलावले होते.

पोर्टलच्या दुसऱ्या लेखिका, न्यू जर्सी येथीलच डॉ गौरी आणि त्याचे पती आशिष कंसारा यांना देखील आमंत्रित केले होते. त्यामुळे देवश्री चे एम एस चे सेलिब्रेशन आणि पोर्टलचे स्नेह मिलनच त्यांच्या घरी झाले.

या लेखाचे परीक्षण करताना गवांदे मॅडम यांनी एकच इच्छा व्यक्त केली, ती म्हणजे वाचकांनी त्यांचे पुस्तक किंवा यू ट्यूबवर उपलब्ध असलेले कार्यक्रम पाहून कर्करोगाबद्दल यथायोग्यरित्या जाणून घ्यावे आणि त्याबद्दल इतरांशी बोलावे. त्यातून बोध घेऊन या भयंकर व्याधीपासून स्वतःला आणि आपल्या कुटुंबाला कसे दूर ठेवता येईल हे शिकावे, त्यादृष्टीने प्रयत्न करावेत.

वाचकांना तर्कनिष्ठ विचार करण्यास प्रवृत्त करावे, त्यांनी अंधश्रद्धा किंवा भूलथापांना बळी पडून पैसे अथवा मूल्यवान वेळ वाया घालवू नये, जर कुणाला कर्करोगाचा सामना करण्याची वेळ आली ते सुजाणपणे, धैर्याने करण्यास मार्गदर्शन मिळावे, या हेतूने कर्करोगाच्या उपचारांवर चालणारे संशोधन व नवीन औषधे यांची माहिती दिली आहे. यामुळे सर्वसाधारण व्यक्तीची कर्करोगाविषयीची जाण वाढावी अशी त्यांची सार्थ अपेक्षा आहे.

मी, माझे कुटुंब, माझी नोकरी, माझा व्यवसाय इतकेच आपले जग सीमित न ठेवता या अवघड आणि गहन रोगाबद्दल साध्या भाषेत शास्त्रोक्त माहिती देत असलेल्या आणि आपल्याला कर्करोग होऊच नये म्हणून आपली जीवनशैली कशी असावी, या विषयी आंतरिक तळमळीने काम करीत असलेल्या डॉ सुलोचना गवांदे या स्वार्थ आणि परमार्थ याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. त्यांच्या या मानवतावादी प्रयत्नांमध्ये, उपक्रमांमध्ये आपण काही हातभार लावू शकत असल्यास अवश्य लावू या.

■ ■ ■



# व्हॉट्स गोईंग ऑन... आय एम नॉट कल्चर

बाई जपान ची, नव्वद हजार खर्च करून हजारो किलोमीटर वरून भारतातील लेण्या पाहण्यासाठी मुंबई ला उतरते. खाजगी बसने अजिंठा वेरूळला पोहचते. सोबत एक हाय रेजुलेशन कॅमेरा, मॅप, एक आठवडा लेण्यांचा अभ्यास, एक प्रश्नांची यादी, अजिंठा वेरूळला येऊन खूप बारकाईने अभ्यास करतात. काही दगडमातीचे नमुने सोबत घेतात लेणी, पहाड, दगडाचे फोटो काढतात. बनवण्याची प्रक्रिया समजुन घेतात.

कलाकृतीचे निरिक्षण करतात आणि ज्यावेळेस जपानची बाई लेण्याचे फोटो काढत असते. त्यावेळेस भारतातील मुलं त्या बाईचे फोटो काढ़त असतात. ही बाब त्या बाईला खटकते ती बाई त्या मुलांना समजावून सागते.

He U Man Don't Capture, I am Not Culture
(लेण्याकडे बोट दाखवत )
This Is Culture, U Take Their Photos

पन तरी ती २५,३० वर्षाची मुलं ऐकत नाहीत आणि म्हणतात, मॅम वन फोटो यु एंड मी...

ती बाई कंटाळुन... ठीक आहे म्हणते आणि मुलं त्या बाईच्या खांद्यावर हात ठेऊन फोटो काढतात. हे असले प्रकार वेरूळ, गोवा भारतात बऱ्याच ठिकाणी घडतात.

मग ती बाई जपानला जाऊन तिथल्या लोकाना माहिती देते की, भारतातील कैलास मंदिर जगातलं एकमेव असं मंदीर आहे की जे वरून खाली बांधत आणलेले आहे, लोणार सरोवर जगातलं उल्कापातानं तयार झालेले एकमेव सरोवर आहे, गोव्याला आंतराष्ट्रीय दर्जाचा समुद्रकिनारा आहे. आणि असं बरच काही, आणि आपल्या भारतातील मुलं घरी येऊन बाकीच्यांना सागतात की,

काय फॉरेनर होते? हा बघ फोटो हा ईथला हा तिथला फोटू, एखादा लेण्याजवळचा फेसबुकला टाकलेला फोटू पाहुन मित्र कमेंट करतो, Bro U Looking Hero

फक्त दिसत नाही ते हजारो वर्षापूर्वी तयार झालेली आजच्या इंजीनीअरला लाजवेल अशी कलाकृती. हा कलाकृतीचा अप्रतिम नमुना जो आपल्या देशाची शान असतो आणि जिथे जाउन आपल्यातील काही नमुने दीलच्या पानात A For Apple आणी B For Boll लिहुन येतात.

त्या मूर्खांना कलाकृतीबद्दल माहिती काय असणार? कारण इथे इतिहास हा विषय बोरींग समजला जातो, मराठी मध्ये टअ करणाऱ्यांना साधी कविता करता येत नाही, आणि आयुष्य AC मध्ये जाणारे ज्यांच्या पायाला माती लागत नाही, ते लोक शेतीवर आणी बिसलरी चे पाणी पिणारे लोक दूष्काळावर शोधनिबंध लिहित आहेत ....

१०० रूपयात दिवसभर काम करणारा घाम गाळतो आणि दिवसाला खूर्चीवर बसुन हजारो कमावणारे AC ची मागणी करत आहेत. ही आहे शोकांतिका.!

■ ■ ■

# स्वयंपाकाचे तेल पुन्हा गरम करून वापरल्याने अनेक आजारांना निमंत्रण



भजी, चिप्स, समोसे किंवा काही भाज्या बनवण्यासाठी भरपूर तेल लागते. अशा परिस्थितीत, बरेच लोक उरलेले तेल साठवून ठेवतात. नंतर ते पुन्हा गरम करतात आणि दुसरे काहीतरी बनवण्यासाठी वापरतात. पण ते तेल पुन्हा पुन्हा गरम करून वापरल्याने तुमच्या आरोग्याला हानी पोहोचू शकते.

स्वयंपाकाचे तेल पुन्हा गरम करणे आणि ते पुन्हा पुन्हा वापरणे आरोग्यासाठी हानिकारक आहे. तेल पुन्हा पुन्हा गरम केले की त्यात ट्रान्स फॅट्स आणि फ्री रॅडिकल्ससारखे हानिकारक रसायने तयार होतात.

वापरलेले तेल पुन्हा गरम करून उपयोगात आणल्यास पोटदुखी, गॅस, आम्लता यासारख्या समस्या उद्भवू शकतात. जुन्या तेलाची चव, रंग आणि सुगंध देखील खराब होतो, ज्यामुळे अन्न हानिकारक बनते. वापरलेले तेल वारंवार वापरू नका. कारण त्यात जंतू आणि विषारी घटक वाढू शकतात. म्हणून, नेहमी ताज्या तेलात अन्न शिजवा आणि एकदा वापरल्यानंतर तेल पुन्हा गरम करणे टाळा.

**खराब कोलेस्ट्रॉल वाढवते :** काळे, धुरकट तेल पुन्हा गरम केल्याने शरीरात एलडीएल किंवा वाईट कोलेस्टेरॉलची पातळी वाढू शकते. एलडीएल कोलेस्टेरॉलचे उच्च प्रमाण हृदयरोग, स्ट्रोक आणि छातीत दुखण्याचा धोका वाढवू शकते.

**आम्लाचे प्रमाण वाढते :** जर तेल वारंवार गरम केले तर त्यात आम्लाचे प्रमाण वाढते. जर तुम्हाला पोटात आणि घशात जळजळ जाणवत असेल तर स्वयंपाकाचे तेल देखील याचे कारण असू शकते. जर तुम्हाला नेहमीपेक्षा जास्त आम्लता जाणवत असेल तर जंक आणि तळलेले पदार्थ खाणे टाळा.

**विषारी पदार्थाचे प्रमाण वाढते :** सूर्यफूल किंवा कॉर्न ऑइल सारखी काही वनस्पतीचे तेल पुन्हा गरम केल्यानं त्यातील विषारी पदार्थांचे प्रमाण वाढतं, ज्यामुळे हृदयरोग, अल्झायमर, डिमेंशिया आणि पार्किन्सनसह अनेक आजार होतात. वनस्पती तेल पुन्हा गरम केल्याने 4-हायड्रॉक्सी-ट्रान्स-2-नोमिनल (HNE) नावाचे आणखी एक विष बाहेर पडते, जे डीएनए, आरएनए आणि प्रथिने योग्यरित्या कार्य करण्यापासून रोखते.

**ट्रान्स फॅट वाढवते :** स्वयंपाकाच्या तेलात ट्रान्स फॅटी ॲसिड असतात जे पुन्हा गरम केल्यावर वाढतात. ट्रान्स फॅट्स हे सॅच्युरेटेड फॅट्सपेक्षा वाईट असतात कारण ते केवळ वाईट कोलेस्ट्रॉलची पातळी वाढवत नाहीत तर चांगल्या कोलेस्ट्रॉलची पातळी देखील कमी करतात. यामुळे पार्किन्सन रोग, हृदयरोग, स्ट्रोक, कर्करोग आणि यकृताच्या विविध समस्या उद्भवू शकतात.

■ ■ ■

## वाचक लिहितात

### सश्रद्ध महाराष्ट्र!

महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य असल्याचे म्हटले जाते. पुरोगामीत्व म्हणजे जेथे सर्व गोष्टी विज्ञानाच्या तराजूत मोजल्या जातात, देवभोळेपणा आणि श्रद्धांना येथे स्थान नाही; मात्र याच महाराष्ट्रात साजरा होणारा श्रद्धेचा महाउत्सव म्हणजेच आषाढीची वारी आज गिनीज बुकात नोंदली गेली आहे. आपली सारी व्यावहारिक कामे बाजूला सारून केवळ भगवंताच्या मुखदर्शनासाठी वारकरी पायपीट करत निघतो. या पायपिटीमध्ये तब्येतीची चिंता, खाण्या पिण्याची व्यवस्था, घरच्या पोराबाळांची काळजी सारे काही त्या पांडुरंगावर सोडून वारकरी भगवी पताका घेऊन पंढरीची वाट धरतो आणि तो भक्ताच्या भक्तीच्या भुकेला आसुसलेला पांडुरंगही आपल्या भक्ताची सर्वार्थाने काळजी वाहतो. पांडुरंगाच्या आणि भक्ताच्या अतूट नात्याच्या मिलनोत्सवाला विज्ञानाचे तराजू तोलू शकेल का? याच महाराष्ट्राच्या नाशिक नगरीत दर १२ वर्षांनी भरणारा सिंहस्थ कुंभमेळा या श्रद्धेचा आणखी एक महोत्सव अशा श्रद्धाळू भक्तांच्या महाराष्ट्राला पुरोगामी महाराष्ट्रापेक्षा 'सश्रद्ध महाराष्ट्र' हेच विशेषण योग्य ठरेल.

■ **सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई.**

### किती हा त्रास?

नागपूर शहराच्या संत जगनाडे महाराज चौकानजिक उड्डाण पुल आणि मेट्रोचे काम सुरू आहे. या कामावरील वाहने चक्क रस्त्याच्या कडेला उभी केली जात असून, येथून एखादी दुचाकी काढणे जीवावर बेतण्यासारखे आहे. वाहतुक कोंडीमुळे बराच वेळ अडकून पडावे लागते.

■ **एक नागपूरकर**

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



### हास्यालंकार

परिस्थिती येवो
कोणतीही
मनाला द्यावी शिकवण
चेहऱ्यावरील स्माईल भौ
कमी होऊ देणार
नाही तसूभर

सर्व अलंकारात असे
हास्यालंकार भारी
कुण्याही सराफाच्या
दुकानावर
मिळेना संसारी ..

# आयसीआयसीआय बँक आणि टाटा मेमोरियल सेंटर यांच्यातर्फे प्रगत कर्करोग उपचार ब्लॉकसाठीचे भूमिपूजन




**विशाखापट्टणम, २५ जून :** टाटा मेमोरियल सेंटरच्या सहकार्याने आयसीआयसीआय बँकेने आज आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथील होमी भाभा कर्करोग रुणालय व संशोधन केंद्र येथे एका नव्या इमारतीच्या बांधकामास प्रारंभ केल्याचे जाहीर केले.

आयसीआयसीआय बँकेकडून ५५० कोटी रु. पेक्षा जास्त निधी देण्यात येत असून आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाने सुसज्ज अशा सुमारे ३.९ लाख चौरस फूट क्षेत्रफळ असलेल्या या अत्याधुनिक सुविधा केंद्राचे बांधकाम केले जात आहे.

एकदा कार्यान्वित झाल्यानंतर, आयसीआयसीआय फाउंडेशन ब्लॉक फॉर चाइल्ड अँण्ड ब्लड कॅन्सर ही आठ मजली नवीन इमारत दरवर्षी ३,००० रुग्णांना वैद्यकीय सेवा देऊ शकेल. सध्या होमी भाभा कर्करोग रुग्णालय व संशोधन केंद्र दरवर्षी ६,२०० रुग्णांना उपचार देत आहे.

भूमिपूजनाचा कार्यक्रम आयसीआयसीआय बँकेचे अध्यक्ष प्रदीपकुमार सिन्हा यांच्या हस्ते आणि आयसीआयसीआय बँकेचे कार्यकारी संचालक संदीप बत्रा आणि मुंबई येथील टाटा मेमोरियल सेंटरचे संचालक डॉ. सुदीप गुप्ता यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

आयसीआयसीआय बँकेचे अध्यक्ष प्रदीपकुमार सिन्हा म्हणाले, देशातील आरोग्यसेवा क्षेत्रातील महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा बळकट करण्याच्या आमच्या तत्त्वज्ञानाशी सुसंगत अशा कर्करोग उपचार मोहिमेत टाटा मेमोरियल सेंटर सोबत भागीदारी करताना आम्हाला अत्यंत अभिमान वाटत आहे. हा प्रकल्प गरजूंना उच्च-गुणवत्तेची वैद्यकीय सेवा देण्याच्या आमच्या बांधिलकीचे प्रतीक आहे. हे सुविधा केंद्र बालक व रक्ताच्या कर्करोगावरील उपचारासाठीचे पूर्व भारतातील सर्वात मोठया सुविधा केंद्रांपैकी एक असून आंध्र प्रदेश तसेच शेजारील राज्यांतील रुग्णांना कर्करोग उपचारासाठी मदतीचे ठरेल.

आयसीआयसीआय बँकेचे कार्यकारी संचालक संदीप बत्रा यावेळी बोलताना म्हणाले, आयसीआयसीआय बँकेसाठी आरोग्यसेवा हा सीएसआर उपक्रमांचा एक मुख्य भाग आहे. दोन वर्षांपूर्वी आम्ही भारतात कर्करोग उपचारांवर मोठा प्रभाव टाकणाऱ्या टाटा मेमोरियल सेंटरसोबत भागीदारीची घोषणा करताना विशाखापट्टणम, नवी मुंबई व न्यू चंदीगड येथील तीन नव्या ब्लॉक्ससाठीच्या उभारणीसाठी १,२०० कोटी रु. चे योगदान देण्याचे जाहीर केले होते. आता टाटा मेमोरियल सेंटरच्या नवीन गरजांनुसार, आम्ही हे योगदान वाढवून १,८०० कोटी रु. वर नेले आहे. हे नवीन ब्लॉक्स एकूण १०.७ लाख चौरस फूट क्षेत्रफळावर उभारले जात असून, त्यामध्ये अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा व संशोधन विभाग असतील. या ब्लॉक्सची एकत्रितपणे १९ LINACs* आणि ५५५ खाटांची क्षमता असणार आहे. हे सर्व कार्यान्वित झाल्यावर ते प्रादेशिक केंद्रे म्हणून कार्य करतील.

# कोलगेटची ओरल हेल्थ मूव्हमेंट, ४.५ दशलक्ष व्यक्तींची तपासणी करण्यात आली



**नवी दिल्ली, २५ जून :** कोलगेट पामोलिव्ह (इंडिया) लिमिटेड आठ दशकांहून अधिक काळापासून भारतातील ओरल केअरमध्ये क्रांती घडवून आणण्याच्या मिशनवर आहे. कंपनी देशातील ओरल हेल्थ सुधारण्याप्रती कटिबद्ध आहे. भारतातील जवळपास १०० टक्के कुटुंबं टूथपेस्टचा वापर करतात, ज्यामुळे योग्य ओरल केअर सवयी अंगिकारण्याची संधी आहे. भारतातील जवळपास प्रत्येक कुटुंबामध्ये टूथपेस्टचा वापर केला जात असताना योग्य ओरल केअर सवयी अंगिकारण्याची संधी महत्त्वाची आहे. सर्वोत्तम, दीर्घकालीन आरोग्यदायी फायदे मिळतील अशा सोप्या, स्वस्त दैनंदिन सवयी अंगिकारल्या पाहिजेत.

९० टक्के* भारतीय दातांच्या समस्यांचा सामना करत आहेत आणि फक्त ९ टक्के नियमितपणे डेण्टिस्टकडे जातात. म्हणून या महत्त्वपूर्ण समस्येसंदर्भात जागरूकता निर्माण करण्याची आणि अर्थपूर्ण कृती करण्याची गरज होती. विद्यमान व योग्य वर्तणूकीसंदर्भात असलेला जागरूकतेचा अभाव दूर करण्यासाठी कोलगेटने नोव्हेंबर २०२४ मध्ये ओरल हेल्थ मूव्हमेंट सुरू केली. हा उपक्रम अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा फायदा घेत लाखो भारतीयांना त्यांच्या मोबाइल फोनमधून त्यांची ओरल (दातांची) तपासणी करण्यास सक्षम करतो, तसेच इंडियन डेण्टल असोसिएशन (आयडीए) सोबत सहयोगाने ५०,००० डेण्टिस्ट्सच्या नेटवर्कच्या माध्यमातून मोफत दातांची तपासणी उपलब्ध करून देतो.

कोलगेट ओरल हेल्थ मूव्हमेंटचा भाग म्हणून देशाच्या कानाकोपऱ्यामधील ४.५ दशलक्षहून अधिक भारतीयांनी त्यांच्या ओरल हेल्थची तपासणी केली, जेथे ७०० हून अधिक जिल्ह्यांतील १८,००० हून अधिक पिन कोडमधील व्यक्तींनी सहभाग घेतला. तसेच, त्यांच्यापैकी जवळपास १६ टक्के व्यक्तींनी तपासणीनंतर डेण्टिस्टला भेट दिली (आयडीए डेटा), ज्यामधून या मूव्हमेंटने भारतीयांना पुढील कृती करण्यास प्रेरित केल्याचे दिसून आले.

याव्यतिरिक्त, या देशव्यापी मूव्हमेंटने भारतीयांच्या ओरल हेल्थबाबत कृतीशील माहिती सादर केली आहे, ज्यामध्ये त्वरित लक्ष देण्यासोबत हस्तक्षेप करण्याची गरज असलेल्या प्रमुख क्षेत्रांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. या निष्पत्ती देशातील ओरल हेल्थ उपक्रमांच्या भविष्याला आकार देतील.

कोलगेटच्या ओरल हेल्थ मूव्हमेंटमधील युजर सहभागानुसार भारतीयांचा सरासरी ओरल हेल्थ स्कोअर ५.० पैकी २.६ आहे.

ओरल हेल्थ स्कोअर कॅव्हिटी, हिरड्यांच्या समस्या व डागांचे मूल्यांकन करत व्यक्तीच्या ओरल हेल्थबाबत योग्य, वैयक्तिकृत माहिती देतो. उच्च ओरल हेल्थ स्कोअर संपादित करणाऱ्या भारतीयांमध्ये समान गोष्ट आढळून आली, ती म्हणजे त्यांनी विशिष्ट आरोग्यदायी पद्धतींचे पालन केले. यामध्ये दिवसातून दोनदा दात ब्रश करणे, कॅफिन व साखरयुक्त पेयांचे कमी प्रमाणात सेवन, आरोग्यदायी व पौष्टिक आहाराचे सेवन आणि तंबाखू टाळणे यांचा समावेश होता.

# नागपूर मध्ये करण्यात आले शैक्षणिक सत्राचे आयोजन

**नागपूर, २५ जून :** इंडियन डायटेटिक असोसिएशन (आयडीए) च्या नागपूर विभागाने अल्मंड बोर्ड ऑफ कॅलिफोर्निया यांच्या सहकार्याने आहारतज्ञ आणि न्यूट्रिशन प्रोफेशनल्ससाठी एक शैक्षणिक सत्र आयोजित केले. या सत्राचा उद्देश बदामांमध्ये असलेल्या पोषणमूल्यांबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि दैनंदिन आहारात बदामांचा समावेश केल्यास मिळणारे आरोग्यदायी फायदे सर्वांपर्यंत पोहोचवणे हा होता.हे सत्र न्यूट्रिशन आणि वेलनेस कन्सल्टंट श्रीमती शीला कृष्णस्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. त्यांनी हृदयविकार आणि मेटाबोलिक आरोग्य, स्नायूंना होणारे फायदे आणि रक्तातील साखरेचे नियमन या विषयांवर झालेल्या तीन महत्त्वपूर्ण संशोधनांचा आढावा घेतला. यानंतर झालेल्या पॅनल चर्चेमध्ये श्रीमती शीला कृष्णस्वामी यांच्यासोबत डॉ. कविता गुप्ता (सचिव, आयडीए नागपूर विभाग) आणि डॉ. रेनुका माईंदे (कोषाध्यक्ष, आयडीए नागपूर विभाग) सहभागी झाल्या होत्या. डॉ. कविता बक्षी (संयोजिका, आयडीए नागपूर विभाग) यांनी चर्चा सत्राचे सूत्रसंचालन केले.

# टाटा मोटर्सकडून मिनी ट्रक एस प्रो लाँच

**चंद्रपूर, २५ जून :** टाटा मोटर्स या भारतातील सर्वात मोठ्या व्यावसायिक वाहन उत्पादक कंपनीने नवीन टाटा एस प्रोच्या लाँचसह नवीन टप्पा गाठला आहे, तसेच लहान कार्गो मोबिलिटीच्या परिवर्तनात्मक युगाचा शुभारंभ केला आहे. ३.९९ लाख रूपयांच्या सूरवातीच्या किमतीसह टाटा एस प्रो भारतातील सर्वात किफायतशीर चार-चाकी मिनी ट्रक आहे, जो अपवादात्मक कार्यक्षमता, अद्वितीय वैविध्यता आणि उच्च दर्जाचे मूल्य देतो.

उद्योजकांच्या भावी पिढीला सक्षम करण्यासाठी डिझाइन करण्यात आलेला टाटा एस प्रो पेट्रोल, बाय-फ्यूईल (सीएनजी + पेट्रोल) आणि इलेक्ट्रिक व्हेरिएण्ट्समध्ये उपलब्ध आहे, ज्यामुळे ग्राहकांना त्यांच्या व्यवसाय गरजांसाठी योग्य सोल्यूशन निवडण्याची स्थिरता मिळते.

एस प्रो लाँच करत टाटा मोटर्सचे कार्यकारी संचालक श्री. गिरीश वाघ म्हणाले, लाँच करण्यात आलेल्या टाटा एसने भारतातील कार्गो मोबिलिटीमध्ये क्रांती घडवून आणली. गेल्या दोन दशकांमध्ये या ट्रकने २५ लाखांहून अधिक उद्योजकांना यशस्वीरित्या सक्षम केले आहे, तसेच प्रगती व क्षमतेचे प्रतीक बनला आहे. नवीन टाटा एस प्रोसह आम्ही महत्त्वाकांक्षी भावी पिढीसाठी नवीन उद्देशासह हा वारसा अधिक दृढ करत आहोत. स्थिरता, सुरक्षितता आणि नफ्यासाठी डिझाइन करण्यात आलेल्या एस प्रोमध्ये उत्तम उत्पन्न मिळवून देण्याची क्षमता आहे, जो उज्ज्वल भविष्य घडवण्याच्या दिशेने वाटचाल करण्यास सुसज्ज असलेल्या महत्त्वाकांक्षी उद्योजकांच्या महत्त्वाकांक्षांची पूर्तता करण्यास मदत करेल.''

टाटा एस प्रोबाबत मत व्यक्त करत टाटा मोटर्स कमर्शियल वेईकल्सच्या एससीव्हीपीयूचे उपाध्यक्ष व व्यवसाय प्रमुख श्री. पिनाकी हल्दर म्हणाले, उद्देशपूर्ण टाटा एस प्रो सखोल ग्राहक अभिप्रायांसह विकसित करण्यात आली आहे आणि विविध उपयोजनांची पूर्तता करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे. विविध प्रदेश व हवामान स्थितींमध्ये, तसेच लाखो किलोमीटर अंतरापर्यंत या ट्रकची प्रखर चाचणी करण्यात आली आहे. मल्टी-फ्यूईल पर्याय, किफायतशीरपणा आणि सुधारित ड्रायव्हिंग क्षमतेसह टाटा एस प्रो विविध वापरांमध्ये उच्च दर्जाचे मूल्य देतो. आमच्या पोर्टफोलिओमधील हा धोरणात्मकरित्या भर करण्यात आलेला ट्रक आहे, जो उद्योजकांना आणि लहान व्यवसायांना विश्वासार्ह, भविष्यासाठी सुसज्ज गतशीलता सोल्यूशन्ससह सक्षम करण्याप्रती टाटा मोटर्सच्या कटिबद्धतेला अधिक दृढ करतो. भारतातील व्यावसायिक, ई-कॉमर्स व लॉजिस्टिक्स हब महाराष्ट्र एस प्रो बाय-फ्यूईल आणि ईव्ही व्हेरिएण्ट्ससाठी लाभदायी क्षेत्र आहे. या राज्यातील ग्राहक या ऑफरिंग्जचा फायदा घेण्यास अद्वितीयरित्या सज्ज आहेत, जेथे राज्यामध्ये प्रबळ सीएनजी पायाभूत सुविधा असण्यासोबत शाश्वत परिवहन सोल्यूशन्सना पाठिंबा देणा-यसा इलेक्ट्रिक गतीशीलतेचा लवकर अवलंब करण्यात आला आहे.

# पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत आपल्याला मार्गदर्शन देण्यासाठी पुष्पा प्रोफेसर शास्त्रीचे मन वळवू शकेल का ?



**मुंबई, २५ जून :** हृदयस्पर्शी आणि सुसंबद्ध कथानक सादर करणारी सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल ही मालिका लोकांना आपलीशी वाटते. मालिकेत आता एक महत्त्वाचा आणि प्रेरक टप्पा आला आहे. पुष्पाने (करुणा पांडे) लॉ कॉलेजची प्रवेश परीक्षा उत्तीर्ण केली आहे आणि आता कायद्याचे शिक्षण घेण्याचे तिचे स्वप्न पूर्ण होणार आहे. प्रोफेसर राजवीर शास्त्री (गौरव चोप्रा) या कॉलेजात प्राध्यापक आहेत. अलीकडच्या भागांमध्ये, प्रेक्षकांनी पाहिले की, कॉलेजच्या पहिल्या दिवशी पुष्पाच्या वर्गातील विद्यार्थी पुष्पाची खिल्ली उडवतात. पण त्यावेळी प्रोफेसर राजवीर तिच्या बचावात उभे राहतात आणि इतर मुलांचा दांभिकपणा उघड करतात..

आगामी भागांमध्ये, ब्रेक द आइस इव्हेंट च्या रूपात एक नवीन आव्हान उभे राहते. प्रत्येक विद्यार्थ्याला चिठ्ठ्या टाकून एक मार्गदर्शक नेमून दिला जातो. पुष्पाची मैत्रीण नयना चलाखी करून पुष्पाला प्रोफेसर राजवीर मार्गदर्शक म्हणून मिळतील असा प्रयत्न करते. पण ते पुष्पाला मार्गदर्शन देण्यास नकार देतात आपल्याला आधी विचारण्यात आले नव्हते, हे त्यांचे म्हणणे आहे.

स्वतःला सिद्ध करण्यासाठी सज्ज असलेली पुष्पा वारंवार प्रोफेसर शास्त्रींना तिचे मेंटर बनण्याची गळ घालते. शेवटी शास्त्री तिला एक अट घालतात की, त्याने तिचा मेंटर व्हावे असे जर तिला वाटत असेल, तर तिने एक प्रेझेंटेशन बनवावे. त्याची तयारी करण्यासाठी ते पुष्पाला आपल्या घरी बोलावतात. पण ते पुष्पाला आपला पत्ता देत नाहीत. तिनेच शोध घेत घेत घर शोधून काढावे अशी त्यांची इच्छा असते.

हे आव्हान पुष्पा स्वीकारेल का आणि कितीही प्रतिकूल परिस्थिती असली तरी कायद्याचे शिक्षण घेण्याबाबत ती किती गंभीर आहे, हे प्रोफेसर शास्त्रींना पटवून देऊ शकेल का ?

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत पुष्पाची भूमिका करणारी करुणा पांडे म्हणते, पुष्पाच्या वाटचालीतील हा टप्पा अत्यंत महत्त्वाचा आहे, कारण हा केवळ आपल्या स्वप्नाचा पाठपुरावा करणे नाही आहे तर एका अपरिचित विश्वात आपली ओळख निर्माण करून सन्मान मिळवण्याचा तिचा लढा आहे. प्रो. शास्त्रींनी नकार दिल्यामुळे ती हताश होत नाही. उलट स्वतःला सिद्ध करण्यासाठी ती सज्ज होते. आपल्याला विशेष वागणूक मिळावी ही तिची अपेक्षा नाही. उलट, प्रामाणिकपणे आणि जिद्दीने प्रत्येक संधीचा उपयोग करून घेण्याचा ती प्रयत्न करते. अशा प्रसंगांमधूनच पुष्पा खूप चारचौघींसारखी पण प्रेरणादायक दिसते. फक्त एक आई किंवा विद्यार्थी म्हणून नाही, तर एक स्त्री म्हणून, जी कधीच हार मानत नाही.

## जमाई नं. १ मधील आपल्या कोर्टरूम अ‍ॅक्टसाठी सज्ज झाली आहे सिमरन कौर!

**मुंबई, २५ जून :** झी टीव्हीवरील गाजलेली कौटुंबिक मालिका जमाई नं. १ सुरुवातीपासूनच आपल्या ट्विस्ट्स आणि भावनिक चढउतारांमुळे प्रेक्षकांना खिळवून ठेवत आहे. आता या कथेत एक नवे नाट्यमय वळण येत आहे, ज्यामध्ये रिद्धी (सिमरन कौर) आपला पती नीलला (अभिषेक मलिक) वाचवण्यासाठी कोर्टात उभी राहणार आहे, त्याच्यावर सायली (सोनल वेंगुर्लेकर) कडून खोटे आणि गंभीर आरोप लावण्यात आले आहेत. आगामी एपिसोडमध्ये काही मोठ्या घडामोडी पाहायला मिळणार आहेत सिमरनचे पात्र एका समर्पित पत्नीपासून न्यायासाठी लढणाऱ्या आक्रमक वकिलामध्ये रूपांतरित होणार आहे.

हे खास ठरतंय कारण सिमरन ऑनस्क्रीन एका वकीलाची भूमिका साकारताना दिसणार आहे आणि हे पात्र वास्तवदर्शी वाटावे यासाठी तिने कोणतीही कसर बाकी ठेवलेली नाही. आपली ही कायदेशीर भूमिका अधिक प्रभावी व्हावी यासाठी तिने काही कोर्टरूम ड्रामा पाहिले, जेणेकरून ती ही जबाबदारी समर्थपणे निभावूशकेल. यात तिच्यासाठी एक मोठा प्रेरणास्त्रोत ठरला बॉलीवूडचा समीक्षात्मकांनी प्रशंसा केलेला चित्रपट ऐतराज़, ज्यात करिना कपूर खानने अ‍ॅडव्होकेट प्रिया सक्सेना मल्होत्राची लक्षवेधी भूमिका केली होती, जिला तिच्या पतीला गंभीर छळवणुकीच्या आरोपांपासून वाचवायचं होतं. जमाई नं. १ मध्ये सिमरननेही हीच ऊर्जा रिद्धीच्या पात्रात आणली आहे, जिच्याद्वारे अन्यायाविरुद्ध उभे राहणाऱ्या स्त्रीची ठाम आणि भावनिक ताकद दाखवण्यात आली आहे.

आपल्या तयारीबाबत सिमरन कौर म्हणाली, जेव्हा मला समजले की रिद्धी कोर्टात नीलची केस लढणार आहे, तेव्हा मी खूप उत्साहित झाले. कारण ही कहाणी एक जोरदार वळण घेणार होती भावनिकरित्या कोलमडलेली स्त्री शांतता मिळवत पुन्हा उभी राहते आणि न्यायासाठी कोर्टात उभी राहते, ही गोष्ट अनेकांसाठी प्रेरणादायक ठरणार होती. त्यामुळे वकिलाची भूमिका साकारताना मी तिचे देहबोली, उच्चार आणि तिच्या आत्मविश्वासावर काम केले. यासाठी मी काही कोर्टरूम ड्रामा विशेषतः ऐतराज़ पाहिला. करिनाने कोर्टात जे सशक्त आणि नैतिकतेने भरलेले सादरीकरण केले ते माझ्यासाठी मार्गदर्शक ठरले.

ती पुढे म्हणाली, हे फक्त संवाद लक्षात ठेवण्याचे काम नव्हते तर एक ठसा उमटवण्याची गोष्ट होती. मी सादरीकरण कसे असावे यासाठी टीमसोबत काम केले, भरपूर रिहर्सल केली आणि कुठे थांबायचं, कसे बोलायचे याचीही तयारी केली, जेणेकरून मी एक खरीखुरी कोर्टरूम वकील वाटावे. मला आशा आहे की, रिद्धी पात्रात मी जी प्रामाणिकता आणि ऊर्जा आणली आहे ती प्रेक्षकांपर्यंत पोहोचेल. हा ट्रॅक माझ्या पात्रासाठी आजवरच्या सर्वात प्रभावी ट्रॅकमधला एक ठरेल.

आता ही मालिका एका कायदेशीर संघर्षात प्रवेश करत आहे, जो याआधी कधीच पाहायला मिळाला नव्हता. पण रिद्धी सायलीच्या खोटेपणाच्या जाळ्यातून बाहेर पडून नीलला निर्दोष सिद्ध करू शकेल का? की सायलीच्या धूर्त डावातच कोर्टरूम नाट्य अडकून पडेल?

## पावसाळ्यात पात्रं करणार वादळाचा सामना!

**मुंबई, २५ जून :** या आठवड्यात एण्ड टीव्हीवरील मालिका हप्पू की उलटन पलटन' आणि भाबीजी घर पर है'मधील पात्रं पावसाळ्यामध्ये भिजण्याचा आनंद घेणार आहेत, पण हा आनंद घेताना मोठ्या दुविधेत सापडतील. यामागील कारण जाणण्यासाठी पुढे वाचा.

मालिका हप्पू की उलटन पलटन'मधील आगामी एपिसोडबाबत कटोरी अम्मा ऊर्फ हिमानी शिवपुरी म्हणाल्या, दरोगा हप्पू सिंगला (योगेश त्रिपाठी) पावसाळ्यात गरमागरम आणि कुरकुरीत भजी खावीशी वाटते आणि तो राजेशला (गीतांजली मिश्रा) भजी करायला सांगतो. पण दर पावसाळ्यात भजी बनवून कंटाळलेली राजेश यावेळी ठामपणे नकार देते, ज्यामुळे हप्पू निराश होतो. दरम्यान, पोलिस स्टेशनमध्ये हप्पूकडे एक विचित्र तक्रार येते. एक पुरूष आरोप करतो की त्याची पत्नी त्यांच्या शेजाऱ्याला भजी खायला घालत राहते आणि हे असेच चालू राहिले तर तो रागाच्या भरात शेजाऱ्याला इजा करू शकतो! तो हप्पूला परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्यापूर्वी कारवाई करून शेजाऱ्याला थांबवण्याची विनंती करतो. घरी परतल्यावर, हप्पू त्याच रात्री पुन्हा एकदा राजेशकडे भजी करण्याची विनंती करतो, पण ती भजी करण्यास नकार देते. दुसऱ्या दिवशी राजेश रस्त्यावरून जात असताना चोर तिची पर्स हिसकावून घेतो. हप्पूच्या वयाचा एक धाडसी पोलीस अधिकारी धाडसाने चोराला पकडतो आणि पर्स तिला परत करतो. राजेशला पाहून अधिकारी भावूक होतो आणि सांगतो की ती त्याच्या दिवंगत बहिणीसारखी दिसते. पावसाळ्यात ती त्याला भजी खायला द्यायची याची देखील आठवण सांगतो. राजेश भावूक होत आणि त्याला संध्याकाळी उशिरा त्याच ठिकाणी भेटण्यासाठी आमंत्रित करते.

## राशीभविष्य

**मेष :** आज तुम्हाला नोकरी मिळेल. तुमच्या नोकरीत वरिष्ठ अधिकाजयाचे आशीर्वाद असतील. तुम्ही राजकारणात वर्चस्व प्रस्थापित कराल. कला, अभिनय आणि लेखनाशी संबंधित लोकांना मोठे यश मिळेल.

**वृषभ :** आज आरोग्याशी संबंधित कोणत्याही समस्या येण्याची शक्यता कमी असेल. तुमचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी सतर्क आणि काळजी घ्या. आरोग्याशी संबंधित किरकोळ समस्या उद्भवतील.

**मिथुन :** राजकीय क्षेत्रातील लोकांना त्यांच्या कामाच्या बदल्यात पैसे मिळतील. व्यवसायात तुमच्या वडिलांकडून तुम्हाला विशेष सहकार्य मिळेल. ज्यामुळे तुम्हाला अपेक्षेपेक्षा जास्त पैसे मिळू शकतात.

**कर्क :** राजकीय क्षेत्रात काम करणाजया लोकांना अपेक्षित पैसे मिळतील. व्यवसायातील समस्येचे निराकरण झाल्यामुळे प्रलंबित पैसे मिळतील. कामात अधीनस्थांना फायदा होईल.

**सिंह :** आज, राजकीय कामात जास्त व्यस्त असल्यामुळे, आरोग्याशी संबंधित काही समस्या उद्भवू शकतात. पूर्वीपासून असलेल्या आरोग्याशी संबंधित समस्या गंभीर रूप धारण करू शकतात.

**कन्या :** जमीन, इमारत, वाहन इत्यादी कामात गुंतलेल्या लोकांना खूप त्रासानंतर पैसे मिळतील. शरीरात थकवा, ताप, सर्दी इत्यादी तक्रारी असू शकतात. मानसिक ताण घेऊ नका. अनुकूल परिणाम मिळतील.

**तूळ :** आज दिवसाची सुरुवात खूप चांगल्या बातमीने होईल. कामाच्या ठिकाणी वरिष्ठ अधिकाजयाशी तुमची जवळीक वाढेल. कुटुंबात एक शुभ घटना घडेल. तुम्हाला खास व्यक्तीचा पाठिंबा आणि सहवास मिळेल.

**वृश्चिक :** आज दिवसाची सुरुवात उत्तम बातमीने होईल. कामाच्या ठिकाणी अनावश्यक धावपळ होईल. तुम्हाला सामाजिक कार्यात महत्त्वाची भूमिका बजावण्याची संधी मिळेल.

**धनु :** तुम्हाला मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग आणि मूत्रपिंडाच्या आजाराचा त्रास होण्याची शक्यता आहे. लांब प्रवास टाळा. कोणतीही महागडी वस्तू खरेदी करण्याच्या योजना यशस्वी होऊ शकते.

**मकर :** आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. व्यवसायात अपेक्षेपेक्षा जास्त पैसे कमावल्याने तुम्ही आनंदी व्हाल. परदेशात राहणाजया प्रिय व्यक्तीकडून तुम्हाला पैसे आणि मौल्यवान भेटवस्तू मिळतील.

**कुंभ :** कामाच्या ठिकाणी महत्त्वाच्या कामात अडथळे येतील. तुमच्या समस्या जास्त काळ वाढू देऊ नका, त्या लवकर सोडवण्याचा प्रयत्न करा. काम पूर्ण होईपर्यंत योजना उघड करू नका.

**मीन :** तुम्हाला जुन्या प्रकरणातून दिलासा मिळेल. तुमची तुरुंगातून सुटका होईल. घरी लपलेला खजिना सापडण्याची शक्यता आहे. व्यवसाय सहल फायदेशीर ठरेल. व्यवसाय वाढवण्याची योजना यशस्वी होईल.


## कार्यालय नगर परिषद, चिमूर, जि. चंद्रपुर

क्र./नपचि/आ.वि./२०२५/३१३ दि. :२५/०६/२०२५

### निविदा सूचना

चिमूर नगर परिषद अंतर्गत आरोग्य व स्वच्छता विभाग अंतर्गत पुढील विविध कामाकरिता सीलबंद निविदा मागविण्यात येत आहे. नगर परिषद, चिमूर आरोग्य व स्वच्छता विभाग करिता 300MM व 400MM आकाराचे सिमेंट पाईप पुरवठा करणे बाबत. या कामाकरिता पुरवठाधारक कडून दिनांक ०२/०७/२०२५ ला दुपारी ५.00 वाजेपर्यंत द्विलीफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे. निविदा फार्म विक्री दिनांक- २६/०६/२०२५ पासून उपलब्ध राहील. संबंधित कामाचे अनामत रक्कम रोकड स्वरुपात भरणा करावी लागेल. निविदेच्या शर्ती व अटी कार्यालयीन वेळेत नगर परिषद, चिमूर आरोग्य व स्वच्छता विभागात पहावयास मिळेल.

मुख्यधिकारी
नगर परिषद, चिमूर



## आज का अंदाज

गुरूवार २६ जून २०२५

### पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | १ | ४ | ७ | ३ | ५ | ६ | ९ |
| १९० | २२७ | ७८९ | १३३ | २२९ | २४९ | १६९ | १८० |
| ४६० | ५६० | ११२ | २२३ | ४९० | ४५६ | २६८ | ३७९ |
| २२६ | ३८० | ५९० | ३६८ | १५७ | ३५७ | ७९० | ५६८ |
| ०२ | १२ | ४३ | ७३ | २० | ५१ | ६२ | ९२ |
| ०५ | १५ | ४६ | ७६ | २९ | ५० | ६७ | ९७ |
| ०८ | १८ | ४९ | ७९ | २१ | ५४ | ६८ | ९८ |

२६ जून : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | ५३ | ६४ | ९४ |
| २२ | ५५ | ६६ | ९९ |
| २१ | ५१ | ६० | ९० |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


# देशाचे भविष्य अंमली पदार्थांच्या दलदलीत अडकू नये



व्यसन फक्त नाश करते; व्यसनी व्यक्ती ज्या अंमली पदार्थाचे सेवन मोठ्या उत्कटतेने करते ते शरीरावर व मनावर अतिशय घातक परिणाम करते. व्यसन हे सर्वप्रथम व्यक्तीच्या मेंदूवर वर्चस्व गाजवते आणि त्याची विचार करण्याची आणि समजून घेण्याची क्षमता नष्ट करते आणि हळूहळू संपूर्ण शरीर कमकुवत करते. जोपर्यंत व्यसनाचा परिणाम मेंदूवर राहतो तोपर्यंत व्यसनाधीन व्यक्तीच्या अनुचित वर्तनाची शक्यता प्रबळ राहते. ही एक साधी गोष्ट आहे, जर एखाद्या व्यक्तीचा मेंदू अनियंत्रित असेल तर त्याचे स्वतःवर नियंत्रण राहणार नाही. २०२१ च्या जागतिक औषध अहवालानुसार, अंमली पदार्थांचा वापर आणि गुन्हेगारी यांच्यात जवळचा संबंध आहे. आपण स्वतः पाहतो की जगभरातील गुन्हेगारीमध्ये वाढ होण्याचे मुख्य कारण म्हणजे अंमली पदार्थांचे व्यसन, म्हणजेच, अर्ध्याहून अधिक गुन्हे हे अंमली पदार्थांच्या प्रभावाखाली किंवा अंमली पदार्थांसाठी केले जातात. व्यसनासाठी पैसे न मिळाल्याने व्यसनी स्वतःच्या पालकांना देखील मारतात अशा बातम्या किंवा वाईट कृत्य आपण अनेकदा ऐकतो आणि पाहतो. आजकाल, गुन्हेगारी अगदी लहान वयातच दिसून येते, अगदी शाळकरी मुले देखील ड्रग्जचे व्यसन लागलेली दिसतात. पालकांचा मुलांबद्दलचा बेजबाबदार दृष्टिकोन किंवा मुलांवर आंधळा विश्वास, फॅशन आणि चित्रपट उद्योगाचा नकारात्मक परिणाम आणि सोशल मीडियाचे व्यसन यामुळे मुलांचा विकास चुकीच्या दिशेने होत आहे. जर आत्ताच मुलांच्या कोवळ्या मनावर ड्रग्जचे विष वर्चस्व गाजवू लागले, तर देशाचे उज्ज्वल भविष्य गुन्हेगारीच्या दलदलीत भरून जाईल. आजकाल तरुण प्रत्येक छोट्या गोष्टीवर पार्टी करतात आणि पार्टीच्या नावाखाली नशा करतात. आज आपण जिकडे पाहतो तिकडे ड्रग्जची तस्करी, व्यसनींकडून होणारे गुन्हे, अपघात आणि वाईट बातम्या आहेत, क्वचितच असा दिवस जातो जेव्हा नशे संबंधित बातम्या येत नाहीत. ड्रग्जचे जाळे वेगाने पसरले आहे, अगदी ड्रग्जच्या तस्करीत मुलांचाही वापर केला जात आहे.

देशात वापरल्या जाणाऱ्या सर्वात सामान्य अंमली पदार्थांमध्ये अल्कोहोल, निकोटीन, गांजा, चरस, भांग, हेरॉइन, फार्मास्युटिकल ओपिओइड्स, फेंटानिल, कोडीन, मेथॅम्फेटामाइन, कोकेन, बेंझोडायझेपाइन्स आणि अफू यांचा समावेश आहे. लहान मुले देखील नशा करण्यासाठी ग्लू, व्हाईटनर, कफ सिरप, वेदनाशामक, पेंट थिनर, फिनाईल, सॅनिटायझर, पेट्रोल किंवा इतर ज्वलनशील उग्र वास असणारी रसायने श्वासाने घेण्याकरिता वापरतात. मुलांमध्ये दारू आणि तंबाखूचा वाढता वापर हा देखील चिंतेचा विषय आहे.

आज, संघटित गुन्हेगारी अवैध ड्रग्ज व्यापाराला चालना देत आहे, ज्याचे जगभरातील लोक आणि समुदायांवर विनाशकारी परिणाम होत आहेत. म्हणूनच या वर्षीच्या आंतरराष्ट्रीय ड्रग्ज गैरवापर विरोधी दिन २०२५ चे घोषवाक्य साखळ्या तोडणे: सर्वांसाठी प्रतिबंध, उपचार आणि पुनर्प्राप्ती! आहे. हे घोषवाक्य ड्रग्ज गैरवापर आणि बेकायदेशीर तस्करीचा सामना करण्यासाठी सामुदायिक पाठिंबा, आरोग्यसेवेची उपलब्धता आणि जागतिक एकतेची आवश्यकता यावर भर देते. आपण सर्वांनी आपल्या पातळीवर जागरूक होऊन ड्रग्ज व्यसनाच्या विरोधात लढले पाहिजे.

देशातील सर्वात शिक्षित राज्य असलेल्या केरळमध्ये पंजाबपेक्षा जास्त व्यसनी आहेत. हो, ही आकडेवारी भयावह आहे. २०२४ मध्ये, केरळमध्ये नार्कोटिक ड्रग्ज अँड सायकोट्रॉपिक सबस्टन्स कायद्यांतर्गत २७,७०१ प्रकरणे नोंदवली गेली, जी पंजाबमधील ९,०२५ प्रकरणांपेक्षा तिप्पट आहे. देशातील सर्व राज्यातून केरळमध्ये ड्रग्जशी संबंधित प्रकरणांचे प्रमाण सर्वाधिक आहे. गेल्या चार वर्षांत, केरळमध्ये ८७,१०१ ड्रग्जशी संबंधित प्रकरणे नोंदवली गेली, जे मागील वर्षाच्या तुलनेत १३० टक्के वाढ आहे. प्रत्येक जिल्हा प्रभावित आहे आणि या वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यांत, ३० खून ड्रग्जच्या गैरवापराशी संबंधित होते, जे राज्यातील एकूण खूनांपैकी निम्मे आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, भारतातील रस्त्यांवर ५० लाखांहून अधिक मुले अमानुष परिस्थितीत राहतात आणि काम करतात, जिथे त्यांना अंमली पदार्थांच्या गैरवापराचा धोका जास्त असतो. सरकारने सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की, देशात १० ते १७ वयोगटातील १.५८ कोटी मुले अंमली पदार्थांचे व्यसन करतात.

डब्लूएचओच्या मते, अल्कोहोलच्या हानिकारक वापरामुळे दरवर्षी ३.३ दशलक्ष मृत्यू होतात, तंबाखू उत्पादनांवर उत्पादन शुल्क म्हणून वसूल केलेल्या प्रत्येक १०० रुपयांमागे भारतीय अर्थव्यवस्थेला ८१६ रुपयांचे नुकसान होते, २०१७ ते २०१८ दरम्यान ३५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या लोकांसाठी तंबाखूच्या वापरामुळे होणारे सर्व आजार आणि मृत्यूंचे आर्थिक नुकसान २७.५ अब्ज अमेरिकन डॉलर्स होते. २०११ ते २०५० दरम्यान, अल्कोहोलशी संबंधित मृत्यूंमुळे २५८ दशलक्ष आयुष्य वर्षे गमावली जातील. अंमली पदार्थांच्या वापराच्या विकाराने ग्रस्त असलेल्या ६४ दशलक्ष लोकांपैकी, ११ पैकी फक्त १ व्यक्तीला उपचार मिळतो. अंमली पदार्थांच्या वापराच्या विकाराने ग्रस्त असलेल्या १८ पैकी फक्त १ महिला उपचार घेते, तर ७ पैकी फक्त १ पुरुष उपचार घेतात. गृह मंत्रालयाने १८ मार्च २०२५ रोजी लोकसभेत सांगितले की, गेल्या पाच वर्षांत देशभरातील बंदरांमधून १९ प्रकरणांमध्ये एकूण ११,३११ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे ड्रग्ज जप्त करण्यात आले. सतत कारवाई करूनही, भारतात अंमली पदार्थांचे व्यसन वाढत आहे, नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोच्या मते, भारतात अंदाजे १०० दशलक्ष लोक विविध अंमली पदार्थांच्या व्यसनांनी ग्रस्त आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या औषध आणि मानसोपचार विषयक कार्यालय ने प्रकाशित केलेल्या जागतिक औषध अहवाल २०२४ नुसार, जागतिक अंमली पदार्थाचा वापर २९२ दशलक्ष लोकांपर्यंत पोहोचला आहे, जो मागील दशकाच्या तुलनेत २० टक्के वाढ आहे.

२०१९ ते २०२१ दरम्यान उत्तर प्रदेश, महाराष्ट्र आणि पंजाब सारख्या राज्यांमध्ये नार्कोटिक्स ड्रग्ज अँड सायकोट्रॉपिक सबस्टन्स कायद्यांतर्गत सर्वाधिक एफआयआर नोंदविण्यात आले. २०१९ मध्ये सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने केलेल्या भारतातील अंमली वापराच्या प्रसार आणि पद्धतीवरील राष्ट्रीय सर्वेक्षणानुसार, १० ते ७५ वयोगटातील १६० दशलक्ष लोक सध्या दारूचे सेवन करत आहेत. यापैकी ५.२ टक्के लोक दारूवर अवलंबून आहेत. बनावट दारूमुळे देशात व्यसनी लोकांचा मोठ्या प्रमाणात मृत्यू होतो. मद्यपान हा एक जुनाट आजार आहे ज्यामुळे लोकांना दारूची इच्छा होते आणि ते त्यांचे मद्यपान नियंत्रित करू शकत नाहीत.

व्यसनींना त्वरित उपचार देण्याची आणि नवीन पिढीचे ड्रग्जकडे वाढणारे आकर्षण थांबवण्याची गरज आहे. यामध्ये सरकार, धर्मादाय संस्था आणि जनतेचे परस्पर सहकार्य अत्यंत आवश्यक आहे. पालकांनी त्यांची जबाबदारी समजून घेतली पाहिजे, त्यांच्या निष्काळजीपणामुळे मुले भरकटू नयेत आणि समाज आणि देशासाठी समस्या बनू नयेत. पालकांचे मुलांवर नियंत्रण, सभोवतालचे पोषक वातावरण, जागरूकता आणि कुटुंबातील सदस्यांमधील चांगले समन्वय त्यांना व्यसनापासून मुक्त ठेवू शकते. पालकांनी मुलांचा हट्टीपणा, खोटा देखावा आणि गरज यातील फरक समजून घेतला पाहिजे. मुलांचे फक्त लाड पुरवणे किंवा पालकांनी व्यस्ततेच्या नावाखाली मुलांवरील नियंत्रण गमावू नका. मुलांच्या हालचालींकडे लक्ष द्या. मैत्रीपूर्ण वातावरण निर्माण करून मुलांसोबत वेळ घालवा. त्यांना चांगल्या आणि वाईट गोष्टींबद्दल ज्ञान आणि प्रेरणादायी धडे द्या. त्यांना जबाबदाऱ्या आणि नातेसंबंधांचे मूल्यांकन करायला शिकवा. मुले मोठ्यांचे अनुकरण करतात, म्हणून मुलांसमोर अनुचित वर्तन टाळा. नशा करू नका किंवा आपल्या प्रियजनांना सुद्धा नशा करू देऊ नका. मुलांना सोशल मीडिया, ऑनलाइन गेम, उत्तेजक फॅशन आणि मोबाईलपासून दूर ठेवा. मुलांना त्यांच्या निरागसतेने आणि बालपणाने जगू द्या, त्यांना गॅजेट्स पासून दूर करून बाहेर फिटनेस, क्रीडा स्पर्धा, खेळ खेळण्यास प्रोत्साहित करा. मुलांच्या मोहात पालकांनी भावनांवर आधारित निर्णय घेऊ नयेत, तर मुलांच्या उज्ज्वल भविष्याचा विचार करून धोरणे बनवावीत आणि मुलांना नैतिकता, परोपकार, सत्यता, मानवतेचे धडे शिकवा. अशी संस्कारशील मूल्ये असलेली मुले कधीही ड्रग्जचे व्यसन लावू शकत नाहीत आणि तरच देशाचे भविष्य ड्रग्जमुक्त होऊन सशक्त बनेल.

* * *



डॉ. प्रितम भि. गेडाम
(असीस्टेंट प्रोफेसर)
+०८२३७४१७०४१
prit00786@gmail.com

गुरुवार, दि. २६ जून २०२५
# चंद्रपूर महासागर
पान ६

## शाळा प्रवेशोत्सव दिवस आनंदात साजरा

**चंद्रपूर, दि. २५ जून :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खरबी येथे बैलगाडीतून शाळा प्रवेशोत्सव प्रभात फेरी काढण्यात आली. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. पसारे मॅडम, सौ. राऊत स. शिक्षिका, सुप्रिया बावनथडे युवा प्रशिक्षक यांनी नवागताचे स्वागत. कुंकू टिळा लावून पुष्प गुच्छ देऊन केले पहिल्या दिवशी मुलांना पाठ्यपुस्तके, गणवेश बूट पायमोजे,व बॅग वितरित करण्यात आले. शाळेला घनश्याम पसारे कृषी अधिकारी प. स. ब्रह्मपुरी व पिपरे, शि.वि. अधिकारी माध्यमीक जि .प .चंद्रपूर यांची भेट देऊन विद्यार्थ्यांशी हितगुज साधले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

## श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या स्मृतीदिनानिमित्त भाजपच्या वतीने अभिवादन

**चंद्रपूर, दि. २४ जून :** भारतीय जनसंघाचे संस्थापक आणि राष्ट्रवादी विचारसरणीचे महान नेतृत्व असलेले डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या स्मृतीदिनानिमित्त भारतीय जनता पार्टी चंद्रपूर विधानसभा मतदारसंघाच्या वतीने आमदार किशोर जोरगेवार यांच्या जनसंपर्क कार्यालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यानंतर उपस्थित पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी त्यांच्या कार्याला आणि बलिदानाला आदरांजली वाहिली. या प्रसंगी भारतीय जनता पक्षाचे महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, भाजप युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष रघुवीर आहिर, भाजपचे माजी शहराध्यक्ष दशरथसिंह ठाकूर, मनोज पाल, सुरेश तालेवार, दिनकर सोमलकर आदि उपस्थित होते.

# ट्रॅक फसल्याने गांगलवाडी आवळगाव मार्ग बंद

### तातडीने रस्त्याचे काम सुरू करा अन्यथा तीव्र आंदोलन – विनोद झोडगे

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. २५ जून :** गांगलवाडी ते मुडझा मार्गावर आज दिनांक २५ जूनला सकाळच्या सहा वाजताच्या सुमारास रेती वाहतूक करीत असलेला ट्रक बरडकिन्ही गावाजवळ खड्डयात फसल्याने या मार्गावरून येणाऱ्या वाहन चालकांना १० तास वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला आहे.

वाहतूक ठप्प झाल्याने या मार्गावरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्यात आली

हळदा आवळगाव मार्गाने गांगलवाडीच्या दिशेने रेती वाहतूक करीत असलेला ट्रक (स्प २९ ७९८२ ) बरडकिन्ही गावाजवळ सकाळी सहाच्या सुमारास रस्त्याच्या मधोमध असलेल्या खड्डयामध्ये



फसल्याने वाहतूक कोंडी होण्यास सुरुवात झाली. गांगलवाडी मुडझा मार्गाने जड वाहतूक होत असल्याने रस्त्याला जागोजागी खड्डे पडले आहेत. निवडणुकीपूर्वीच आमदार विजय वडेट्टीवार यांनी रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन केले. वर्षभरापासून या रस्त्याचे काम सुरू आहे, मात्र रस्त्याच्या कामाला गती मिळत नसल्याने जागोजागी पडलेल्या खड्डयांचा त्रास येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना करावा लागत आहे. काल रात्रभर पाऊस आल्याने रस्त्यावरील खड्डयांमध्ये पाणी साचलेला असल्याने वाहन चालकाला त्याचा अंदाज न आल्याने खड्डयांमधून गाडी गेल्याने पूर्णतः ट्रक रस्त्याच्या मधोमध फसला. सकाळपासूनच वाहतूक कोंडी होण्यास सुरुवात झाली व जवळपास दहा तासापर्यंत या मार्गावरुन येणाऱ्या वाहन चालकांना वाहतूक कोंडी चा सामना करावा लागला. घटनास्थळी कम्युनिस्ट पार्टीचे विनोद झोडगे उपस्थित होऊन संबंधित ठेकेदाराला तात्काळ बोलावून मार्ग काढण्याचे सांगितले त्यानंतर बांधकाम अभियंत्याशी बोलून तात्काळ रस्त्याचे बांधकाम करावे अन्यथा तीव्र आंदोलन करू असा इशारा यावेळी विनोद झोडगे यांनी दिला. त्यानंतर जेसीबीच्या साह्याने ट्रक बाहेर काढल्याने या मार्गावरील वाहतूक सुरळीत झाली. विनोद झोडगे यांनी बोलल्यानंतर तात्काळ खड्डे बुजवण्याला सुरुवात करणार असल्याचे मान्य करीत खड्डे बुजवण्यास सुरुवात केली आहे.

परिसरात खरीप हंगामाची कामे जोमात सुरू आहेत शेतकऱ्यांना बी बियाणे घेण्याकरिता गांगलवाडी ब्रह्मपुरी ला व भाजीपाला विक्रेत्यांना तसेच शैक्षणिक सत्र सुरू झाल्याने विद्यार्थ्यांना सुद्धा व नागरिकांना तालुक्याच्या ठिकाणी दैनंदिन जावे लागते. गेल्या चार वर्षापासून या मार्गाची दैनंदिन अवस्था झाली असून खड्डयात रस्ते की रस्त्यात खड्डे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. जड वाहतूक जोमात सुरू असल्याने रस्त्याची पुन्हा दैनंदिन अवस्था होत असून तात्काळ दुरुस्ती करावी अन्यथा या ठिकाणी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा विनोद झोडगे यांनी दिला आहे.

# लोखंडी रॉड ने इसमास जबर मारहाण

### एक गंभीर जखमी

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**वरोरा, दि. २५ जून :** वरोरा तालुक्यातील आमडी येथील रहिवाशी आरोपी रमेश देवराव इंगोले वय ४७ वर्ष रा. आमडी याने लोखंडी रॉड च्या साहाय्याने जबर मारहाण केली त्यात प्रमोद वामन ठाकरे, वय २८ वर्ष, हा गंभीर जख्मी झाला, ही घटना दि. २४ला सकाळी वडकेश्वर देवस्थान तेथे घडली.

प्रमोद वामन ठाकरे, वय २८ वर्ष, हा नेहमीच वडकेश्वर देवस्थान येथील शनी देवता ची पूजा अर्चना करण्यासाठीं दर शनिवारी, मंगळवारी सकाळी जात होता दि. २४ जून रोजी आरोपीचया मनात जख्मी च्या बाबत पत्नी बद्दल संशय असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे त्यातूनच वामन ठाकरे यास लोखंडी



रॉड ने जबर मारहाण केली जखमी ला गंभी र अवस्थेत उपजिल्हा रूग्णालयात दाखल केले. प्रकुर्ती गंभीर असल्याने त्यास जिल्हा रूग्णालय चंद्रपूर येथे हलविण्यात आले.घटनास्थळावरून आरोपी फरार झाल्यानें पोलिसांनी आरोपींचा शोध घेत आज दि. २५ जून रोजी अटक केली. आरोपींवर कलम १०९,३५१ (२) भा.न्या.स. अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीने जहर पिल्याने अस्वस्थ वाटू लागल्याने त्यास उपजिल्हा रुग्णालय येथे दाखल करण्यात आले.

ही कारवाही उप विभागीय पोलीस अधिकारी नायोमी साठम यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक अजिंक्य तांबडे, ए.पी.आय.शरद भस्मे पो. ह. किशोर बोडे करीत आहे.

# आरक्षण सोडत कडे सर्वच पक्षाच्या नजरा

### स्थानिक स्वराज संस्था आणि नगर पालिका निवडणुका

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. २५ जून :** येत्या दोन महिन्यात स्थानिक स्वराज संस्था आणि नगर पालिकाचे निवडणूका जाहीर होणार आहे. मात्र आता पासून पान टपऱ्यावर निवडणुकी बाबत चर्चा ऐकायला मिळत आहे. आता सर्वच पक्षाच्या नेते मंडळी आरक्षण सोडत कडे लक्ष लागेल आहे.

मागील राजुरा नगरपालिकेत अध्यक्ष पदाकरीता खुला वर्ग आरक्षण निघाले होते. मात्र यावेळी महिला ओबीसी अथवा खुला आरक्षण येणार अशी राजकीय



वर्तुळत चर्चा सुरु आहे.

मागील सन २०१७ नुसार जिल्हा परिषद निवडणुकीत एकूण चार सर्कल तयार करण्यात आले होते. आर्वी पाचगाव एससी राखीव, सास्ती ओबीसी राखीव, चुनाळा सुबई एस टी राखीव, तर देवाडा डोंगरगाव ओपन महिला करिता राखीव करण्यात आले होते. मात्र उद्धव ठाकरे यांचा सरकार असताना तालुक्यात जिल्हा परिषदेचे एकूण पाच सर्कल तयार करण्यात आले. रामपूर- धोपटाळा ओबीसी महिला, चुनाळा- विरूर ओबीसी ओपन, सुब्बई -देवाडा एस सी, पाचगाव - भेडवी ओपन तर सास्ती गोवरी एसटी करिता राखीव करण्यात आले होते. आता मात्र देवेंद्र फडणवीस सरकार हे आरक्षण कायम ठेवणार कीं यात बदल करणार या बद्दल त्यांची भूमिका अस्पष्ट दिसून येत आहे.

राजुरा नगरपालिका अध्यक्ष पदाकरिता महिला ओबीसी किव्हा खुला अथवा पुरुष खुला आरक्षण निघाला तर सर्वच पक्षाचे नेते मंडळी आपले उमेदवार रिंगणात उभे करण्यास सक्षम असल्याचे राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

त्याकरिता सर्वच पक्षाचे इच्छुच उमेदवार लग्न समारंभ, मैयतीत अथवा एखाद्या कार्यक्रमांमध्ये आवर्जून उपस्थिती दर्शविण्यात येत आहे. आपली उमेदवारी पक्की करण्यासाठी इच्छुक उमेदवार पक्षश्रेष्टीच्या गाठीभेटी घेणे सुरू आहे. मात्र अद्याप कोणत्याही पक्षाच्या नेते मंडळींनी कोणत्याही इच्छुक उमेदवारांना शब्द न दिल्याचे चर्चा आहे. जोपर्यंत आरक्षण घोषित होणार नाही तोपर्यंत उमेदवाराला वचन देणार नाही अशी भूमिका नेते मंडळींनी घेतली आहे. एवढे मात्र खरी आहे की आरक्षण सोडत कडे सर्वच पक्षाच्या नेते मंडळी सोबत इच्छुक उमेदवाराच्या नजरा लागलेल्या आहेत

## ब्रम्हपूरी कॉंग्रेसच्या वतीने २७ जून रोजी विराट मोर्चाचे आयोजन

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. २५ जून :** शेतकरी, शेतमजूर, संजय गांधी व श्रावणबाळ योजनेतील लाभार्थी यांच्या हितासाठी झोपलेल्या युती सरकारला जाग आणण्यासाठी महाराष्ट्र विधानसभेचे माजी विरोधी पक्षनेते, विधीमंडळ कॉंग्रेस पक्षनेते, आमदार विजयभाऊ वडेट्टीवार यांच्या प्रमुख उपस्थितीत ब्रम्हपूरी तालुका व शहर कॉंग्रेस कमिटीच्या वतीने दि. २७ जुन रोजी शुक्रवारी सकाळी ११ वाजता तहसिल कार्यालय ब्रम्हपुरी येथे भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी तालुक्यातील संपुर्ण शेतकरी, शेतमजूर, संजय गांधी व श्रावणबाळ योजनेतील लाभार्थी यांनी मोठ्या संख्येने मोर्चाकरीता उपस्थित राहण्याचे करावे असे आवाहन ब्रम्हपूरी तालुका व शहर कॉंग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे. सदर मोर्चाला कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातून सुरुवात होवून तहसील कार्यालय ब्रम्हपूरी येथे समाप्ती होईल. सदर मोर्चा हा विविध मागण्यांसाठी काढण्यात येत आहे. त्यामध्ये शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करण्यात यावी. संपुर्ण शेतकऱ्यांची बोनसची रक्कम ८ दिवसाच्या आत जमा करण्यात यावी. संजयगांधी निराधार तसेच श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांचे गेल्या ६ महिण्यांपासून थकित असलेले मानधन तात्काळ देण्यात यावे. सामुहिक वन हक्क समिती मध्ये होत असलेल्या गैर प्रकारची चौकशी करुन राधा ऑर्गनायजेशनवर कारवाई करण्यात यावी.

# शेतीच्या खरेदी विक्री व्यवहारात सुनिल वरारकर कडून फसवणुक

### कायदेशीररीत्या शेतजमिन खरेदी करूनही प्राणघातक हल्ला - गुन्हा दाखल

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. २५ जून :** राजुरा तालुक्यातील रानवेली शेतशिवारात कायदेशीररीत्या शेताची खरेदी केल्यावरही सुनिल वरारकर हे शेतावर अतिक्रमण करून जबरीने शेतीची वाहिती करण्याचा प्रयत्न करीत आहेत. सेलोटे हे मालकीच्या शेतात गेल्यावर सुनिल वरारकर व त्याचे वडील आबाजी वरारकर यांनी कु-हाड घेऊन शेत मालकाला जीवे मारण्याची धमकी दिली व हल्ला केला. याप्रकरणी त्यांचेवर राजुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. आम्ही रितसर रजिष्ट्री करूनही व नावावर जमिन असूनही शेतात गेल्यास जीवे मारण्याच्या धमक्या देणा-या आरोपीवर कडक कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी एम. के. सेलोटे यांनी राजुरा येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत केली.



राजुरा तालुक्यातील रानवेली शिवारात सुनिल वरारकर यांची शेतजमिन सर्वे नंबर १२५ उत्तर बाजू, आराजी ३ एकर शेतजमिन दिनांक १८ ऑगस्ट २०२२ रोजी खरेदीखताद्वारे निलीमा मुखरू सेलोटे यांनी खरेदी केली. रजिष्ट्री होऊन शेतमालकाचे बॅंक खात्यावर रक्कम जमा झाली आणि नंतर फेरफारही झाला. यानंतर पत्नीची प्रकृती ठीक नसल्याने शेती स्वत: न करता वार्षिक ३५ हजार रूपये ठेक्याने जुने शेतमालक वरारकर यांना दिली. यावर्षी सेवानिवृत्त झाल्यावर शेती करायची असल्याने सेलोटे यांनी करारानुसार हिश्शाची मोजणी करून हिस्सा वेगळा करून देण्याची मागणी केली. तेव्हा त्याने विरोध केला आणि मी तुम्हाला शेती विकली नाही, असा पवित्रा घेतला. सध्या शेतीचे दर वाढल्याने सुनिल वरारकर ने व्याजाचा खोटा आरोप लावून मला बेदखल करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे सेलोटे यांनी सांगितले.

दिनांक ५ जून २०२५ ला सहका-यांसह सेलोटे शेतीवर गेले असता चवताळून कु-हाड घेऊन सेलोटे यांना मारण्याचा प्रयत्न केला परंतू मध्यस्त आल्याने अनुचित घटना टळली. यामुळे सुनिल वरारकर यांच्याविरुद्ध सेलोटे यांनी राजुरा पोलिसांत तक्रार दाखल केली. या संदर्भात राजुरा पोलीसांनी दिनांक ०५ जून २०२५ ला भारतीय न्याय संहीता कलम ३५१ (२) व २९६ नुसार सुनिल वरारकर यांचेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# आणीबाणी विरोधातील संघर्ष लढ्याचे छायाचित्र प्रदर्शन

### जिल्हाधिका-यांच्या हस्ते उद्घाटन, प्रशासकीय इमारत येथे २५ ते २८ जून पर्यंत नागरिकांसाठी खुले

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २५ जून :** देशातील आणीबाणीला ५० वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधून केंद्र आणि राज्य सरकारच्या सुचनेनुसार आणीबाणी विरोधातील संघर्ष लढ्याचे नागरिकांना अवलोकन व्हावे, या उद्देशाने जिल्हा प्रशासन आणि जिल्हा माहिती कार्यालय, चंद्रपूरच्या वतीने चार दिवसांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

सदर प्रदर्शन प्रशासकीय इमारतीमध्ये दि. २५ ते २८ जूनपर्यंत कार्यालयीन वेळेत नागरिकांसाठी खुले राहणार आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन



जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, जिल्हा माहिती अधिकारी राजेश येसनकर आदी उपस्थित होते.

प्रदर्शनामध्ये समाविष्ट बाबी : पुरातन काळापासून भारतात सुरू असलेली लोकशाही व्यवस्था, लोकशाही परंपरेनुसार यात असलेला लोकांचा सहभाग व दृष्टीकोण, लोकशाहीचे तत्व, भारतीय परंपरा आणि सामुहिक भागीदारीने चालविण्यात आलेले शासन, ग्रामीण आणि शहरी भागातील जमीन स्तरावरील लोकशाही व्यवस्था, स्वतंत्र भारत आणि लोकशाही प्रणाली, आणीबाणीपूर्व व पश्चात भारतीय समाजव्यवस्था, आणीबाणी लावल्यानंतर प्रसिध्द झालेले राजपत्र, प्रसारमाध्यमांवरील निर्बंध, सरकारच्या विरोधात जनआंदोलन, आणीबाणी संपल्यानंतर लोकशाही मुल्यांच्या रक्षणासाठी उचलण्यात आलेली पाऊले, चंद्रपूर जिल्ह्यातील नागरिकांचा आणीबाणी विरोधातील संघर्ष लढा, आदींचा यात समावेश करण्यात आला आहे.

### आणीबाणीधारकांना प्रमाणपत्राचे वाटप

आणीबाणीत तुरुंगवास भोगलेल्या नागरिकांना जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. यात हेमंत वासुदेव डहाके, गिरीश वासुदेवराव अणे, अनिल मधुकर अंदनकर, सुधीर वसंतराव टिकेकर, नारायण कृष्णराव पिंपळापुरे, कृष्णा दत्तात्रय देशपांडे यांचा समावेश होता.

# आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून आरोग्यसेवा थेट नागरिकांच्या दारी

### पळसगाव येथे मोफत मोतीबिंदू नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर नागरिकांनी मोठ्या संख्येने शिबिराचा लाभ घेण्याचे आयोजकांचे आवाहन

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २५ जून :** बल्लारपूर विधानसभा क्षेत्रात विकासासोबतच आरोग्य सेवा गावागावात पोहोचविण्याच्या उद्देशाने राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून मोफत मोतीबिंदू नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले आहे. हे शिबिर श्री माता कन्यका सेवा संस्था, चंद्रपूर व शालिनी ताई मेघे हॉस्पिटल व रिसर्च सेंटर, वानाडोंगरी, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले असून नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

रविवार दिनांक २९ जून २०२५ रोजी हे शिबिर सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय, पळसगाव, ता. बल्लारपूर, जि. चंद्रपूर येथे होणार आहे.तपासणी दरम्यान जे रुग्ण शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरतील, त्यांना नागपूर येथे ने-आण, राहण्याची व औषधोपचाराची मोफत सुविधा देण्यात येणार आहे. शस्त्रक्रिया शालिनी ताई मेघे हॉस्पिटल, नागपूर येथे केली जाणार आहे.

आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून आतापर्यंत ३५ हजाराच्यावर मोफत चष्मे वाटप आणि १५ हजारांहून अधिक मोतीबिंदू रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री माता कन्यका सेवा संस्था चंद्रपूरचे सचिव राजेश्वर सुरावार यांनी केले आहे.

### नेत्र शस्त्रक्रियेसाठी ४५० रुग्ण रवाना

आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून बल्लारपूर विधानसभा क्षेत्रात दिनांक ३ मे २०२५ पासून नेत्र तपासणी शिबिराची सुरुवात झाली. विसापूर, नांदगाव पोडे, हडस्ती, बामणी, कळमना, जुनोना, कोठारी, चिचपल्ली, अजयपूर, दुर्गापूर, इंदिरानगर, मूल, राजोली, गिलबिली, बोर्डा, सुशी, केळझर, कांतापेठ, चिरोली, चांदसूर्ला आणि पडोली या गावांमध्ये मोफत शिबिरे आयोजित करण्यात आली. या शिबिरांमध्ये नेत्र तपासणी करण्यात आली असून, तपासणीनंतर ४५० रुग्णांना नेत्र शस्त्रक्रियेसाठी नागपूरच्या वानाडोंगरीतील रुग्णालयात पाठविण्यात आले.


# घोटाळेबाजांची एसआयटीमार्फत चौकशी करावी

### विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे शुक्रवारी धरणे / निदर्शने आंदोलन

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २५ जून :** राज्यातील बोगस शिक्षक पदभरती प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करावी व विदर्भातील शिक्षण विभागातील अधिकारी यांची रिक्त पदे पदोन्नतीने तात्काळ भरण्यात यावी, या दोन प्रमुख मागण्यांसाठी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने आमदार सुधाकर अडबाले यांच्या नेतृत्वात एक दिवसीय धरणे / निदर्शने आंदोलन करण्यात येत आहे.

नागपूर विभागासह राज्यात शिक्षण विभागातील बोगस शिक्षक पदभरती घोटाळा गाजत आहे. ज्ञानदानाचे कार्य करणाऱ्या पवित्र शिक्षण विभागातील या प्रकरणाची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. तेव्हा नागपूर विभागातील बोगस शिक्षक पदभरती घोटाळ्यासह राज्यात शिक्षक पदभरती बंद असताना शिक्षण विभागात झालेल्या शिक्षक पदभरतीची राज्यस्तरावरून एसआयटी नियुक्त करून चौकशी करण्यात यावी व दोषींवर तात्काळ कारवाई करण्यात यावी तसेच विदर्भातील शिक्षण उपसंचालक (नागपूर / अमरावती), शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), वेतन पथक अधीक्षक (प्राथमिक / माध्यमिक), लेखाधिकारी, गटशिक्षणाधिकारी ही महत्वाची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त आहेत. त्यामुळे वरील सर्व रिक्त पदे पदोन्नती / बदलीने तात्काळ भरण्यात यावी, या प्रमुख दोन मागण्यांसाठी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने एक दिवसीय विदर्भस्तरीय धरणे / निदर्शने आंदोलन शुक्रवार, दि. २७ जून २०२५ रोजी, दुपारी ४.०० ते ५.०० वाजेपर्यंत शिक्षण उपसंचालक (नागपूर / अमरावती) यांचे कार्यालयासमोर करण्यात येत आहे.



नागपूर शिक्षण उपसंचालक कार्यालयासमोरील आंदोलन माजी आमदार तथा म.रा.मा.शि. महामंडळ मुंबईचे सरचिटणीस व्ही. यू. डायगव्हाणे यांच्या अध्यक्षतेखाली तर अमरावती शिक्षण उपसंचालक कार्यालयासमोरील आंदोलन हे विमाशि संघाचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले यांच्या नेतृत्वात करण्यात येणार आहे. प्रांतिय अध्यक्ष अरविंद देशमुख हे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहे.

या धरणे / निदर्शने आंदोलनाला विदर्भातील शिक्षक - कर्मचारी, समविचारी संघटनेचे पदाधिकारी, सदस्य यांनी मोठ्या संख्येने उपसथित राहावे, असे आवाहन विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतीय उपाध्यक्ष रमेश काकडे, जयप्रकाश थोटे, विजय ठोकळ, जयदीप सोनखासकर, विगागीय कार्यवाह चंद्रशेखर रहांगडाले, बाळासाहेब गोटे, कोषाध्यक्ष भूषण तल्हार, जिल्हा, महानगर, तालुका पदाधिकारी, सदस्यांनी केले आहे

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर
मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. निर्मला चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापुन दैनिक चंद्रपूर महासागर कार्यालय, पोपट बिल्डींग जटपुरा गेट, चंद्रपूर येथे प्रकाशित केले. संपादक राहुल चांडक
मुख्य कार्यालय फोन - ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३ * स्थानिक संपादक :- प्रवीण बतकी * (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# भक्तिमार्ग

# मनाचं समाधान...



आयुष्यात येणारे प्रसंग आपल्याला बरंच काही शिकवून जातात. प्रसंग आपल्या आयुष्यात घडलेले असोत वा इतरांच्या, त्यातून काही ना काही बोध घ्यावाच लागतो. एका आप्ताच्या चटका लावणाऱ्या मृत्यूनंतर त्याच्या कुटुंबियांनी दाखवलेल्या धीरोदात्त वृत्तीतून हेच शिकता आलं. ओळखीतल्या एका बाईंचा तरूण मुलगा अपघातात गेला. त्या घरावर मोठी आपत्ती कोसळली. दुःख तर होतंच पण घरातलं वातावरण सामान्य असावं असा प्रत्येकाचाच प्रयत्न होता. मुलाच्या आईने या प्रसंगात धीराचं दर्शन घडवलं. सत्तरीच्या या बाई हस्तकलेच्या वस्तू तयार करतात. अशा प्रसंगात कुणीही खचून जाईल. पण त्या खचल्या नाहीत. मुलाच्या आठवणी होत्या. पण या आठवणी मनात ठेऊन त्यांनी हस्तकलेच्या वस्तू घडवल्या. गुलाबाची सुंदर फुलं तयार केली. प्लॅस्टीकच्या पिशव्यांपासून छोटी फुलं बनवली. तेराव्या दिवसाच्या विधीनिमित्ताने आलेल्या अनेकांना या वस्तू दाखवल्या. या विधीसाठी जमलेल्या नातेवाईकांनी मुलाच्या आठवणी सांगितल्या. पण घरचं वातावरण अगदी सामान्य होतं. घरी आलेल्या प्रत्येक पाहुण्याची काळजी घेतली गेली. कुणाला काही कमी पडू नये याकडे त्यांनी जातीने लक्ष दिलं. दुःखाचं कोणतंही प्रदर्शन मांडलं नव्हतं. घरात वेगळ्या

भक्ती मार्ग

विषयांच्या गप्पा झाला. अपघातात मृत्यू पावलेला मुलगा खूपच लाघवी. माणसं जोडून ठेवणारा. प्रत्येकाच्या मदतीस हजर असणारा. पाककौशल्यं अंगी असणारा. प्रत्येकाला चांगलंचुंगलं खाऊ घालणारा. त्यामुळे त्याच्या मनाला समाधान वाटेल, असंच वातावरण ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न दिसून आला. आत्म्याला मिळणारी शांती म्हणजे तरी दुसरं काय? आपण जे सोडून गेलोय त्याचं अनुकरण इतरांनी करणं, मृताच्या गुणांचं आचरण करणं आणि त्याप्रमाणे जगण्याचा प्रयत्न करणं हीच खरी शांती नाही का?



# चित्रकूटविषयी...

**रामायण-महाभारतकालीन घटनांची साक्ष देणारी अनेक स्थानं आपल्या देशात आहेत. त्यापैकी एक म्हणजे चित्रकूट. श्रीरामचंद्राने वनवासातला सुरूवातीचा काही काळ या स्थानी घालवला होता. मध्य प्रदेशमधल्या सतना जिल्ह्यातल्या मंदाकिनी नदीच्या किनारी हे स्थान**



याच स्थानी राम आणि भरताची भेट झाली. भरताने रामाच्या पादुका याच स्थानी घेतल्या. चित्रकूट हे अत्यंत निसर्गरम्य स्थान. त्यामुळेच वाल्मिकी ऋषींनी रामाला या ठिकाणी राहण्याचा सल्ला दिला होता. या ठिकाणचा धबधबा ९५ फूट उंचावरून कोसळत असल्याने त्याला अमेरिकेतल्या नायगारा धबधब्याची उपमा देण्यात आली आहे. चित्रकूट परिसरातल्या अनेक ठिकाणी श्रीरामाच्या पाऊलांचे ठसे आजही अस्तित्त्वात आहेत. स्फटिक शिळेवर रामाची पावलं उमटली आहेत. याच ठिकाणी राम आणि भरत यांची भेट झाली. श्रीरामाची पावलं या स्थानी उमटली. चित्रकूटपासून पाच किलोमीटर अंतरावर भरत कूप नावाची विहिर आहे. भरताने रामाच्या राज्याभिषेकासाठी इथून पाणी नेल्याचं बोललं जातं. या ठिकाणी भरताचंही मंदिर आहे. त्याच्याच पुढे असलेल्या रामशय्या नावाच्या ठिकाणी राम-सीतेने एकत्र विश्रांती घेतली होती, असं मानतात. इथल्या चरण पादुका ठिकाणाजवळ एक टेकडी आहे. याला लक्ष्मण टेकडी असं म्हटलं जातं. ही लक्ष्मणाची सर्वात आवडती जागा होती. इथे बसून लक्ष्मण पहारा देत असे. इथल्या संकर्षण पर्वतावर हनुमानाचं मंदिर असून सीतेचं स्वयंपाकघरही आहे. या स्थानाच्या आसपास अनेक पवित्र स्थानं आहे. म्हणूनच चित्रकुटाचा महिमा मोठा आहे.

लक्षवेधी तीर्थक्षेत्रे





# गुण मनुष्याचे...

**महाभारतातल्या उद्योगपर्वात चार गुणांचा उल्लेख करण्यात आला आहे. या गुणांचं पालन करणाऱ्या व्यक्तीवर परमेश्वर प्रसन्न होतो आणि त्याची कृपादृष्टी राहते असं म्हटलं जातं. कोणते आहेत हे गुण?**



सत्य आणि धर्म हे अत्यंत महत्त्वाचे गुण मानले जातात. धर्माने वागणारा आणि सत्यवादी धर्मराजा म्हणजे युधिष्ठिर श्रीकृष्णाला अत्यंत प्रिय होता. आयुष्यातल्या प्रत्येक प्रसंगात युधिष्ठिराने धर्माचं पालन केलं. दुःख भोगावं लागलं तरी त्याने धर्माची साथ कधीही सोडली नाही. त्यामुळे श्रीकृष्ण कायम त्याच्या सोबत राहिला. कायम सत्य बोलणाऱ्या आणि धर्माचं पालन करणाऱ्या व्यक्तीच्या पाठीशी परमेश्वर ठामपणे उभा राहतो हे लक्षात ठेवावं.

धर्मग्रंथातून

* लज्जा हा तिसरा गुणधर्म. श्रीकृष्णाने १६,००० स्त्रियांशी विवाह केला होता. नरकासूर राक्षसाने या १६,००० राजकन्यांचं अपहरण केलं होतं. श्रीकृष्णाने त्यांची सुटका केली. सुटकेनंतर या राजकन्यांच्या चेहऱ्यावर जाणवणारी लज्जा आणि आपल्याप्रती असलेली समर्पण वृत्ती जाणून श्रीकृष्णाने त्यांच्याशी विवाह केला होता. परमेश्वराप्रती समर्पित वृत्ती आणि लज्जेचा भाव असणाऱ्या भक्तावर भगवंत प्रसन्न होतो.

* साधेपणा हा चौथा गुण. सुदामा हा श्रीकृष्णाचा प्रिय मित्र. सुदामाचा साधेपणा कृष्णाला भावायचा. निर्मळ मनाचा, सा[illegible] जपणारा मनुष्य परमेश्वराला भावतो.



# कशा असाव्यात देवघरातल्या मूर्ती?

**देवघर कसं असावं, कोणत्या दिशेला असावं, देवघरातल्या मूर्तीचा आकार कसा असावा याबाबत अनेक समज-गैरसमज आहेत. फारशी माहिती नसल्याने चुकीच्या मूर्ती देवघरात ठेऊन आपण नकारात्मक ऊर्जेला आकर्षित करतो. देवाच्या उभ्या मूर्ती देवघरात असू नयेत. याबाबतच्या कारणांविषयी..**



देवघरात स्थापन केलेल्या देवाच्या मूर्तीमुळे घरात सकारात्मक आणि नकारात्मक ऊर्जा प्रवेश करते.

* हिंदूधर्मीयांचे ३३ कोटी देव आहेत. प्रत्येक देवाची रूपे वेगळी, अवतार वेगळे. प्रत्येक देवाच्या मूर्ती विविध पद्धतीने घडवल्या जातात. काही मूर्ती उभ्या असतात तर काही बसलेल्या. काहींना चार भुजा असतात तर काही अष्टभुजा आणि दशभुजाही असतात. काही मूर्ती आडव्या झोपलेल्या असतात.

जाणून घ्या

* ठराविक स्थितीतल्या मूर्ती घरात ठेवल्याने आपल्या तसंच कुटुंबातल्या सदस्यांच्या आयुष्यात अडचणी येण्याची शक्यता असते.

* शास्त्रानुसार गणपती आणि देवी लक्ष्मीच्या उभ्या मूर्ती घरात असू नयेत. या देवतांच्या उभ्या मूर्तींमुळे घरात नकारात्मक ऊर्जा प्रवेश करते, असं मानलं जातं.

* हिंदूंच्या धार्मिक ग्रंथांनुसार या दोन्ही मूर्ती बसलेल्या स्थितीत असाव्यात. या दोन मूर्तींमध्ये १० इंचांपेक्षा जास्त अंतर नसावं.

* देवघरात बाळकृष्ण ठेवावा. कृष्णाची बासरी वाजवणारी उभी मूर्ती देवघरात ठेऊ नये.

* मृत व्यक्तींच्या तसबिरी देवघरात ठेऊ नयेत.

* देवघराला कधीही कुलूप लावू नये.

* देवघर नेहमी स्वच्छ ठेवावं.

# नका सोडू धैर्य!



**आयुष्यात चढ-उतार येत राहतात. अडचणीच्या काळात खचून जाता कामा नये. धीर एकवटून प्रत्येक गोष्टीचा सामना करायला हवा. आयुष्यात धैर्याला प्रचंड महत्त्व आहे. आयुष्यातल्या कोणत्या प्रसंगांचा सामना धीराने करायला हवा?**

प्रत्येक व्यक्तीसाठी आपला मान-सन्मान महत्वाचा असतो. आयुष्यात अपमानीत होण्याचे काही प्रसंग येतात. ज्येष्ठ व्यक्तींचं बोलणं माणूस सहन करतो पण लहानांनी केलेला अपमान सहन होत नाही. रागाच्या भरात माणूस चुकीचं पाऊल उचलतो. मात्र अशा प्रसंगी धैर्य आणि मानसिक संतुलन ढळू देता कामा नये. प्रसंग नीट हाताळता आलं पाहिजे. समोरचा रागात असताना आपण शांत राहणं गरजेचं आहे.

आर्ट ऑफ लिव्हींग

* सहचरासोबत आपलं अनोखं नातं असतं. विश्वासाने हे नातं बळकट होत असतं. पण अविश्वासाचे प्रसंगही येतात. अशा परिस्थितीत धीर सोडता कामा नये. आपलं नातं टिकवून ठेवण्यासाठी प्रसंगी नमतं घ्यावं लागलं तरी हरकत नाही. स्त्री-पुरूष दोघांनाही हे तत्वं लागू पडतं.

* अपयशामुळे माणूस खचतो. वारंवार अपयश येत असेल तर स्वतःवरचा विश्वास उडतो. पण आत्मविश्वास ढळू न देता प्रयत्न करत राहायला हवेत. एक दिवस यश नक्की मिळेल, असा विश्वास मनात असला पाहिजे.




# देव कुठे आहे?

अकबर आणि बिरबलाच्या अनेक कथा प्रचलित आहेत. त्यापैकी एक ईश्वराच्या अस्तित्त्वाविषयी आहे. या कथेतून आपल्याला बराच बोध घेता येईल. देव कुठे राहतो, त्याला कसं प्राप्त करायचं, देव काय करतो असे तीन प्रश्न अकबराने बिरबलाला विचारले. बिरबल या प्रश्नांची उत्तरं शोधण्यात गढून गेला. बिरबल चिंतेत असल्याचं दिसताच त्याच्या मुलाने याचं कारण विचारलं. बिरबलाने त्याला प्रश्नांबाबत सांगितलं. दरबारात आपण या प्रश्नांची उत्तरं देऊ, असं बिरबलाच्या मुलाने त्याला सांगितलं. पहिल्या प्रश्नाच्या उत्तरादाखल मुलाने एक उदाहरण दिलं. दुधात साखर घालून अकबराला ते चाखायला सांगितलं. दुध गोड लागत असल्याचं अकबराने सांगितल्यावर त्यात साखर दिसते का, असा प्रश्न मुलाने विचारला. साखर दुधात विरघळून गेल्याचं अकबराने सांगताच बिरबलाच्या मुलाने ईश्वरही असाच चराचरात विरघळून गेल्याचं सांगितलं. देवाला कसं प्राप्त करायचं या प्रश्नाच्या उत्तरादाखल बिरबलाच्या मुलाने दही आणायला सांगितलं. दह्यात लोणी आहे का, असा प्रश्न त्याने विचारला. यावर दह्यात लोणी आहे पण घुसळल्यानंतरच ते दिसेल, असं उत्तर दिलं. त्याचप्रमाणे ईश्वरही चिंतनानंतरच प्राप्त होतो, असं उत्तर मुलाने दिलं. देव काय करतो, या प्रश्नाच्या उत्तरादाखल मुलाने अकबराला आपला शिष्य बनायला सांगितलं. गुरू उच्च आसनावर बसतो आणि शिष्य खाली बसतो असं सांगितल्यावर अकबर खाली बसला आणि मुलाला आसनावर बसायला दिलं. देव राजाला रंक आणि रंकाचा राजा करतो असं सांगितल्यावर अकबर खूश झाला. देवाच्या अस्तित्त्वाबद्दल अकबराच्या मुलाने दिलेली उत्तरं आजच्या काळातही तितकीच समर्पक आहेत.

भक्तीगाथा



# आर्थिक अडचणी आहेत?




घरातल्या वास्तूदोषांमुळे दैनंदिन जीवनात अनेक अडचणी येतात. आर्थिक अडचणींचा संबंध घरातल्या वास्तूरचनेशी असू शकतो. आर्थिक अडचणींशी संबंधित वास्तूदोषांबाबत जाणून घेऊ या...

* वास्तूशास्त्रानुसार उत्तर-पूर्व दिशेने धनाचं आगमन होतं. या दिशेला अवजड सामान किंवा अस्वच्छता असेल तर आर्थिक अडचणी येतात. अशा घरांमध्ये आर्थिक भरभराट धीम्या गतीने होते.

* उत्तर-पश्चिम दिशा बंदिस्त असणं वास्तूशास्त्रानुसार अशुभ मानलं जातं. या दिशेला अंधःकार असेल तर घरात वादविवाद होतात आणि आर्थिक अडचणी येतात.

वास्तू भक्ती

* घराचा दरवाजा दक्षिणेकडे असणं अशुभ मानलं जातं. त्यामुळे कपाट किंवा घराचा दरवाजा या दिशेला असू नये.

* घराचं स्वयंपाकघर उत्तर-पूर्व दिशेला असेल तर आर्थिक ताळमेळ बसत नाही. स्वयंपाकघर पश्चिम किंवा दक्षिण-पूर्व दिशेला असणं शुभ मानलं जातं.

* घरच्या कर्त्या पुरूषाची झोपण्याची खोली दक्षिण-पूर्व दिशेला असू नये. यामुळे घरात अडचणी येतात तसंच कर्त्या पुरूषाच्या आयुष्यात सतत ताणतणाव येत राहतात. कौटुंबिक सुख मिळत नाही.

* दक्षिण-पश्चिमेकडे दरवाजे असलेल्या खोल्या घरातल्या इतर खोल्यांपेक्षा मोठ्या असतील तर आर्थिक अडचणी येतात. कायदेविषयक अडचणींचा सामना करावा लागतो. आरोग्यविषय समस्या उद्भवतात.



# चीनमधला शंकर

गणपती ही देवता विविध देश आणि संस्कृतींमध्ये वेगवेगळ्या रूपांमध्ये पूजली जाते हे आपण जाणतो. त्याचप्रमाणे भगवान शंकराची चीनमध्ये पूजा केली जात असे. चीनमध्ये आज बौद्धधर्मीयांचं प्रमाण सर्वाधिक असलं तरी प्राचीन काळात इथे शंकराची पूजा केली जात असे. याबाबतचा उल्लेख महाभारतात आढळतो. आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथात चाणक्याने चिनी संस्कृतीचा उल्लेख केलाय. इसवी सन पूर्व २२१ मध्ये शिन हुआंग टी नावाच्या व्यक्तीने चिनी साम्राज्याची स्थापना केली होती, असा उल्लेख अर्थशास्त्र ग्रंथात आढळतो. चीनमधल्या क्वानजाउ प्रांतातल्या शिनमेन भागातल्या फुजियान प्रांतात प्राचीन शिवमंदिराचे अवशेष आढळतात. आजसुद्धा येथे पाच फुटांचं शिवलिंग पहायला मिळतं. शंकराच्या मंदिराचे आता भग्नावशेष शिल्लक आहेत. पण इथल्या भिंतींवर वेदिक धर्मविषयक नकाशे आढळतात.

धर्म देशोदेशीचे

इसवीसन पूर्व १०११ मध्ये हे मंदिर तोडण्यात आलं होतं. पण इसवीसन १४०० मध्ये याची पुनर्स्थापना करण्यात आली. १९५० पर्यंत पुत्रप्राप्तीसाठी चिनी महिला या मंदिरात येऊन शंकराची आराधना करत असत. सहाव्या शतकाच्या सुरूवातीपर्यंत येथे हिंदू मंदिरांचं अस्तित्त्व असल्याचे पुरावे सापडले आहेत. चीनमधल्या सुवांग वू प्रांतात सापडलेल्या खांबावर संस्कृत भाषेतले लेख आढळतात. हिंदू धर्मात मृत्यूची देवता मानल्या गेलेल्या यमाला चीनमध्ये यनमो वांग असं म्हटलं जातं. यामुळे हिंदू आणि चिनी संस्कृतीत बरंच साम्य दिसतं.





# संविधान हत्या दिवस' हास्यास्पद

### वडेट्टीवार यांनी भाजपला सुनावले : अघोषित आणीबाणीचा आरोप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :

देश स्वतंत्र होत असताना ज्यांनी स्वातंत्र्याला विरोध केला. इंग्रजांच्या विचारधारेच्या विरोधात सर्व देश उभा असताना ज्यांची विचारधारा इंग्रजांसोबत उभी होती. ज्यांनी ५५ वर्षांपर्यंत तिरंगा फडकवला नाही. अशा लोकांनी लोकशाहीचे हत्या केली किंवा संविधानाची हत्या केली असे बोलणे, चुकीचा आहे. हे सर्व हास्यास्पद असल्याचे काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

या माध्यमातून वडेट्टीवार यांनी भाजपच्या वतीने पाळण्यात येत असलेल्या 'संविधान हत्या दिवस' याला विरोध केला आहे. सध्या रोजच संविधानाची हत्या होत असल्याचा आरोपही वडेट्टीवार यांनी केला आहे. सध्या देशात अघोषित आणीबाणी असल्याचा दावा देखील त्यांनी केला.

भाजप याला 'संविधान हत्या दिवस' म्हणत आहेत हे हास्यास्पद आहे. कारण ते दररोज संविधान बदलण्याबद्दल बोलतात. त्यांचे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री मनुस्मृती त्यांच्या टेबलावर ठेवून त्यांचा संविधानावर विश्वास नसल्याचे सांगतात.

भाजमधील बरेच जण संविधान बदलण्याबद्दल आणि मनुस्मृती लागू करण्याबद्दल बोलत असतात. जे दररोज संविधानाची हत्या करत आहेत, त्यांना त्याबद्दल बोलण्याचा अधिकार नसल्याचे वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

भाजप जेव्हा आणीबाणी विषय बोलतो, त्यावेळी इंदिरा गांधी यांनी आणीबाणी नंतर स्वतः निवडणूक लढवली होती. त्यानंतर देखील जनतेने इंदिरा गांधी यांना प्रचंड बहुमत दिले होते. म्हणजेच आणीबाणी लागू करणे ही त्यावेळची गरज होती, असा दावा देखील विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.



#### देशात रोज संविधानाची हत्या

सध्या आपल्या देशात रोजची आणीबाणी झाली आहे. ही अघोषित आणीबाणी असल्याचा आरोप विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. आज संविधानावर कोण चालतंय? आज तर मन मर्जीने काम चालू आहे? आज पन्नास वर्षानंतर ते आज संविधान हत्या दिवस असल्याचे म्हणत आहे. जे रोज संविधानाची हत्या करतात, त्यांना हे बोलण्याचा अधिकार नाही. त्यांनी असे बोलणे म्हणजे हास्यास्पद असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

### इंदिरा गांधींच्या आणीबाणीचे राऊतांकडून समर्थन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २५ :

आणीबाणीला ५० वर्ष झाल्याच्या निमित्ताने भाजपतर्फे 'संविधान हत्या दिवस' पाळण्यात येत आहे. याला खासदार संजय राऊत यांनी विरोध दर्शवला आहे. इंदिरा गांधी यांनी लादलेल्या आणीबाणीचे समर्थन देखील केले आहे. गेल्या दहा वर्षांपासून देशात अघोषित आणीबाणी लागू असल्याचा आरोप त्यांनी केला.

आपात्काळ किंवा आणीबाणी हा संविधान हत्या दिवस कसा होऊ शकतो? असा प्रश्न राऊत यांनी उपस्थित केला. संघाचे संस्थापक बाळासाहेब देवरस यांनी आणीबाणीला पाठिंबा दिला होता. त्यांना इंदिरा गांधी यांना अटक केली होती. मात्र, तुरुंगातून त्यांनी जो पत्र व्यवहार केला होता, तो



एकदा पहा, देवरस यांनी आणीबाणीला समर्थन दिल्याचा दावा राऊत यांनी केला आहे.

बाळासाहेब ठाकरे यांनी देखील जाहीर पणे आणीबाणीचे समर्थन केले होते. त्यांनी खुले समर्थन दिले होते. आणीबाणी ही शिस्त लावणारी एक व्यवस्था होती.

देशामध्ये अशांतता, अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न होतो, अशा वेळी अशांतता निर्माण करण्यासाठी देशातील आणि देशाबाहेरील काही शक्ती काम करतात. तेव्हा अशा प्रकारे देशावर नियंत्रण मिळवण्यासाठी आणीबाणी लावण्याचा संविधानिक तरतूद भारतीय संविधान मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील घटनापीठाने दिल्याचे ते म्हणाले.

# त्यांच्या एकाही नेत्याची अजून ईडी चौकशी का झाली नाही?

### बच्चू कडूंचा परखड सवाल

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २५ :

प्रहार संघटनेचे नेते तथा माजी मंत्री बच्चू कडू यांनी सत्ताधारी भाजपवर सडकून टीका केली आहे. भाजप आणीबाणीपेक्षाही वाईट वागली हे संपूर्ण देशाला माहिती आहे. हे लोक खरेच रामाचे भक्त असतील तर त्यांनी आजपर्यंत भाजपच्या कोणत्याही नेत्यावर ईडीची कारवाई का झाली नाही? हे सांगावे, असे त्यांनी म्हटले आहे.

संसद व विधिमंडळाची अंदाज समिती ही प्रामुख्याने सरकारला काटकसरीचा सल्ला देते. पण याच समितीच्या अध्यक्ष व सदस्यांच्या २ दिवसांच्या जेवणावर चांदीच्या थाळीचा वापर करून लाखोंचा खर्च करण्यात आल्याची बाब समोर आली आहे. या उधळपट्टीमुळे राज्य विधिमंडळाच्या कारभाऱ्यांवर टीका केली जात असताना बच्चू कडू यांनी भाजपवर उपरोक्त शब्दांत निशाणा साधला आहे.

बच्चू कडू म्हणाले, सद्यस्थितीत सरकारमध्ये अत्यंत भावनाशून्य लोक बसलेत. त्यांना कोणत्याही प्रकारच्या संवेदना नाहीत. आज राज्यात दररोज १०-१५ शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. रोजगार हमीच्या मजुरांना वेळेवर पगार मिळत नाही.

**एकही भ्रष्टाचारी नाही का?**

एकीकडे पैसे नसल्याचे सांगायचे आणि दुसरीकडे अशी उधळपट्टी करायची. हे पाहून सर्वसामान्य माणसांना किती वेदना होत असतील याची कुणालाही कल्पना नाही. सत्तेवरचा अंकुश आता सुटलेला आहे. एखाद्या कसायाचे एकदा चारा खाऊ घालायचा आणि दररोज गाई-म्हशी कापायच्या याला काय अर्थ आहे? तुम्ही वेगळे काय करता? तुम्ही रामाचे खरे भक्त असाल तर सांगा भाजपच्या एकाही नेत्याची आजपर्यंत ईडीची चौकशी का झाली नाही? तुमच्यात एकही भ्रष्टाचारी नाही का? तुम्ही आणीबाणीपेक्षाही वाईट वागले हे संपूर्ण देशाला माहिती आहे, असे ते म्हणाले.



**जेलवारी झाली तरी**

बच्चू कडू यांनी आपल्याला कोणत्याही पदाची अभिलाषा नसल्याचेही यावेळी ठणकावून सांगितले. अनेकांना वाटत होते माझ्या मनात पदाची लालसा आहे. पण ते चुकीचे आहे. आमदारकी गेली किंवा अध्यक्षपद गेले म्हणजे बच्चू कडू थांबणार असे नाही.

माझी एखादी जेलवारी झाली तरी मी थांबणार नाही. पण हुकूमशाही किती करावी याची काही मर्यादा आहे. अपात्र केले, यांची फाईल एक महिना कुठे दाबून कात होती? अजूनही मला अपात्रतेची नोटीस मिळाली नाही. हा मला बदनाम करण्याचा प्रयत्न आहे.

भाजपमधील काही जण आम्हाला बदनाम करत आहेत. बँक तोट्यात असल्याची आवई उठवत आहेत. संचालकांनीही बँकेची बदनामी करू नये. मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना फोन करेन, कॉम्प्रमाईज होईल असे अनेकांना वाटत होते. पण असे काहीही होणार नाही. कारण माझ्या आडनावातच कडू लागले आहे, असे बच्चू कडू म्हणाले.

### आ. संग्राम जगतापांची पक्षाच्या बैठकीला दांडी

#### अजित पवारांनी दिला इशारा

■ वृत्तसंस्था, अहिल्यानगर, दि. २५ :

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार संग्राम जगताप यांनी हिंदुत्ववादी भूमिका घेत अल्पसंख्यांक समुदायाला लक्ष्य केले होते. त्यांच्या या भूमिकेमुळे राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष धर्मनिरपेक्ष विचारांचा आहे. त्यात याच पक्षाच्या आमदाराने हिंदुत्ववादी भूमिका घेतल्याने उपमुख्यमंत्री अजित पवारांनी नाराजी व्यक्त केली आहे. तसेच आजच्या बैठकीत मी त्याला बोलेन, असेही त्यांनी म्हटले होते. परंतु संग्राम जगताप यांनी पक्षाच्या बैठकीला देखील दांडी मारली असल्याचे समोर आले आहे.

अजित पवारांनी संग्राम जगताप यांनी घेतलेल्या भूमिकेवर नाराजी व्यक्त करत म्हटले होते की, आजच्या बैठकीत मी संग्रामला याबाबत बोलेन. आमचा पक्ष हा धर्मनिरपेक्ष असून सर्व जाती-धर्मांना सोबत घेऊन जाणारा आहे, असे पवारांनी म्हटले. परंतु संग्राम जगताप हे बैठकीला देखील उपस्थित नव्हते.

विशेष म्हणजे अजित पवारांनी त्यांना बोलावून देखील संग्राम जगताप आले नाहीत.



त्यामुळे संग्राम जगताप यांच्या मनात नेमके आहे काय? असा प्रश्न सर्वांना पडला आहे.

अजित पवारांनी संग्राम जगताप यांच्या कृतीबाबत आज झालेल्या आमदारांच्या बैठकीत स्पष्टपणे नाराजी व्यक्त केली. एकीकडे धर्मनिरपेक्ष पक्ष म्हणून आपण पुढे जात असताना एखाद्या धमाबाबत वादग्रस्त किंवा आक्षेपार्ह विधान पक्षातील आमदाराने करणे पक्षाला परवडणारे नाही, असे अजित पवारांनी स्पष्ट शब्दात सांगितले. तसेच अशी कृती खपवून घेतली जाणार नसल्याचा इशारा देखील अजित पवारांनी दिला आहे.

मी स्वतः संग्राम जगताप यांच्याशी बोलणार असून अशा प्रकारची वादग्रस्त विधाने का करत असल्याचा जाब विचारणार असल्याचेही त्यांनी म्हटले होते. परंतु, पक्षाच्या नियमित बैठकीला संग्राम जगताप गैरहजर राहिले.

# तोडगा निघाला नाही तर मैत्रीपूर्ण लढत

■ वृत्तसंस्था, जळगाव, दि. २५ :

महाराष्ट्रात येत्या काही महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. स्थानिक पातळीवरील या निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. स्थानिक पातळीपर्यंत पक्ष वाढवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. तसेच या निवडणुका युती, आघाडी म्हणून लढवल्या जाणार आहेत की स्वबळावर लढवल्या जाणार, याबाबत देखील उत्सुकता आहे. या सगळ्यावर भाजप नेते व मंत्री गिरीश महाजन यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

गिरीश महाजन म्हणाले, जागावाटपाचा निकष अद्याप ठरलेला नाही. ज्या जागा पक्षाच्या चिन्हावर लढवल्या गेल्या, ज्या सिटिंग जागा आमच्या आहेत, त्या जागा आमच्याच आहेत, आणि हा विषय जर गुंतागुंतीचा होत असेल, तर त्यावर चर्चा करून तोडगा काढण्यात येईल. त्यावर मार्ग निघू शकतो.

मात्र आम्ही महायुतीच्या माध्यमातूनच या सर्व निवडणुका लढणार आहोत, फार काही तोडगा निघाला नाही तर मैत्री पूर्ण लढत होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. महायुतीमध्ये सहभागी तिन्ही पक्ष एकत्र राहून निवडणूक लढतील, असा आमचा प्रयत्न असल्याचेही महाजन यांनी स्पष्ट केले.

### दादांसह दोन शिलेदार विजयी

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २५ :

बारामती परिसरातील माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या बहुचर्चित निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नीळकंठेश्वर पॅनल बाजी मारण्याच्या तयारीत आहे.

स्वतः अजित पवारांनी ब गटातून विजय मिळवला आहे, तर २१ पैकी जवळपास १३ जागांवर त्यांच्या पॅनलचे उमेदवार पुढे आहेत. तर अजित पवार आणि रतनकुमार भोसले यांच्या विजयाची घोषणा करण्यात आली आहे. प्रतिस्पर्धी रंजन तावरे यांचा पराभव झाला आहे.

# ट्रक-ऑटोरिक्षाचा अपघात; २ ठार

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २५ :

पातूर-बाळापूर रोडवरील आयटीआय कॉलेजसमोर मंगळवारी भीषण अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला असून चार जण गंभीर जखमी झाले. ओव्हरटेक करताना ट्रकने मागून दिलेल्या धडकेनंतर ऑटोरिक्षा विरुद्ध दिशेने येणाऱ्या ट्रकवर आदळल्याने ही दुर्घटना घडली.

ऑटोरिक्षा क्रमांक एमएच ३० बीसी २०७१ हा अकोला येथून पातूर मार्गे अंबाशीकडे जात होता. देऊळगावजवळ ट्रक ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात ऑटोला मागून धडक दिली. या धडकेमुळे ऑटोरिक्षा विरुद्ध दिशेने जाणाऱ्या दुसरा ट्रक आदळला. त्यामुळे ऑटोचा पूर्णपणे चुराडा झाला.



भीषण अपघातात पीयूष रवींद्र चतरकर (१३), रा. सिंधी कॅम्प, अकोला आणि विलास ढोरे (५०), रा. लाखनवाडा हे दोघे जागीच ठार झाले. तसेच सुरेंद्र चतरकर (४५), रवींद्र चतरकर (५२), रूपचंद वाकोडे (५०) आणि प्रमिलाबाई वाकोडे (६५) हे गंभीर जखमी झाले.

प्रवासी ऑटो व खाजगी वाहने मर्यादेपेक्षा जास्त प्रवासी घेऊन बेधडकपणे धावत असतात. नियमांचे पालन न करणाऱ्या वाहन चालकांवर कठोर कारवाईच होत नसल्याने ते नियम पाळत नाहीत. त्यामुळे या मार्गावर अपघातांची संख्या वाढत चालली आहे. वाहतूक पोलिसांनी अवैध वाहतुकीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

### मित्रांच्या गाडीला अपघात तिघांचा जागीच मृत्यू

■ वृत्तसंस्था, संभाजीनगर, दि. २५ :

शहरातील एका धाब्यावर जेवण करून परतणाऱ्या पाच मित्रांच्या गाडीला भीषण अपघात झाला.

या अपघातात तीन जणांचा जागीच मृत्यू झाला असून, इतर दोघे गंभीर जखमी झाले आहेत. अपघाताचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी, वाहनाचा वेग जास्त असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.

हे मित्र शहरानजिकच्या एका ढाब्यावर जेवण केल्यानंतर परत येत होते. त्याचवेळी त्यांच्या कारला अपघात होवून तिघांचाही मृत्यू झाला.

**कार चालकाच्या मारहाणीनंतर रिक्षाचालकाची आत्महत्या**

ठाणे जिल्ह्यातील डोंबिवलीच्या मोठा गाव परिसरात एका भीषण घटनेने खळबळ उडाली आहे. कार चालकाने मारहाण करून २ लाख रुपयांची नुकसान भरपाई मागितल्याने तणावाखाली आलेल्या ७० वर्षीय रिक्षाचालक मुंजाजी शेळके यांनी आज आत्महत्या केली.

मिळालेल्या माहितीनुसार, रात्री ऑटो आणि कारची धडक झाली होती. त्यानंतर कार चालक, जो ठाकरे गटाचा पदाधिकारी असल्याची प्राथमिक माहिती आहे, त्याने मुंजाजी शेळके यांना मारहाण केली आणि डांबून ठेवत २ लाख रुपयांची मागणी केली. मध्यरात्री ३ वाजता त्यांची सुटका झाल्यानंतर शेळके यांनी टोकाचे पाऊल उचलले.

या घटनेने संतप्त झालेल्या शेळके यांच्या नातेवाईकांनी विष्णू नगर पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. जोपर्यंत आरोपी कार चालकाविरोधात गुन्हा दाखल होत नाही, तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही, अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

### भाषा संवर्धनासाठी राज्य मराठी विकास संस्था



मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्था
मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन.

राज्य मराठी विकास संस्था ही मराठी भाषेच्या विकासाकरता प्रयत्न करणारी महाराष्ट्र शासनपुरस्कृत संस्था आहे.

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास हे संस्थेचे बोधवाक्य आहे.विविध क्षेत्रात मराठीचा होणारा वापर अधिकाधिक गुणवत्तापूर्ण होत जावा यासाठी प्रयत्नशील राहावे व मराठी भाषेच्या अभिवृद्धीची प्रक्रिया नियोजनपूर्वक गतिमान करावी ही या संस्थेच्या स्थापनेमागील दोन मुख्य उद्दिष्टे आहेत.

राज्य मराठी विकास संस्थेची मुद्रा ही आकाराने पिंपळपानासारखी असून ती मराठी वर्णमाला वापरून तयार करण्यात आली आहे. या उद्दिष्टांनुसार सर्व स्तरांवर मराठीचा विकास साधण्यासाठी राज्य मराठी विकास संस्थेच्या वतीने स्वतंत्रपणे उपक्रम हाती घेण्यात येतात.

भाषा व संस्कृती या क्षेत्रांत मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी काम करणाऱ्या विविध शासकीय तसेच अशासकीय संस्थांमध्ये समन्वय राखून त्या संस्थांच्या साहाय्यानेही काही उपक्रम पार पाडण्यात येतात. राज्य मराठी विकास संस्था मराठी भाषेच्या संवर्धनार्थ काम करते.

संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर केल्याप्रमाणे संस्थेची प्रमुख उद्दिष्टे महाराष्ट्राची व्यवहारभाषा, प्रशासनिक भाषा आणि ज्ञानभाषा या तिन्ही स्तरांवर मराठी भाषेचा सर्वांगीण वापर वाढविण्यासाठी विविध मार्गांनी प्रयत्न करणे, कृषी, वैद्यक, उद्योग, व्यापार, विज्ञान, तंत्रज्ञान, प्रसारमाध्यमे इ. व्यवहारक्षेत्रांत मराठी भाषेचा वापर वाढविण्यासाठी आवश्यक साधनसामग्री विकसित करणे; तसेच भाषेशी संबंधित असलेल्या तंत्रविद्यांचा विकास करणे.वेळोवेळी भाषिक पाहणीचे कालबद्ध कार्यक्रम निश्चित करून व मराठीच्या विविध व्यवहारक्षेत्रांतील स्थितिगतीचे निरीक्षण करून त्यांचे समाज भाषावैज्ञानिक अहवाल शासनाला सादर करणे, शासनव्यवहाराच्या प्रशासन, कायदा, न्याय, जनसंपर्क अशा विविध शासकीय व निमशासकीय यंत्रणांमध्ये मराठी भाषेचा लोकाभिमुख आणि सुलभ वापर वाढविण्यासाठी भाषिक उपक्रम हाती घेणे व उपकरणे निर्माण करणे. शिष्टाचार, औपचारिक भाषाव्यवहार व भावाभिव्यक्ती समृद्ध करण्यासाठी भाषिक नमुने निर्माण करणे व उपलब्ध करणे मराठी भाषेतून नव्या ज्ञानाची निर्मिती होण्यासाठी परिभाषेची घडण, निरनिराळ्या ज्ञानस्रोतांची उपलब्धी, भाषेचा सृजनशील वापर वाढविणारे कृतिकार्यक्रम यांना प्रोत्साहन देणे, बहुजनांच्या बोलीभाषा आणि प्रमाण मराठी यांच्यातील अभिसरण वाढवून त्यांच्या समवर्तने संबंधातून मराठी भाषा अधिकाधिक लोकाभिमुख व समृद्ध करण्यासाठी प्रयत्न करणे, लेखनविषयक नियम, वर्णमाला, भाषिक वापराची यांत्रिक उपकरणे, संगणकीय आज्ञावली यांच्या वापरात सुसूत्रता व सुबोधता आणण्यासाठी शासनाला मार्गदर्शक तत्त्वे उपलब्ध करून देणे, माहिती तंत्रज्ञानविषयक गरजा लक्षात घेऊन मराठी अनुरूप आज्ञावली विकसित करणे हि उद्दिष्टे आहेत.

२५ जून १९७९ रोजी मुंबई येथे महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक अभ्यासक्रमात व प्रशासनात मराठी भाषेचे स्थान या विषयावर एक परिषद घेण्यात आली होती. त्या परिषदेत मराठी भाषेसाठी एक राज्यस्तरीय संस्था स्थापण्यात यावी, अशी सूचना करण्यात आली. याविषयी विस्तृत टिप्पणी करण्यासाठी एक अनौपचारिक अभ्यासगट निर्माण करण्याचा निर्णय शासनाने घेतला. या अभ्यासगटाचे निमंत्रक म्हणून प्रा. वसंत बापट आणि अन्य सदस्य म्हणून प्रा. मे. पुं. रेगे, प्रा. वसंत दावतर, डॉ. अशोक केळकर आणि प्रा. मं.वि. राजाध्यक्ष यांची नियुक्ती करण्यात आली. अभ्यासगटाच्या सदस्यांनी एक टिप्पणीवजा आराखडा तयार केला. जो मराठी भाषेच्या संवर्धनासाठी अनुकूल असा होता.

लोकजागर

■ ■ ■

# वर्गातच घेतला शिक्षकाने गळफास

■ वृत्तसंस्था, जळगाव, दि. २५ :

एका शिक्षकाने शाळेच्या मधल्या सुट्टीत वर्गातच गळफास लावून आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना जळगाव जिल्ह्यातील पाचोऱ्यात घडली. या शिक्षकाने हे टोकाचे पाऊल का उचलले? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण वर्गात शिक्षकाचा मृतदेह पाहून विद्यार्थ्यांत भितीचे वातावरण पसरले आहे.

पाचोरा स्थित सुपडू भादु विद्या मंदिर शाळेत ही घटना घडली आहे. रवींद्र भारत महाले असे आत्महत्या केलेल्या शिक्षकाचे नाव आहे. त्यांनी बुधवारी सकाळी १०.३० वा. शाळेच्या दुसऱ्या मजल्यावरील एका वर्गात गळफास लावून आत्महत्या केली. यावेळी विद्यार्थी मधल्या सुट्टीसाठी वर्गाबाहेर गेले होते. वर्गात कुणीही नव्हते. ही संधी साधून रवींद्र महाले यांनी आत्महत्या केली. सुट्टीनंतर विद्यार्थी वर्गात परतले असता त्यांना शिक्षक गळफास घेतलेल्या स्थितीत आढळले. हे पाहून त्यांनी एकच आरडाओरडा सुरू केला. त्यानंतर ही घटना समोर आली.

शिक्षक रवींद्र महाले यांनी आत्महत्या का केली? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण ही घटना शाळा सुरू असताना घडल्यामुळे विद्यार्थी वर्गात भितीचे वातावरण पसरले आहे. या घटनेची माहिती मिळताच पाचोरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतला.

पोलिस या घटनेचा सर्वच अंगाने तपास करत आहेत. पण तूर्त मानसिक तणावातूनच रवींद्र महाले यांनी आत्महत्या केली असेल असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. या प्रकरणी पाचोरा पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.


# नोव्हो नॉर्डिस्कचे वजन व्यवस्थापन औषध विगोव्ही आता भारतात उपलब्ध



नोव्हो नॉर्डिस्क ही डॅनिश औषध कंपनी आहे जिच्याकडे दीर्घकालीन रोगांची काळजी घेण्यासाठी १०० वर्षांहून जास्त काळाचा वारसा आहे आणि तिने भारतामध्ये विगोव्ही (इंजेक्शन घेण्यायोग्य सेमाग्लुटाइड) लाँच करण्याची घोषणा केली.

विगोव्ही हे एक आठवड्यात एकदा इंजेक्शन घेण्यायोग्य ग्लुकागॉन-सारखे पेप्टाइड-1 रिसेप्टर अॅगोनिस्ट (जी.एल.पी-1 आर.ए) असून हे स्थूलतेने त्रस्त असलेल्या लोकांसाठी भारतात दीर्घकालीन वजन व्यवस्थापन आणि महत्वाच्या प्रतिकूल हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी घटनांची (एम.ए.एस.इ.ची) जोखीम कमी करण्यासाठी दर्शविलेले पहिले आणि एकमेव औषध आहे. हे पाच डोस ताकदींमध्ये उपलब्ध असून त्यात अभिनव वापरण्यास सुलभ पेन उपकरणाची सोय आहे.

विगोव्ही हे एक प्रिस्क्रिप्शन-केवळ औषध आहे ज्यामध्ये लठ्ठपणा किंवा जास्त वजन असलेल्या लाखो भारतीयांचे जीवनमान सुधारण्याची क्षमता आहे. अभ्यासानुसार, भारतात सामान्यीकृत लठ्ठपणा असलेले २५४ दशलक्ष लोक आणि पोटातील लठ्ठपणा असलेले ३५१ दशलक्ष लोक आहेत.

जास्त वजन आणि लठ्ठपणा असलेले लोक राहणाऱ्यांमध्ये भारत तिसऱ्या क्रमांकावर आहे. चिंताजनक म्हणजे, लठ्ठपणा हा २०० हून अधिक आजारांशी संबंधित आहे, ज्यामध्ये हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग, विशिष्ट प्रकारचे कर्करोग आणि टाइप २ मधुमेह यांचा समावेश आहे.

लठ्ठपणाबद्दल गैरसमजांमध्ये असे म्हटले जाते की ते चुकीच्या जीवनशैली निवडी आणि स्वयं-शिस्तीच्या अभावाचा परिणाम आहे. तथापि, लठ्ठपणा अनेक वेगवेगळ्या घटकांमुळे होतो, ज्यामध्ये अनुवंशशास्त्र, जीवशास्त्र, मानसशास्त्र, समाज आणि आपण ज्या वातावरणात राहतो त्यास. टाइप २ मधुमेह किंवा दमा यासारख्या इतर जुनाट आजारांप्रमाणे, लठ्ठपणासाठी प्रभावी उपचार उपायांसह दीर्घकालीन व्यवस्थापन आवश्यक आहे. विगोव्ही लाखो भारतीयांमध्ये स्थूलतेने त्रस्त किंवा वजन जास्त असलेल्या लोकांच्या जीवनाच्या गुणवत्तेत सुधारणा करण्याची क्षमता देते.


: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३२४६३५६
subodh.ranshevre@rediffmail.com

■ ■ ■

### नांडेदमध्ये सरकारच्या आदेशाची होळी, सांगलीत जमिनीची मोजणी पाडली बंद

# शक्तिपीठ महामार्गाविरोधात शेतकरी आक्रमक

■ वृत्तसंस्था, नांदेड / सांगली, दि. २५ :

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादनाला मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्र्यांचा महत्त्वकांक्षी प्रकल्प असणाऱ्या या महामार्गासाठी सरकारने तब्बल २० हजार कोटींची तरतूद केली आहे. पण आता शेतकऱ्यांनी या महामार्गाला कडाडून विरोध सुरू केला आहे. नांदेड येथील शेतकऱ्यांनी सरकारच्या यासंबंधीच्या आदेशाची होळी केली असून, सांगली येथील शेतकऱ्यांनीही महामार्गाची मोजणी बंद पाडली आहे.



शक्तिपीठ महामार्ग हा नागपूर व गोवा या दोन शहरांना जोडणार आहे. हा महामार्ग वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातूर, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, सिंधुदुर्ग मार्गे गोव्यापर्यंत जाणार आहे. पण या महामार्गात अनेक सुपीक जमिनी जाणार आहेत.

त्यामुळे शेतकऱ्यांनी या महामार्गाला कडाडून विरोध केला आहे. परिणामी, सरकार व शेतकरी यांच्यात या मुद्यावरून तीव्र संघर्ष होण्याची शक्यता आहे. नांदेडच्या मालेगाव येथे शेतकऱ्यांनी या महामार्गाविषयी काढलेल्या आदेशाची होळी केली आहे.

या आंदोलनात नांदेड, परभणी व हिंगोली येथील शेकडो शेतकरी सहभागी झाले होते. शक्तिपीठ महामार्ग शेतकऱ्यांच्या हिताचा नाही. काही मोजक्याच लोकांच्या हितासाठी हा मार्ग शेतकऱ्यांवर लादण्यात येत आहे. या प्रकल्पात हजारो कोटींचा भ्रष्टाचार होत आहे. त्यामुळे आम्ही हा महामार्ग कोणत्याही स्थितीत होऊ देणार नाही, असा दावा आंदोलक शेतकऱ्यांनी केला आहे.

**सांगलीत मोजणी पाडली बंद**

दुसरीकडे, सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यातील शेटफळे येथे शेतकऱ्यांनी शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादनासाठी आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे काम रोखून धरले आहे. शक्तिपीठ महामार्गात शेटफळे गावातील ४९१ शेतकऱ्यांची जमिनी जात आहेत. या प्रकरणी ४० हेक्टरहून अधिक क्षेत्र बाधित होणार आहे. महसूल विभागाने भूसंपादनासाठी केवळ एक दिवस अगोदर म्हणजे मंगळवारी शेतकऱ्यांना नोटीसा पाठवल्या होत्या. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजे आज बुधवारी थेट अधिकारी आपल्या सामानासह मोजणीसाठी पोहोचले होते. दरम्यान, सरकारने या महामार्गाचा अट्टहास धरला असला तरी राज्यभरातून या महामार्गाला विरोध वाढू लागला आहे.